म. ग्रं. सं. ठाणें
विषय
र. नं.

# रशिया




RI FBK-0004603

लेखक. पं. जवाहरलाल नेहरू.

विजय-साहित्य-संस्था.

१२ आणे.

# आजचा रशिया

लेखक

पं० जवाहरलाल नेहरू

अनुवादक

श्री० दिनकर वासुदेव दिवेकर, एम्. ए.

संपादक : 'मराठा'

REFBK-0004603

१९३२

किंमत १२ आणे

प्रकाशक
अनंत सखाराम गोखले,
११ बुधवार, पुणें, नं. २.

[ प्रथमावृत्तीचे हक्क प्रकाशकाकडे ]

मुद्रक
अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ७७० शनवार, पुणें, नं. २.

# प्रस्तावना

हे लेख हिंदुस्थानांतील निरनिराळ्या वर्तमानपत्रांकरितां लिहिले होते ह्यांपैकीं बरेच लेख मद्रासच्या 'हिंदू'मध्यें, 'शिक्षणा'वरील लेख 'यंग इंडिया'मध्यें व बाकीचे इतर वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाले. हे लेख पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचें मी मोठें धाडसच करीत आहें, असें माझें मन मला सांगत आहे. ते किती सदोष आहेत, किती विस्कळित व टांचणवजा आहेत ह्याची जाणीव सामान्य वाचकांपेक्षां कदाचित् जास्तच मला आहे. कांहीं लेख आगगाडींतून प्रवास करतां करतां लिहिले आणि सर्व दिवसभर माझें उद्दिष्ट काम व तत्प्रीत्यर्थ हालचाली ह्या सांभाळून फावल्या वेळांतच सर्व लेख लिहिले, हें मी अगदीं प्रांजलपणें कबूल करितों. मला ह्याचीहि पूर्ण जाणीव आहे कीं, सोव्हिएट रशियाच्या गुंतागुंतीच्या व क्षणोक्षणीं बदलणाऱ्या स्थितीविषयीं लिहिणाऱ्या लेखकाला त्या देशाविषयीं बरीच माहिती असली पाहिजे व थोडें धाष्टर्यही अंगीं असलें पाहिजे. मी तितका माहितगार नाहीं व 'महाजनो येन गतः स पन्था' ह्या वचनाला पायांखालीं तुडवून 'महाजन'हि आक्रमण्यास धजणार नाहींत अशा मार्गावर घुसण्याची जरी मला संवय असली तरीसुद्धां ह्या लेखांतून छातीठोकपणें रशियाविषयीं वज्रलेपी नियम मीं घालून दिले नाहींत; अगर तेथें जें कांहीं घडलें त्यांविषयीं अभिनिवेशानें मतहि दिलें नाहीं. सोव्हिएट रशियांतील स्थितीच्या निदर्शनांत मी अगदीं निमग्न होऊन गेलों व कित्येकांनीं माझ्याजवळ विचारपूस केली त्यावरून रशियाविषयीं माहिती मिळण्याची उत्सुकता माझ्याखेरीज दुसऱ्या पुष्कळ लोकांना आहे हेंच उघड होतें. पण ती उत्सुकता ह्या गोधडीवजा लेखमालिकेनें तृप्त होईल कीं नाहीं ह्याची शंकाच आहे; कारण ही

लेखमाला थोड्याशा साक्षात् अनुभवाच्या पण बऱ्याचशा पुस्तकी ज्ञानाच्या सूत्रानेंच गुंफली असून त्यांत गाळागाळी व चर्वितचर्वण बरेंच झालें आहे. पण लोकांच्या कांहीं शंकांचें निरसन व्हावें आणि ज्यांना जास्त खोलांत शिरून ह्या विषयाची माहिती मिळविण्याची इच्छा आहे त्यांना योग्य दिशा दाखवावी; म्हणूनच हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें साहस मी करीत आहें.

इ० सन १९१७ सालीं डिसेंबरच्या १७ तारखेला भरलेल्या कॉंग्रेसला उद्देशून केलेल्या भाषणांत वुड्रो विल्सन म्हणतो: "अंतराळांत दुमदुमणारी मानवजातीची वाणी माझ्याप्रमाणें तुम्हांसही ऐकूं येत असेल. अखिल मानवांच्या हृदयाचे हे बोल दिवसेंदिवस अधिक स्पष्टपणें व अधिक व्यापकपणें कानांवर आदळूं लागले आहेत." आधुनिक रशियन स्थितीच्या अभ्यासकाला तर हा समष्टिरूप निनादे, ही सामान्य जनतेच्या हृदयाची हांक जास्त आवेशी व आग्रही वाटूं लागली आहे व तिचा प्रतिध्वनि प्रत्येक देशांतून उमटत असलेला त्याला ऐकूं येत आहे. रणबेजार दुनियेला ती इ० सन १९१७ सालींच ऐकूं आली. प्रेसिडेंट विल्सनलाही ती ऐकूं आली असें दिसत. आतां कस्पटासमान मानले गेलेले पण तेव्हां प्रसिद्धीस आलेले आपलें 'चौदा मुद्दे' रेखाटीत असतां सोव्हिएट रशिया व जर्मनी ह्यांच्यामधील तहाच्या वाटाघाटीला उद्देशून तो म्हणतो: "आम्हीं टयूटन ( इंग्लंड आणि जर्मनी ) मुत्सद्यांशीं व टर्कीच्या मुत्सद्यांशीं ज्या परिषदा भरवीत आहोंत त्या गुप्त नसाव्यात, अगदीं खुल्या असाव्या असा रशियन प्रतिनिधींनीं आग्रह धरिला आहे, व तो योग्य आणि समंजसपणाचा असून आधुनिक लोकशाहीच्या तत्त्वाला अनुसरूनच आहे. त्यांच्या मागणीप्रमाणें सर्व जगाचे कान ह्या परिषदांकडे लागले आहेत........ शिवाय तत्त्व आणि हेतु यांच्या व्याख्येकरितांही हांकाटी सुरू आहे

व माझ्या मतें ती जगाच्या प्रक्षुब्ध वातावरणांतील विशेष मन हालवून सोडणाऱ्या कंठरवापेक्षांही जास्त थराऊन सोडणारी व आग्रहाची आहे. रशियन लोकांचीच ती हांकाटी होय........आमचें मनोगत काय आहे तें आम्हांस रशियन लोक विचारीत आहेत; आमचे हेतु व भावना त्यांच्याहून भिन्न असल्यास कोणच्या बाबतींत भिन्न आहेत ह्याविषयीं ते आम्हांस विनंति करीत आहेत. आणि माझी अशी खात्री आहे कीं, मींही त्यांना निःपक्षपातीपणानें व निःसंदिग्धपणें उत्तर द्यावें अशीच अमेरिकेच्या 'राष्ट्रसंघां'तील लोकांची पण तीव्र इच्छा आहे. रशियाचे आधुनिक पुढारी विश्वास ठेवोत अगर न ठेवोत; पण आमची मात्र अगदीं मनापासून इच्छा आहे व आशा आहे कीं, ह्या अडचणींतून कोणचा तरी मार्ग निघावा आणि रशियन लोकांची स्वातंत्र्याची व सुयंत्रित शांततेची अंतिम आशा सफल करण्याचा मान आम्हां अमेरिकन लोकांसच मिळावा."

'चौदा मुद्द्यां'पैकीं सहावा मुद्दा तर सत्ताधारी राष्ट्रांना कठीण कसोटीला लावणाराच होता. 'इतर राष्ट्रांनीं रशियन प्रांतांतून आपलें सैन्य काढून घ्यावें, व रशियासंबंधींचे सर्व प्रश्न अशा रीतीनें सोडवावे कीं, जगांतील इतर राष्ट्रांचें पूर्ण सहकार्य लाभून, रशियाला स्वतःच्या राजकीय व राष्ट्रीय धोरणाचा स्वतंत्र निर्णय करण्याची अबाधित व अव्याहत संधी मिळावी; व स्वतः अंगिकारलेल्या नियमानुसारेंच स्वतंत्र राष्ट्रांच्या जमानतींत रशियाला हार्दिक स्वागताची खात्री वाटावी—नुसत्या स्वागताचीच नव्हे तर ज्या ज्या मदतीची रशिया अडीअडचणीला अपेक्षा करील अशा हरएक प्रकारच्या मदतीची सुद्धां रशियाला खात्री असावी. इतर राष्ट्रांची रशियाविषयीं सदिच्छा, स्वार्थनिरपेक्षतेनें रशियाच्या गरजांचाच सहानुभूतिपूर्वक विचार व

जाणता निःस्वार्थीपणाचा कळवळा ह्या गुणांची खरी कसोटी त्या राष्ट्रांच्या रशियाशीं पुढें होणाऱ्या वर्तणुकीवरच अवलंबून आहे."

वचन तर मोठें उदार आहे; पण तें देणारा प्रेसिडेंट विल्सन व त्याचें अमेरिकन राष्ट्र तें वचन तंतोतंत पाळण्यास विसरलें. ह्या सत्त्व-परीक्षेचा काय निर्णय लागला व इतर राष्ट्र-बांधवांनीं सहानुभूति व सदिच्छा प्रदर्शित करण्याऐवजीं, रशियासारख्या नवोन्मेषी राष्ट्राला चिरडून टाकण्याचे कसे अविरत प्रयत्न केले, हें इतिहास दाखवितोच आहे. आज, महायुद्धानंतर दहा वर्षांनीं आपण निष्कपट राजनीतीपासून किती दूर आहों व चाणक्यनीति आपल्या अंगीं किती भिनली आहे, हें नुकत्याच इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांच्यांत झालेल्या गुप्त आरमारासंबंधीं तहानें सिद्ध केलें आहे. पण 'अखिल मानवांच्या हांके'चाच रशियाला पाठपुरावा होता म्हणून रशिया अजून जिवंत राहिला आहे.

अलाहाबाद,
तारीख १०।१०।२८

जवाहरलाल नेहरू

# अनुक्रमणिका

| | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १. रशियाची जादू | .... | .... | १ |
| २. प्रवास | .... | .... | ७ |
| ३. मास्को येथें काय दिसलें ? | .... | .... | १२ |
| ४. सोव्हिएट राज्यपद्धति | .... | .... | १९ |
| ५. मध्यवर्ति सोव्हिएट घटना | .... | .... | २७ |
| ६. रशियासंबंधीं कांहीं पुस्तकें | .... | .... | ३४ |
| ७. लेनिन | .... | .... | ४० |
| ८. आणखी कांहीं पुस्तकें | .... | .... | ५० |
| ९. शेतकरी वर्ग | .... | .... | ५७ |
| १०. फौजदारी कायदा | .... | .... | ६४ |
| ११. तुरुंग | .... | .... | ७० |
| १२. अल्पसंख्याक वर्गांचा प्रश्न | .... | .... | ७८ |
| १३. शिक्षण | .... | .... | ८३ |
| १४. शेतकी आणि शेतकरी | .... | .... | ९८ |
| १५. स्त्रिया व कुटुंबसंस्था | .... | .... | १०७ |
| १६. रशिया व हिंदुस्थान | .... | .... | १२० |

# आजचा रशिया

स.नि. नं. ८८८

## प्रकरण पहिलें

## रशियाची जादू

युरोपांतून परत आल्यापासून रशियाविषयीं वारंवार मला प्रश्न विचारण्यांत येतात. मास्को शहरास माझी खरोखरच धूळभेट झाली; पण तिच्या जोरावर मला रशियाविषयीं जसा कांहीं तज्ज्ञ म्हणून मानण्यांत येतें आणि इतके विविध प्रश्न विचारण्यांत येतात कीं, माझें मन गोंधळूनच जातें. विद्यार्थ्यांच्या सभांतून बोलण्याचा प्रसंग आला, कीं बहुतेक सर्व ठिकाणीं विषय सुचविला जावयाचा तो 'सोव्हिएट रशिया!' परंतु माझी माहिती अशी मर्यादित असली तरी पण मी हाच विषय आनंदानें मान्य करीत असें; कारण अशी चौकसबुद्धि वाढावयास पाहिजे व ज्या देशानें इतिहासांतील एवढा प्रचंड प्रयोग सुरू केला आहे त्याचा व आपल्या मायभूमीचा संबंध विशेष असल्याकारणानें त्याच्याविषयीं आपणांस आवड वाटावी हेंही साहजिकच. सर्व जगाचे डोळे त्या देशाकडे लागून राहिले आहेत. कोणी भीतिग्रस्त होऊन व द्वेषबुद्धीनें तिकडे बघतात, तर कोणी त्या मार्गाचें अनुकरण करण्याच्या जबरदस्त आशेनें व आकांक्षेनें, इतकेंच काय तें.

रशियाविषयीं बेफिकीर राहणें कठिण आहे; पण त्यानें संपादिलेल्या यशापयशाचा निर्विकार मनानें निवाडा करणें त्याहूनही कठिण होय. विजेनें भरलेल्या तारेसारखी आज रशियाची स्थिति आहे. तिला

स्पर्श केला कीं, तिची झपाट्याची प्रतिक्रिया ठेवलेलीच. जो कोणी त्याच्याविषयीं लिहूं लागतो तो स्तुतीच्या अगर निंदेच्या अतिशयोक्तीला बळी पडतोच पडतो. अर्थात् बरेंचसें पाहणाराच्या दृष्टिकोनावर व तत्त्वज्ञानावर अवलंबून असतें. त्याच्या कुतर्कांचा व पूर्वग्रहांचाही पगडा त्याच्या मनावर असतो. तथापि कोणाची बाजू खरी असो वा नसो; युरोप व आशिया या दोन खंडांत विस्तीर्ण असलेल्या या कामकऱ्यांच्या व शेतकऱ्यांच्या देशामध्यें कांहीं विलक्षण जादू भरली आहे यांत संशय नाहीं. कारण, ज्या देशांत सर्वशक्तिमान् राजांच्या सिंहासनावर कामकरी व शेतकरी बसतात, जेथें यांच्यापुढें मोठमोठया धुरंधर व मातबर पुरुषांची सुद्धां कांहीं डाळ शिजत नाहीं व जेथें राजदंडाच्या ऐवजीं घण, कोयता हींच राजचिन्हें गणलीं जातात, तिकडे सर्वांचीं मनें ओढलीं जावीं यांत काय आश्चर्य ?

आपणा हिंदी लोकांची गोष्ट विचारावयासच नको. रशियाविषयीं सर्वांहून जास्त जिज्ञासा व कौतुक आपणांसच. अशी ही बलाढ्य शक्ति तरी कोणती, कीं तिच्या प्रभावानें विश्वामित्राप्रमाणें अगदीं नवी सृष्टि निर्माण केली, जुनी नष्टप्राय केली, पुरातन दाखले अजिबात रद्द ठरविले व नवीन पद्धति अंमलांत आणली, हें समजून घेण्यांत आपलें हित आहे व या आत्मकल्याणाच्या अंकुशानें मारल्यासारखें आपलें मन रशियाकडे वळतेंच. वास्तविक पाहिलें तर आपण म्हणजे 'जुनें तें सोनें' म्हणून तेंच उराशीं बाळगणारे लोक; आहे या स्थितींत कांहीं बदल करावा अशी फारशी लालसा नसावयाची; आजची दारिद्र्यावस्था व अधःपात पाहून फारच खेद होऊं लागला तर आपल्या तेजस्वी व वैभवशाली भूतकालाचीं व चिरंतन संस्कृतीचीं मनोहर काल्पनिक चित्रें काढावीं व त्यांत रंगून जावें म्हणजे झालें; अशी आपली प्रायः वृत्ति. पण वेळ गेली ती गेली आणि

आपली संस्कृति किती पुरातन असली तरी प्रस्तुतचे आपले प्रश्न सोडविण्यांत तिचा तेवढा उपयोग होऊं शकत नाहीं. या प्रश्नांचा योग्य निकाल लावावयाचा तर नवीन विचार व नवीन मार्ग यांचाच धाडसानें शोध लावला पाहिजे. जगांत सतत परिवर्तन होत आहे. कालचे व परवांचे नियम आज लागू पडत नाहींसे होतात. जगाच्या चक्राची गति ज्या भिन्न भिन्न दिशांनीं फिरत आहे त्या दिशांनीं आपण गेलें पाहिजे. अशा स्थितींत एखाद्या जीर्ण ध्येयालाच आपण जर पक्के चिकटून बसलों तर आपण या चक्राला सोडून भलतीकडेच लोटले जाऊं व शेवटीं स्वतःच आपला नाश करून घेऊं.

सांप्रत जगापुढें जे महान् प्रश्न पडले आहेत ते सोडविण्यास त्याच्यापासून कांहीं मदत होईल म्हणून रशियाविषयीं आपण इतका आस्थेवाईकपणा दाखवितों. आपणांस तर विशेषच कळकळ वाटण्याचें कारण असें कीं, हिंदुस्थानांतील एकंदर परिस्थिति व तेथील पूर्वींची आणि आतांचीही परिस्थिति यांत फारसें अंतर नाहीं. दोघेही अफाट शेतकीप्रधान असे पृथ्वीचे खंड; औद्योगिक युगाचा उभयतांत केवळ अरुणोदय झाला, नाहीं झाला, इतकेंच; दोघांपुढेंही अठराविस्वे दारिद्र्य व अज्ञानाचा गाढ अंधकार! रशियाला जर या अवस्थेस उपाय सांपडले तर 'मणौ वज्रसमुत्कीर्णे सूत्रस्येवास्ति मे गतिः' असेंच आपणांस होणार.

दुसऱ्या एका दृष्टीनेंही विचार केला तर आपण रशियाला हिशेबांतून वगळून चालणार नाहीं. तो आपला शेजारी व त्यांतल्या त्यांत बलिष्ठ शेजारी. मित्रत्वाच्या नात्यानें तो जसा आपणांस मदत करून आपणांशीं सहकार्य करूं शकेल, तसा तो शत्रु झाल्यास शल्यासारखा बोंचत राहील. मैत्रिकी काय अथवा वैरभाव काय, कांहीं असलें तरी, त्याची माहिती आपणांस पाहिजे, त्याची मनो-

रचना आपण समजून घेतली पाहिजे व त्याच्या अनुरोधानें आपण आपलें धोरण आंखलें पाहिजे. रशियाशीं होणाऱ्या युद्धाच्या भूतानें तर आपणांस कायमचेंच पछाडलेलें आहे. झारच्या कारकीर्दींत रशियाच्या साम्राज्याला समुद्रावर बाहेर पडण्यास मार्ग पाहिजे असें सांगण्यांत येत असे. आतां झारशाही बुडाली तेव्हां, शांततामय व सुव्यवस्थित जग उलथून पाडण्यासाठीं रशियांतील समाजसत्ता-वाद्यांचे चोरटे प्रयत्न आहेत. त्यांपासून सावध रहा असा इषारा देण्यांत येत आहे. इंग्लंडमध्यें अथवा रशियांत कोणीही सत्ताधारी असोत, या दोन देशांची जी जुनी स्पर्धा आहे ती पिढीजात चालू आहेच. हिंदुस्थानानें हा स्पर्धेचा वारसा कोठपर्यंत चालवावयाचा व त्याचे दुष्परिणाम किती सोसावयाचे? युद्धाच्या वार्ता कानावर येत आहेत व चिन्हेंही डोळ्यांला दिसतात म्हणून तर हा प्रश्न आपणांस फार अगत्याचा झाला आहे.

म्हणून रशियाविषयीं जास्त माहिती मिळविण्याची हिंदुस्थानाला उत्कंठा लागावी हें रास्त आहे. आतांपर्यंत आपणांस रशियाची बातमी मिळावयाची ती बहुश: रशियाच्या शत्रुपक्षानें पैशानें मारलेल्या दलालांच्या मार्फत. त्यांनीं काय, वाटेल तशा खोट्यानाट्या विचित्र गप्पा प्रसृत कराव्या! रशियांतील बायका म्हणजे सर्व राष्ट्राच्या मालकीच्या अशी जी कंडी उठविण्यांत आली होती तिजविषयीं मजजवळ पुष्कळ वेळां विचारपूस झाली. रशियाच्या बातम्यांचा सर्वांत मोठा पुरवठा करणारे म्हणजे ब्रिटिश व इतर वर्तमानपत्रांचे रिगा येथील बातमीदार. न्यूयार्क येथील 'नेशन' पत्रांतील एका लेखकानें या रिगाच्या बातमीदारांचें नुकतेंच वर्णन केलें आहे. त्यानें असें लिहिलें आहे:

" प्रथम मीं रिगाचा वार्ताहर म्हणून जें काम केलें तें लंडन शहरांत-

एका संपादकानें मला सकाळच्या वर्तमानपत्रांतील संपादकीय लेखाचा कापलेला भाग मजजवळ दिला व मला बातमीदाराचीं वस्त्रें अर्पण केलीं. त्यांतील लिखाण जरा मागेंपुढें करून तो कागद रिगाहून पाठविल्याची तारीख त्यावर घालून तेथील बातमीपत्रासारखा करून घ्या, असें त्यानें मला सांगितलें. सदर लेखांत 'थर्ड इंटरनॅशनल'च्या (रशियांतील तृतीय आंतरराष्ट्रीय संस्था) घातकी चळवळीचें कांहींसें तपशीलवार समालोचन केलेलें होतें. मीं तें काम चांगलें केलें असलें पाहिजे, कारण नंतर अशाच प्रकारचीं नाजूक कामें मजकडे सोपविण्यांत आलीं. मला त्या पत्राचा 'रिगा कॉरस्पाँडंट' ही पदवी प्राप्त झाली व माझ्या लेखनावर 'आमच्या खास बातमीदाराकडून' हीं वर्तमानपत्री संकेताचीं अक्षरें झळकूं लागलीं.

"एक वर्षानंतर मी पॅरिस येथें आलों व तेथील एका वर्तमानपत्राच्या कारखान्यांत लागलों. तथापि पॅरिस शहरीं वास करून राहिलों तरी 'रिगा कॉरस्पाँडंट' ही पदवी मला तशीच चिकटलेली! काम मात्र दुहेरी झालें. इंग्लिश व फ्रेंच अशीं दोन प्रकारचीं वर्तमानपत्रें फेरतपासणीसाठीं व पुनर्लेखनासाठीं यावयाचीं. पूर्वीं लंडनमध्यें ज्या वर्तमानपत्राच्या कचेरींत मी होतों त्यासुद्धां सर्व वर्तमानपत्रें आपल्या 'रिगा कॉरस्पाँडंट्'चा बडिवार मिरवीत. त्यांतील सर्व बातमीपत्रांत बोल्शेव्हिक लोकांचे अत्याचार, शीका येथील कत्तल, सोव्हिएट राज्यपद्धतींतील आर्थिक आपत्ति, सरकाराविषयीं प्रजाजनांतील असंतोष यासंबंधींच्या बातम्यांचे शोध असावयाचे. लंडनप्रमाणें येथेंही हा सर्व मालमसाला मला पुरविण्यांत येई आणि मग त्याचें रिगाच्या संयुक्त बातमीदाराच्या लेखनाचें पक्वान्न तयार व्हावयाचें.

"आतां जेव्हां रिगाचा विचार मनांत येतो तेव्हां तें एकादें शहर आहे ही कल्पनाच येत नाहीं. तर रिगा म्हणजे एका वर्तमानपत्राची

बडी कचेरी आहे व तेथें जुनींपुराणीं मेजें; डिंकाच्या बाटल्या, कात्री, टाईपरायटर्स, रद्दीचे ढीग असें सामान पडलेलें आहे असें चित्र डोळ्यांसमोर उभें राहतें. खरोखरच रिगा ही वर्तमानपत्री कचेऱ्यांची पेठच आहे. त्या शहराला भौगोलिक स्थान असेल, आपापल्या धंद्यांत मग्न असलेले लोक तेथें असतील, ते खात–पीत असतील, झोंप घेत असतील, कदाचित् त्यांना मोटारींचीं सुखस्वप्नेंही पडत असतील. पण मला त्याचें कांहींच ज्ञान नाहीं! एकदां अत्यंत तीव्र जिज्ञासा उत्पन्न झाली म्हणून 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका'चा विभाग उघडून 'रिगा' शब्द काढला. चालू माहितीच्या त्या खाणींत काय सांपडलें पहा. रिगा हें एक बाल्टिक समुद्राच्या किनाऱ्यावर भरभराटलेलें असें बंदर आहे, व तेथून इंग्लंडला धान्यधुन्य रवाना होतें. अर्थात् 'एन्सायक्लोपीडिया'ची ती एक जुनी प्रत असली पाहिजे. आजची स्थिति पाहिली तर धान्याच्या व्यापारापेक्षां गप्पांचा धंदाच तेथें अधिक फैलावला आहे!

" उत्कृष्ट सेवेबद्दल शहरांना जर कांहीं अलंकारभूषणें द्यावयाचीं असतील तर पाश्चिमात्य जगानें रिगा शहराला पहिलें व सर्वांत उच्च प्रकारचें पारितोषिक द्यावयास पाहिजे बातमीपत्रावर कोंपऱ्यांत तारखेशेजारीं 'रिगा' ( Riga ) एवढींच चार अक्षरें लुकलुकत असावयाचीं. पण केवढा त्यांचा प्रभाव! तो शब्द म्हणजे सोव्हिएट संस्थांच्या आक्रमणापासून पश्चिम युरोपखंडाचें ध्येय व तत्त्वज्ञान आहे त्या स्थितींत पवित्र, अखंड व अबाधित राखणारा असा एक तटच होता. सोव्हिएट संस्थांच्या कावेबाज चळवळींपासून जगाचा बचाव रिगा शहरानें केला. त्याच्या अभेद्य तटबंदीवर रशियाविषयींचीं लालभडक असत्य विधानें आदळून त्यांच्या ठिकऱ्या उडत!"

प्रकरण दुसरें

# प्रवास

मास्को येथें परदेशांशीं सांस्कृतिक संबंध वाढविण्याच्या उद्देशानें निघाले-ली त्याच नांवाची ( सोसायटी फॉर कल्चरल रिलेशन्स वुइथ फॉरिन कंट्रीज ) एक संस्था आहे. इ० सन १९२७च्या नोव्हेंबर महिन्याच्या प्रारंभीं होणाऱ्या रशियन राज्यक्रांतीच्या दहाव्या वाढदिवसाच्या समारंभास हजर राहाण्याबद्दल आम्हांस निमंत्रण होतें. सर्व देशांतील मिळून पुष्कळ स्त्री-पुरुषांना आमंत्रण-पत्रें पाठविण्यांत आलीं होतीं. व तीं देखील फक्त समाजसत्तावादी लोकांनाच नव्हे, तर उच्च प्रतीचे अध्यापक, शास्त्र-वेत्ते आणि इतर नामांकित गृहस्थ यांनाही पाठविण्यांत आलीं होतीं. मला वाटतें सात-आठशें माणसांनीं या निमंत्रणाला मान दिला. आम्हांलाही अवधी फार थोडा होता व मास्कोचा प्रवास अत्यंत दूरचा, तरी पण अगदीं ऐन वेळीं आमचा जाण्याचा निश्चय कायम झाला. आम्ही बर्लिनहून निघालों व सबंध पोलंड देश पायाखालीं घातला. हा प्रवास फारच कंटाळवाणा वाटला व त्यांत नमूद करण्या-सारखें असें कांहीं घडलेंही नाहीं. पोलंड देश ओसाड व उदास दिसला. एका वॉरसॉ शहराखेरीज बाकीचीं स्टेशनें म्हणजे अगदीं बाजूला कोठें तरी घरांसारखीं असावयाचीं व फार झालें तर त्यांच्या आसपास चार राहतीं घरें. याच्या पलीकडे कांहीं नाहीं. पोलंड अगर कोणती-ही पोलिश गोष्ट निघाली कीं, आमच्या जर्मन वाटाड्याच्या कपाळाची तिडीक उठावयाची. त्याची अशी भावना होती कीं, सुधारणा म्हणतात ती जर्मन सरहद्दीपर्यंतच. ती मर्यादा ओलांडली म्हणजे सुधारणा संपली व पोलंड म्हणजे एक रानटी लोकांचें राष्ट्र. एकंदर देखावा जो ओसाड दिसला तो कदाचित् ऋतुमानामुळें असेल. कारण

तो हिंवाळ्याचा आरंभ होता. पण उद्योगप्रधान देशांत हिंवाळ्याचें देखील कांहीं चालत नाहीं. आम्हांला जो देखावा दिसला त्यावरून तरी उद्योगधंद्यांचीं फारशीं चिन्हें असावींत असें वाटलें नाहीं.

बर्लिन सोडल्यानंतर अठ्ठावीस तासांनीं, म्हणजे नोव्हेंबरच्या ७ तारखेस, रात्रीं आम्ही नीगेरोलोजे या ठिकाणीं रशियाच्या सीमेपाशीं दाखल झालों. आम्ही येऊन पोंचण्यापूर्वीं थोडा वेळ जकातखात्याचा एक रशियन अधिकारी आम्हांपाशीं आला. पाहुणे म्हणून आम्ही समारंभास जात आहों कीं काय, असें त्यानें विचारलें आणि त्याला जेव्हां तें कळलें तेव्हां त्यानें आमचें सर्व सामानसुमान आपल्या ताब्यांत घेतलें व जकात माफ केल्याचें सांगितलें.

हें सीमाप्रांतावरचें स्टेशन निशाणांनीं वगैरे शृंगारलें होतें. जिकडे तिकडे तांबडीं निशाणें फडकत होतीं व सोव्हिएट पद्धतीचीं प्रधानचिन्हें म्हणजे घण व कोयता हीं सर्वत्र टांगलीं होतीं. लेनिनप्रभृति अग्रणींचीं चित्रें व अर्धपुतळेही चोंहींकडे विराजमान झालेले दिसत होते. तो वाढदिवस होता. बोल्शेव्हिक लोकांनीं राज्याचीं सूत्रें आपल्या हातांत घेतल्यास दहा वर्षें नुकतींच पूर्ण झालीं होतीं व अखिल रशिया देश त्या समारंभाच्या कार्यक्रमांत मग्न झाला होता.

आमचें जेवणखाण अगोदरच उरकलें होतें. पण स्टेशनवरच्या मंडळींनीं आपल्या हिंदी पद्धतीप्रमाणें फार आग्रह केला आणि आम्हांस जेवल्याशिवाय सोडीतना. त्यांच्या विनंतीचा अव्हेर करणें अशक्य झालें. आम्हांस फक्त इंग्लिश व फ्रेंच या दोनच भाषा अवगत असल्यामुळें संभाषणाची थोडी पंचाईत झाली. त्या मंडळींना इंग्लिश कशाशीं खातात तेंही माहीत नव्हतें आणि फ्रेंच आपलें नांवाला येत होतें. जर्मन भाषा मात्र त्यांना साधारण बरी येत होती. अखेरीस थोडेसें फ्रेंच जाणणारा एक मनुष्य उभा करण्यांत आला व त्यानें

६८३३ रा.हि. नं.

आमच्या दुभाष्याचें काम केलें. आम्हांला एक लहानसेंच कार्य करा-वयाचें होतें. तें म्हणजे आमच्या स्वागतार्थ जें भाषण झालें होतें त्यास उत्तर देण्याचें. सुमारें वीस खेडेगांवांतील मंडळी बायकामुलां-सह जमली होती व समारंभांत उत्साहानें भाग घेत होतीं. कदाचित् माझ्या पत्नीच्या व बहिणीच्या साडीचें त्यांना फार कौतुक वाटलें असेल ! नंतर आम्ही त्या खोलींतील सर्व व्यवस्था पाहिली आणि तेथील चित्रें व जाहिराती यांचा अर्थही आम्हांला स्पष्ट करून सांगण्यांत आला. लेनीनची पूजा कोणत्या प्रकारें रशियामध्यें होत असेल याचा पहिलाच अनुभव आम्हांस त्या वेळीं चाखावयास मिळाला. जेव्हां जेव्हां 'लेनीन' हें नांव उच्चारिलें जाई तेव्हां तेव्हां प्रेक्षकांचे चेहेरे विशेष खुलून दिसत. असहकारितेच्या अमदानींत राष्ट्रीय सभेच्या शिष्टमंडळानें एखाद्या लहानशा गांवाला भेट द्यावी त्याप्रमाणें या बाजूच्या लहानशा स्टेशनवरील आमचें हें रहाणें होतें असें म्हटलें तर तें अगदीं योग्य होय.

नीगेरोलोजे येथून आम्ही रशियाच्या आगगाडींत बसलों. आमचें स्वागत करणाऱ्या मंडळीनें आमची डब्यांतील जागा वगैरे राखून ठेव-ण्याची व्यवस्था केली होती व त्यामुळें आमचा प्रवास मोठा सुखाचा झाला. रशियामध्यें आगगाडीचा फक्त एकच वर्ग असतो. परंतु निजण्याकरितां कांहीं स्वतंत्र डबे असतात. त्यांत आमची व्यवस्था केली होती. रात्रभर प्रवास करून दुसऱ्या दिवशीं दोन प्रहरीं आम्ही मास्को येथें येऊन दाखल झालों. वाढदिवसाच्या निमित्तानें वाटेंतील सर्व स्टेशनें निशाणांनीं व चित्रांनीं सुशोभित करण्यांत आलीं होतीं. स्टेशनांवर आम्हांस जीं वायकामुलें आढळलीं त्यांच्या अंगावर व्यवस्थित कपडेलत्ते होते, आणि कांहीं कांहींनीं तर

घोट्यापर्यंत लोंबणारे लांब आंगरखे आणि गुडघ्यापर्यंत पोहोंचणारे मोठे रशियन बूट घातले होते.

मास्को 'येथें कलचरल सोसायटी'चे कांहीं प्रतिनिधि आणि कांहीं अपरिचित हिंदी लोक आमच्या स्वागताकरितां आलेले आम्हांला भेटले. श्रीयुत एस्. जे. सकलातवाला हे आमच्या पूर्वींच येथें येऊन राहिले होते. मास्को येथील ग्रँड हॉटेलमध्यें आम्ही गेलों. हें हॉटेल रशियन क्रान्तीच्या अगदीं उगमस्थानीं वसलेलें होतें. त्याची इमारत बरीच भव्य असून तिच्या पूर्वकालच्या वैभवाची व चैनबाजीची साक्ष पटविणारीं बरींचशीं चिन्हें दिसत होतीं. तथापि अस्तित्वांत असलेल्या राज्यपद्धतीशीं ही श्रीमंती विजोड दिसत असल्याकारणानें त्या खाणाखुणा जवळजवळ सर्व झांकून टाकण्यांत आल्या होत्या.

एखाद–दोन दिवस अगोदर यावयास पाहिजे होतें असा विचार मनांत येऊन आम्हांला बराच खेद झाला. कारण वाढदिवसाचा मुख्य समारंभ आम्ही येण्यापूर्वींच साजरा होऊन गेला होता. त्या दिवशीं रशियांतील प्रत्येक भागांतून कामकरी व मुलें एकत्र होऊन तीं व लाखों सैनिक अशीं लेनीनच्या थडग्यासमोरून प्रणामपूर्वक मिरवणुकींत गेलीं. रशियन यूनियनचा (संघ) उच्च असा पदवीवर अधिकारी असूनही सदैव शेतकऱ्याचा पोशाख घालणारा असा शेतकरी अध्यक्ष कालिनीन यानें थडग्यापाशीं उभें राहून प्रणामांचा स्वीकार केला. सकाळपासून संध्याकाळपर्यंत कामकऱ्यांच्या राष्ट्रगीताच्या तालावर ही मिरवणूक चालूच होती. आघाडीस सर्व प्रकारचे सैनिक आणि त्यांच्या मागें कारखान्यांचे, विद्यापीठांचे, शाळांचे, खेडेगांवांचे प्रतिनिधि असा क्रम होता. शेतकरी आणि कामकरी मुलांबाळांसह चाळीस–चाळिसांच्या रांगा करून डोक्यावर निशाणें फडफडवीत अत्यंत उत्साहानें चालत होते. मधून

रा. ग्रं. नं. ४८९ ... ४८३३

मधून चेंबरलेन, ब्रियांड आणि बॉल्डवीन, वगैरे मुत्सद्दयांच्या आकृति फार चातुर्यानें बनविण्यांत आल्या होत्या, त्याही मिरवणुकींत सामील केल्या होत्या. चेंबरलेनच्या आकृतींत कोयता खुपसून डोक्यावर घण पडत आहेत असा देखावा दाखविला होता. शेवटीं काळोख पडल्यावर कोसॅक घोडेस्वारांच्या तुकडीनें " लाल चौका "-(Red-square)मधून झपाटयानें जाऊन वीर्यशालीपणाचा हल्ला चढविला अशा प्रकारची हकीगत आमच्या कानीं पडली. या समारंभाचें वर्णन जों जों आम्हीं अधिक ऐकलें तों तों आम्ही हा स्फूर्तिदायक देखावा पहाण्यास समक्ष हजर नव्हतों याबद्दल आम्हांस अधिकाधिक वाईट वाटूं लागलें.

प्रकरण तिसरें

# मास्को येथें काय दिसलें ?

रस्त्यावर लोकांची चिकार गर्दी होती. बहुतेकजण पादचारीच होते. जिकडे तिकडे जनसमूह दिसत होते, पण सर्व लोक रस्त्यांच्या नियमांप्रमाणें आपलें मार्गक्रमण करीत होते त्यामुळें कोठेंही कोणास अडखळून थांबावें लागत नसे. पोलिस लोक सर्व वाहतुकीचें चांगलें नियंत्रण करीत होते. वाहनें वगैरे फार नसल्याकारणानें त्यांचें काम इतर शहरांपेक्षां पुष्कळ सोपें होतें. विजेच्या ट्रामगाड्या व मोटारी नव्हत्या असें नाहीं. खाजगी गाड्या व भाड्याच्या गाड्या याही नव्हत्या असें नाहीं. पण पॅरिस, बर्लिन किंवा लंडन या शहरांच्या मानानें कांहींच नाहीं. सोव्हिएट रिपब्लिकच्या दहाव्या वाढदिवसाच्या निमित्तानें जनसंमर्द नेहमींपेक्षां मात्र जास्त होता.

या समारंभासाठीं शहरभर पताका, निशाणें वगैरे झळकत होतीं. सर्वत्र लाल बावटे दिसत होते व मजूर आणि शेतकरी यांची निशाणी म्हणून घण व कोयता या दोन खुणा दृग्गोचर होत्या. लेनिनचीं चित्रें पुष्कळ ठिकाणीं टांगलेलीं होतीं व दहा वर्षांचा निदर्शक म्हणून X हा आंकडाही बहुतेक स्थळीं विराजमान होता. रात्रीच्या वेळीं हीं चिन्हें दृश्यमान होण्यासाठीं दिव्यांची रोषणाई खूप असे व मौज अशी कीं, विजेच्या दिव्यांचे ग्लोब देखील तांबड्या रंगाचे असत. क्रान्तीचा व्यंजक म्हणूनच केवळ नव्हे, तर एरवींही रशियन लोकांना लाल रंग जरा अधिक प्रिय असतो. रशियन भाषेंत या रंगाला जो शब्द आहे त्यानें लाल व सुंदर असा संयुक्त अर्थ व्यक्त केला जातो. क्रांति होण्याच्यापूर्वींही क्रेमलिन या राजवाड्याच्या बाजूच्या व लेनिनच्या थडग्यानजीकच्या चौकाला ‘लाल चौक’ ही संज्ञा होतीच.

प्रथमच पाहिल्याबरोबर मास्को हें एक फार मोठें शहर आहेसें वाटतें; पण मागाहून या मतांत फरक पडतो आणि इतर पाश्चिमात्य शहरांहून मास्को कांहीं निराळेंच आहे असें वाटूं लागतें. असंख्य सोनेरी घुमट, जंगी चौक व रुंद रस्ते यांनीं तर तें शहर सुंदर दिसतें यांत शंका नाहीं. खिस्ती देवळांची तेथें बरीच दाटी आहे. एकंदर दोनशें देवळें आहेत म्हणतात. कांहीं मोठ्या मंदिरांचें प्रदर्शनांत किंवा संग्रहालयांत रूपांतर केलें आहे; पण बाकीचीं मात्र धर्मनिष्ठांना मोकळीं ठेवण्यांत आलीं आहेत. अर्थात् देवदर्शन धर्म वगैरे गोष्टींना सोव्हिएट सरकार उत्तेजन देत नाहीं. धर्माविरुद्ध चळवळ करणाऱ्या पुष्कळ संस्था रशियांत आहेत. शिक्षण तर सर्वस्वीं ऐहिक व धर्मापासून अलिप्त असें ठेवण्यांत आलें आहे. ज्यांना देवळांत जावयाचें असेल त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे निर्बंध नाहींत. खेडेगांवचे पुष्कळ लोक अजून देवळांत जातात देखील. अगदीं क्रेमलिन राजवाड्याला लागून कुमारी मेरीचें पुरातन देवालय आहे व त्याच्या पावित्र्यामुळें लांबलांबचे लोक दर्शनाकरितां तेथें जमतात. त्यांना कोणी बंदी करीत नाहीं. तथापि शेजारच्या भिंतीवर कांहीं अक्षरें ठळकपणानें लिहिलेलीं जाणारास दिसतात. तीं अक्षरें म्हणजे दुसरीं तिसरीं नसून कार्लमार्क्सचें 'धर्म जनतेला अफूप्रमाणें आहे' हेंच प्रसिद्ध वाक्य होय.

मास्कोइतकी पोषाखाच्या बाबतींत विविधता फारच थोड्या पाश्चिमात्य शहरांत दिसून येते. पॅरिस शहर हें सर्व युरोपखंडांतील राष्ट्रांचें केंद्र. तेथें म्हटलें म्हणजे बारा बंदरांचे लोक दृष्टीस पडावयाचे. पण ते सर्व एका सांच्याच्या पोषाखाचे. फक्त आपल्या हिंदी स्त्रियांच्या साड्यांनींच काय वेगळें वळण दिसेल तेवढेंच. परंतु मास्को येथें मात्र तसें नाहीं. आशियाखंडाचें प्रतिबिंब त्यांत पडलेलें दिसतें. आणि तें देखील केवळ उष्णकटिबंधांतील खंड नव्हे, तर पूर्व, उत्तर वगैरे सर्व

थंड भागांची व विस्तीर्ण मैदानांची पडछाया त्या शहरांत दिसते म्हटलें तरी वावगें नाहीं. अवजड बूट तेथें टाप टाप आवाज करतात; लांब डगले व टोप्या यांच्या तऱ्हा तर वाटतील तेवढ्या. पोषाखांतील ही विविधता व विचित्रपणा लोकांच्या अंगवळणीं पडलेला आहे व त्यांचें तिकडे फारसें लक्षही जात नाहीं. माझ्या कुटुंबाच्या व बहिणीच्या साड्या जरा डोळ्यांत भरण्यासारख्या व आश्चर्यकारक होत्या; परंतु बर्लिन किंवा पॅरिस येथें जितकें लोकांचें लक्ष त्यांच्याकडे गेलें त्यापेक्षां कमी मास्को येथें गेलें.

मास्को येथें गेल्यावर खरा जो फरक अनुभवास येतो तो वातावरणाचा व हवेचा. हा अनुभव दिवसेंदिवस चांगलाच दृढ होऊं लागतो. गजांत लक्ष्मी व अठराविस्वे दारिद्र्य यांचा विरोध दिसत नाहीं व एखाद्या विशिष्ट जातीच्या अथवा वर्गाच्या अधिकाराचा बडेजावही नाहीं. रेल्वेच्या स्टेशनावरील हमाल असो किंवा उपाहारगृहांतील वाढपी असो, सारेच एकमेकांचे 'तवारीश' म्हणजे बंधु (Comrade) व परस्परांनीं हांका मारावयाच्या त्या देखील याच टोपणनांवानें. योग्यता किंवा दर्जा ठरविण्याचें माप संपत्ति नव्हे व पगाराचा लठ्ठपणाही नव्हे. कॉम्यूनिस्ट पक्षाच्या मोठ्या अधिकाऱ्याचा पगार म्हणजे दरमहा अवघा २२९ रुबल् किंवा तीनशें रुपये! रशियन यूनियनच्या अध्यक्षाचा हाच पगार. एखादा सामान्य कारकूनही साधारणपणें इतकेंच मिळवितो. अध्यक्षाला राहण्यास जागा, हिंडण्यास एखादी मोटार अशा कांहीं सोयी जास्त, इतकाच फरक. खेड्यांतील खेडवळ अथवा गिरणींतील मजूर अध्यक्षाला भेटावयाचा तो समानतेच्या नात्यानें व जसा कांहीं तो आपल्याच बैठकींतील असा, थोडा अधिक हुशार व लायक, याहून विशेष नाहीं या बुद्धीनें. त्याच्याशीं बोलणें—चालणें करावयाचें तें 'बंधु' असें संबोधून.

बहुतेक सर्व मोटारगाड्या सरकारी असावयाच्या किंवा संस्थांच्या मालकीच्या—म्हणजे सोव्हिएट संघ, कामकरी संघ, गिरण्या, सहकारी संघ यांच्या. कांहीं भाड्याच्याही असत; परंतु अगदीं खाजगी अशा गाडया औषधालाही नव्हत्या.

मोठमोठालीं दुकानें व संग्रहालयें होतीं आणि बाहेरून तीं इतर देशांतील दुकानांप्रमाणें दिसत; पण सर्व मोठालीं दुकानें सरकारच्या मालकीचीं. फक्त छोटीं छोटीं मात्र लोकांच्या वैय्यक्तिक मालकीचीं असावयाचीं. किरकोळ जिन्नस दारांवर विकणारे फेरीवालेही होते. सामान्यतः दुकानांत दिसणारा माल साधा असे. मालाचा दिखाऊपणा व भपकेबाजपणा म्हणण्यासारखा नसे. लंडन व पॅरिस या शहरीं दिसून येणारा छानछोकीपणा मुळींच नसे म्हटलें तरी चालेल. रस्त्यावरील वाटसरू मोठ्या ऐटबाज पेहेरावांत असत असें नाहीं. कॉलर आहे तर आहे, नाहीं तर नाहीं, मानेभोंवतीं टाय असला तरी वाहवा, नसला तरी वाहवा, असेंच असावयाचें. पुष्कळांना तर असली ऐट चालविणें अशक्य वाटावयाचें. चैनबाजी करण्याचें सामर्थ्य असणें वा नसणें हा प्रश्न वेगळाच. ती करण्यांत पैसा व वेळ घालविणें हा एक श्रीमंतीचा दोष आहे असेंच मानण्यांत येई.

मोठया चौकांत ध्वनिवाहक यंत्रें बसविलेलीं असत. त्यांतून रोजची ताजी वातमी, गाणीं आणि मधून मधून संशयखोर लोकांचें व इकडे तिकडे करणाऱ्या लोकांचें समाधान करण्यासाठीं राजकीय भाषणेंही ऐकविलीं जात. जगापुढें आपलें तत्त्वज्ञान ठासून मांडण्याची संधि कोणीही कॉम्यूनिस्ट फुकट दवडणार नाहीं !

आम्ही एकदां सरकारी नाटकगृहांत गेलों होतों. तें झारशाहींत बांधलेलें असून फार भव्य असें आहे. त्यांत एकावर एक सात

सोनेरी मजले आहेत. झारच्या कारकीर्दींत श्रीमंत व चैनी लोकांचा तें नाटकगृह म्हणजे मोठा अड्डाच होता. आम्हांला दिसले ते प्रेक्षक मात्र वेगळ्या पद्धतीचे. तें गृह नेहमींच्या पोषाखांतील लोकांनीं गजबजून गेलें होतें. कित्येकांच्या अंगावर कोट नव्हते. कांहीं जण तर नुसतें कुडतें घालूनच आले होते. चार लोकांत जावयाचें म्हणून नटण्या-थटण्याचा कोणीं प्रयत्नदेखील केलेला नव्हता. तो समूह घरगुती दिसणाऱ्या लोकांचा जसा कांहीं होता. बुद्धिवान् लोक, कामकरी, शेतकरी सर्व एकाच तऱ्हेचे. मधून मधून कांहीं मुलेंबाळें इकडे तिकडे नाचत-बागडत होतीं. रंगभूमीवर नाच, गाणीं इत्यादि कार्य-क्रम झाला, तो मनोरंजक झाला व प्रेक्षकांना तो इतका आवडला कीं, वरचेवर ते 'वन्स मोअर' देत. दहा दहा वर्षांच्या एका मुला-मुलीच्या जोडीनें तर नर्तनकौशल्याची बहार केली. मुख्य कार्यक्रम म्हणजे झारशाहींतील एका साठ वर्षांच्या वृद्ध नर्तनपटु बाईच्या नाचाचा होता. नर्तकी वयानें साठी उलटलेली खरी; पण दिसण्यांत एखाद्या तीस वर्षांच्या तरुण स्त्रीप्रमाणें तरतरीत होती. तिनें आपल्या चपलपणानें व चातुर्यानें सर्वांस थक्क केलें ! कला व सौंदर्य यांच्या दृष्टीनें इतका सुंदर देखावा जगांत इतरत्र फारच विरळ दिसणार.

एक चित्रपटही आम्हीं पाहिला. 'पेट्रोग्रॅडचे शेवटचे दिवस' असें त्या पटाचें क्रान्तिकारक नांव होतें. चित्रपटाचें कलाकौशल्य व सौंदर्य यांविषयीं रशियन लोकांची ख्याति आहे. दुर्दैवानें हिंदी लोकांना त्यांचे चित्रपट पहावयास मिळत नाहींत. आम्हांला अमेरिकेंतील हॉलीवुडचे ( चित्रपटांचा कारखाना ) पोकळ, बढाई-खोर व दिखाऊ चित्रपट पाहून पाहून वीट येण्याची पाळी आली आहे. आम्हीं पाहिलेल्या चित्रपटांत झारशाहींतील श्रीमंती आणि दारिद्र्य यांमधील विरोध, लढाईंतील शहारे आणणारे देखावे वगैरे

दाखविले होते. झारचा निःपात, केरेन्स्कीचें अधिकारी-मंडळ, केरेन्स्की व बोल्शेव्हिक लोक यांचा सत्तेसाठीं झगडा आणि कळस म्हणून लेनिनचा विजय असे देखावे परिणामकारक रीतीनें चित्रित करण्यांत आले होते. तो चित्रपट खरोखर फार जोरकस व रोमहर्षण होता आणि चळवळीला त्याचा जबरदस्त उपयोग झाला असला पाहिजे.

राज्यक्रान्तीच्या दिवसांतील एका प्रदर्शनांत आम्ही गेलों होतों. जुन्या जमान्यांतील इंग्लिश क्लबाची जी इमारत तीच प्रदर्शनाला देण्यांत आली होती. इंग्लिश क्लब म्हणजे इंग्लिश गृहस्थांचा क्लब नव्हे. इंग्लिश पद्धतीनें चालविलेला क्लब म्हणूनच त्याला हें नांव देण्यांत आलें होतें. प्रदर्शनांत पुष्कळ चित्ताकर्षक वस्तु होत्या; पण एकंदरीनें आमची निराशाच झाली असें म्हणावें लागतें. आम्ही एक कला-मंदिरही पाहिलें व आशियाटिक रशिया, तुर्कस्थान वगैरे देशांतील चित्रें तेथें पाहून आम्हांला विशेष मौज वाटली.

झारशाहींतील सरदारांच्या दिवाणखान्याला ( नोबल्स हॉल ) आतां कामकरी-संघाचा दिवाणखाना म्हणतात. याच दिवाणखान्यांत रशिया-च्या मित्रांची परिषद भरली होती. दिवाणखाना मात्र अत्यंत मनोहर होता यांत संशय नाहीं.

क्रेमलिन नांवाचा टोलेजंग राजवाडा, त्याचे भव्य मनोरे वगैरे आम्हीं अर्थात् पाहिलेच. संघाचा अध्यक्ष कॅलीनिन याची भेट घेण्या-साठींच आम्हीं राजवाड्याच्या आंत पाऊल ठेवलें असेल तेवढेंच. इतर वेळीं आम्हीं उगीच राजवाड्यांत कधीं प्रवेश केला नाहीं. कॅलीनिन दोन–तीन खोल्यांत आपला प्रपंच थाटून रहात असे. त्यांतील खुर्च्या-टेबलें बेताबाताचीं होतीं व तेथें सुखविलासाचें किंवा चैनबाजीचें एकही चिन्ह दृष्टीस पडलें नाहीं.

क्रान्तीमुळें रशियांतील पुष्कळ गोष्टींत फरक झाला आहे; परंतु

'ड्रॉस्की' मात्र आहे तशी आहे. ही एक चार चाकी घोड्यांची जुनी गाडी आहे. ही पौराणिक गाडी लोक कां वापरीत याचें मोठें कोडें वाटे. तींत एक मनुष्य, फार फार म्हणजे सडपातळ दोन माणसें बसावयाचीं व वेग म्हणजे अवघा तासीं सहा मैल.

क्रान्तीनंतर रस्त्यांतील भिक्षेकऱ्यांना आळा बसला आहे असें नव्हे. आम्हांला पुष्कळ भिकारी भेटत. कित्येकदां तर तरुण बायका हातांत पोरें घेऊन भीक मागत. पूर्वीपेक्षां भिक्षेकरी कमी झाले आहेत असें कॉम्यूनिस्ट लोक सांगत; पण त्यांची पिढीजात भीक मागण्याची संवय घालविणें महाकठीण कर्म!

मास्को येथें आमचें वास्तव्य अल्पावधीचें. तेवढ्यांत किती पाहणार? तथापि थोडक्या वेळांत कां होईना, आमचें मन शहराचें सौंदर्य पाहून मोहून गेलें. तेथून पाय काढतांना फार खेद झाला; सूर्यकिरणांनीं चकाकणारीं मास्कोचीं सुवर्ण–शिखरें पुन्हा पाहण्याची संधि प्राप्त व्हावी, आणखी एकदां पूर्व-पश्चिम भागांतील विचित्र गृहस्थांनीं गजबजलेले ते रस्ते व चौक डोळ्यांस दिसावे, अशी इच्छा करीत करीत आम्हीं मास्को शहर सोडलें!!

प्रकरण चवथें

# सोव्हिएट राज्यपद्धति

सोव्हिएट राज्यपद्धति बोल्शेव्हिझम् व रशिया यांच्याशीं इतकी एकरूप झाली आहे कीं, तिचा त्यांच्याहून निराळा असा विचारच करतां येईनासा झाला आहे. वास्तविक पाहिलें तर कॉम्यूनिझम-शिवाय सोव्हिएट पद्धति अस्तित्वांत येऊं शकते, निदान तिची बाह्य रचना तरी अस्तित्वांत येऊं शकते. रशियाचे एक पळपुटे माजी झार, कीं ज्यांना अजूनही आपण क्रेमलिनच्या राजवाड्यांत सिंहासनाधिष्ठित होऊं अशी आशा आहे, त्यांनीं कॉम्यूनिझम—व्यतिरिक्त सोव्हिएट राज्यपद्धति पसंत असल्याचें व तीच चालू ठेवण्याचें कबूलही केलें. व्यावहारिकदृष्ट्या प्रचलित रशियन राज्यपद्धति व सोव्हिएट राज्यपद्धति ह्या एकच होत असें गृहीत धरण्यास कांहीं हरकत नाहीं.

इंग्लंडमध्यें रॉबर्ट ओवेन यांनीं काढलेल्या कामकरी-महासंघ (Grand National Consolidated Trade Union) या संस्थेचे एक अग्रणी जेम्स स्मिथ यांनीं प्रथमतः सन १८३४ मध्यें सोव्हिएटची कल्पना प्रायः मूर्त स्वरूपांत आणली. पुढें सन १८४७ सालीं मार्क्स व एंजल्स यांचा सुप्रसिद्ध कॉम्यूनिस्ट जाहीरनामा निघाला. हाच जाहीरनामा आजच्या समाजसत्तावादाचा मूळ जनक. एक पिढी उलटल्यावर म्हणजे सन १८७१ सालीं पॅरिस शहरीं ‘कॉम्यून’चें औटघटकेचें दुःखद राज्य झालें. या ‘कॉम्यून’चा उत्पादक लुई ऑगस्ट ब्लँकाय यांनीं ‘क्रान्तीच्या काळीं तात्पुरतें कामकऱ्यांचें पूर्ण स्वामित्व असावें’ या तत्त्वाचा स्पष्टपणानें पुरस्कार केला. ‘कॉम्यून’ अस्तित्वांत येण्यापूर्वीं एकच दिवस ब्लँकाय यास तुरुंगांत टाकण्यांत आलें. त्याच्या बंदिवासामुळें नवी राज्यपद्धति

त्याच्या कार्यक्षम नेतृत्वास मुकली. ती नष्ट झाली व थीअर्स आणि त्याचे सेनापति यांनीं तीस हजार लोकांच्या रक्ताचे पाट पॅरिसमधून क्रूरपणानें वाहविले ! ही गोष्ट आज केवळ स्मृतिशेष होऊन राहिली आहे; पण ती स्मृति मात्र जिवंत व जाज्वल्य अशी आहे. पॅरिसच्या स्मशानभूमीच्या ज्या भिंतीपाशीं या लोकांना तोफेच्या तोंडीं देण्यांत आलें ती जगांतील सर्व प्रकारच्या समाजसत्तावाद्यांना तीर्थासारखी पवित्र वाटते.

सन १९०५ च्या राज्यक्रांतींतच रशियांतील सोव्हिएट राज्यपद्धतीला नीटनेटकें रूप प्राप्त झालें. तिची सारखी वाढ होत गेली; तींत कांहीं फेरफार घडून आले, ते दृढ झाले आणि शेवटीं १९१७सालीं ती पद्धति सत्तेच्या सर्व केंद्रांच्या ठिकाणीं सुप्रतिष्ठित झाली. बोल्शेव्हिक राज्यक्रांतीनंतर तिची प्रगति फार झपाट्यानें झाली व तेव्हांपासून बदलत्या परिस्थितीला अनुसरून तिची घडी बसविली जात आहे.

समाजांत निरनिराळे सामाजिक संघ अगर वर्ग असतात व त्या प्रत्येकाचे आर्थिक हितसंबंध वेगवेगळे असतात ही वस्तुस्थिति उघडपणें मान्य करणें, हें या सोव्हिएट पद्धतीचें प्रधान लक्षण होय. जोंपर्यंत ही स्थिति आहे तोंपर्यंत प्रत्येक राज्यपद्धतींत या सामाजिक वर्गांच्या तुलनात्मक महत्त्वाचें व बलाचें प्रतिबिंब दृष्टोत्पत्तीस पडलें पाहिजे. इतिहासाच्या वाहत येणाऱ्या अखंड प्रवाहावर झालें तरी या भिन्नभिन्न सामाजिक वर्गांच्या परस्पर लढ्याचीच छाया पडलेली दिसते. इतिहासाचा ग्रंथ अर्थशास्त्राच्या दृष्टीनें लावावयाचा तो असाच; किंवा ऐतिहासिक व्यवहारज्ञान म्हणतात तें हेंच. एकेक ऐतिहासिक कालविभाग घेतला तर असें दिसून येतें कीं, एक अधिकारी व प्रभुत्व गाजविणारा वर्ग असावयाचा आणि या वर्गाचें प्रस्थ आणखी मजबूत होण्यास व त्याची मुदत वाढविण्यास मदत होईल इतक्या बेतानें

बाकीच्या वर्गांच्या हिताची काळजी घ्यावयाची; परंतु बाकीच्या वर्गांवर चालणारें एका विशिष्ट वर्गाचें हें आधिपत्य राज्यपद्धतींत स्पष्टपणानें व उघडपणानें असलेंच तर फार क्वचित् नजरेस पडावयाचें. त्या आधिपत्याखालीं रगडल्या जाणाऱ्या वर्गास फसविण्यासाठीं राज्यपद्धतीवर नाना तऱ्हेचे वेष चढविण्यांत येतात. जेथें स्थित्यंतर फार सावकाश घडून येतें तेथें तर हा प्रभावी वर्ग स्वतःची सत्ता टिकविण्याकरितां कर्तव्यें व हक्क यांचा जणुं ताम्रपटच आपल्यास मिळाल्याचा आभास उत्पन्न करतो. समाजाची जसजशी प्रगति होत जाते तसतसे नवीन व उच्च प्रकारचे सामाजिक आणि आर्थिक घटक निर्माण होतात व त्यांवर उभारलेले नवीन वर्ग पुढें येतात. प्रगतीच्या मार्गांत अडथळे उत्पन्न करणाऱ्या जुन्या वर्गांना मागें सारून हे नवीन वर्ग क्रमशः अग्रभागीं सरकतात.

जो प्रभावी वर्ग त्याच्याच हातांत अर्थात् जनतेची संस्कृति, शिक्षण, कायदे आणि आचारविचार हें सारें असावयाचें. पण विशेषें करून जेव्हां एखादा प्रतिस्पर्धी वर्ग जोर करूं लागतो आणि आपले हक्कही गाजवूं लागतो तेव्हां अधिकारपदावर असलेला वर्ग आपलें वर्गवैशिष्ट्य झांकून ठेवतो. प्रस्तुतची लोकशाही म्हटली तरी, कॉम्यूनिस्टांच्या मतानें, विशिष्ट वर्गाचीच ‘शाही’ आहे. फरक एवढाच कीं, धूर्तपणानें तिचें खरें स्वरूप दृष्टीआड केलें आहे ! वस्तुतः ती सामाजिक अथवा मानवी लोकशाही नाहींच. काल्पनिक समतेच्या नांवानें समाजाचे वेगवेगळे भाग करावयाचे व प्रभावी वर्गाचें एक जबरदस्त असें श्रीमंतांचें सरकार उत्पन्न करावयाचें कीं, त्याच्यापुढें व्यक्ति अथवा विभागलेले सामाजिक वर्ग दुर्बळ व्हावेत, हें आजच्या लोकशाहीचें सत्यस्वरूप. दुसऱ्या वर्गांचें संघटन करूं लागलें म्हणजे या लोकशाहींत अंतर्भूत असलेलें एका विवक्षित वर्गाचें आधिपत्य उघड-

कीस येऊं लागतें. आपली आजची लोकशाही अशा सर्व संस्थांचें निर्दयपणानें नरडेंच दाबून टाकते.

रशियांत सोव्हिएट संस्था प्रथम उदय पावल्या त्या कामकऱ्यांच्या वर्ग-विशिष्ट संस्था म्हणून. खुद्द मजूर-संघापासून या वेगळ्या होत्या. मजूरसंघांतील प्रगतिपर लोक मात्र त्यांत भाग घेत व इतरांशीं मिळून मिसळून वागत. इ० सन १९१७ सालीं केरेन्स्कीच्या कारकीर्दींत या सोव्हिएट संस्थांची सत्ता वरीच बलिष्ठ झाली. लेनिननें जेव्हां 'सोव्हिएंट संस्थांना सर्व अधिकार द्या' या ब्रीदवाक्याची घोषणा केली तेव्हांपासून तर या संस्था चालू असलेल्या राज्यपद्धतीशीं स्पर्धाच करूं लागल्या !

राज्यक्रान्तीच्या पूर्वींच्या कांहीं काळांत सोव्हिएट संस्थांत फक्त मजुरांचाच समावेश होत असे. नंतर सैनिक व खलाशी यांचा अंतर्भाव होऊं लागला आणि त्यांच्या मागून शेतकरीही आले. तथापि मजूरवर्ग हा अधिक प्रगतिपर समजला गेल्याकारणानें शेतकऱ्यांपेक्षां त्यांचेच प्रतिनिधि सोव्हिएट संस्थांत असत. बुद्धिवान् लोकांनादेखील त्यांत भाग घेतां येत असे. फक्त भांडवलवाल्यांच्या नोकरींतील लोकांस वगळण्यांत येई. संपन्न शेतकऱ्यांना प्रारंभीं घेण्यांत आलें होतें; पण मागून त्यांपैकीं बहुतेकांना बाहेर काढण्यांत आलें. दुसऱ्याच्या मजुरीवर अगर भाडयावर उपजीविका करणारे व झारशाहींतील अधिकारी व पाद्री यांना मज्जाव करण्यांत आला होता. कांहीं अपवाद केले होते हें वेगळें. अशा बंदीनें एकंदर समजुतदार लोकसंख्येपैकीं ३·७ इतक्या लोकांनाच प्रवेश मिळाला नाहीं.

ज्या तत्त्वावर लोकसमूहांस प्रवेश मिळतो अगर बंदी करण्यांत येते तें तत्त्व असें : ज्या प्रसंगीं एखादा विशिष्ट वर्ग सामाजिक प्रगतीला पोषक किंवा उपयुक्त होईल त्या प्रसंगीं त्याला प्रवेश

मिळावा; सर्वांत अत्यंत प्रगतिपर वर्ग असेल त्याला त्याच्या मगदुराप्रमाणें व सामाजिक महत्त्वाप्रमाणें आपली सत्ता चालविण्याची संधि मिळावी. सर्वांत श्रेष्ठ व मूर्धाभिषिक्त अशी जी सोव्हिएट संस्था तिच्याकडे प्रवेशाचे किंवा निर्बंधाचे पूर्ण अधिकार असावयाचे. या ऑल रशिया काँग्रेस ऑफ सोव्हिएट्सनें आपल्या तिसऱ्या अधिवेशनांत सन १९१८ च्या जानेवारी महिन्यांत एक तत्त्व घालून दिलें तें हें : "दुसऱ्यास पिळून काढणाऱ्या वर्गाच्या कोणत्याही गृहस्थास सोव्हिएट राज्यपद्धतींत भाग घेतां येऊं नये. पुढें सन १९१८च्या जुलै महिन्यांत याच परिषदेची पांचवी बैठक झाली. तिनें तर हें तत्त्व आपल्या घटनेंतच समाविष्ट केलें. निरनिराळ्या स्थानिक सोव्हिएट संस्थांच्या निवडणुकीवर देखरेख करणाऱ्या कमिटया अशा रीतीनें बंदी केलेल्या गृहस्थांच्या याद्या तयार करतात. खालच्या संस्थेनें केलेल्या यादीविरुद्ध वरच्या सोव्हिएटकडे फेरतपासणीची मागणी करतां येते. अखेरचा निर्णय मात्र अखिल रशियन सोव्हिएट काँग्रेसकडे अथवा तिच्या कार्यकारी-मंडळाकडे. आजच्या संक्रमणावस्थेंतच हे निर्बंध वगैरे अंमलांत राहतील; या पद्धतीची जशी प्रगति होईल त्याप्रमाणें हातानें अगर डोक्यानें काम करणारा प्रत्येक उपयोगी मनुष्य समाविष्ट केला जाईल, असें कॉम्यूनिस्ट लोक स्वच्छ जाहीर करीत असतात. हें ध्येय केव्हां साध्य होईल तें होवो. सांप्रत मात्र बलवान् व सुसंघटित अशा अल्पसंख्याक वर्गाच्या हातांत राज्याचीं सूत्रें एकत्रित होण्यास या पद्धतीपासून बरीच मदत होते हें खास. तथापि त्याबरोबर हेंही खरें कीं, जनतेच्या पाठिंब्याशिवाय, निदान तिच्या मूळ संमतिशिवाय, हा अल्पसंख्याक वर्ग फार दिवस अधिकारारूढ राहणें शक्य नाहीं. म्हणून तर 'गरीब जनतेची कुलमुखत्यारी ( Dictatorship of the proletariat ) हा शब्दसमूह

प्रचारांत आला. सामान्य जनतेची सहानुभूति असणाऱ्या एका वाकबगार व सुयंत्र वर्गाची सत्ता हाच या म्हणण्याचा भावार्थ. आजची लोकशाही झाली तरी परमार्थतः एका प्रकारची जुलूमशाहीच आहे असें कॉम्यूनिस्ट लोक या पद्धतीचें समर्थन करण्याकरितां प्रतिपादन करतात. दोहोंत भेद आहे तो हा कीं, दुसऱ्या प्रकारची जुलूमशाही ही भांडवलवाल्यांची किंवा सधन मध्यम वर्गाची स्वतःच्या बलसंवर्धनासाठीं असते, म्हणजे शेंकडा दहा किंवा त्याहूनही कमी लोकांची असते, तर पहिल्या प्रकारची शेंकडा नव्वद लोकांची असते.

प्रतिनिधि निवडण्याची सोव्हिएट संस्थांची पद्धति विशेष लक्षांत ठेवण्यासारखी असते. लोकशाहीप्रमाणें प्रांतिक किंवा भौगोलिक तत्त्वांवर बनविलेले मतदारसंघ नसतात व त्यांत व्यक्ति हीच प्रधान नसते. सोव्हिएट संस्थांची उभारणी कारखाने, खेडेगांव, सहकारीसंस्था, मजूरसंघ यांच्यासारख्या आर्थिक व सामाजिक घटकांवर केलेली असते. निवडावयाच्या प्रतिनिधींची संख्या मतदारांच्या संख्येच्या प्रमाणानें मुक्रर केलेली असते. अगदींच लहान मतदारसंघ असतात ते निवडणुकीसाठीं संयुक्त केले जातात. या प्रमाणशीरपणाला एक मोठा अपवाद आहे तो असा : खेडेगांवांत दहा हजार मतदारांना एक प्रतिनिधि व शहरांत दोन हजार मतदारांना एक. शहरवासी लोक म्हणजे मुख्यतः उद्योगधंद्यांतील मजूर लोक व सामाजिक दृष्ट्या ते अधिक पुढारलेले व वजनदार समजल्यामुळें त्यांना आभंड जास्त.

खेडेगांवांतील सोव्हिएट संस्था हा जसा कांहीं त्या गांवाचा आत्मा. सोव्हिएट म्हणजे 'सभा' आणि एखाद्या खेडेगांवांतील सोव्हिएट ही जशी कांहीं त्यांतील सर्व रहिवाशांनीं निवडलेली पंचायत. ही सोव्हिएट सर्व रहिवाशांच्या एका सार्वजनिक सभेंत निवडतात. सदर

सभेंत ठराविक वयोमर्यादेपलीकडील स्त्री-पुरुषांस हजर राहण्यास व मत देण्यास अधिकार असतो. आणि निवडणुकीचा निकाल सभासदांनीं हात वर करून करण्यांत येतो. अर्थात् कांहीं लोकांना सभेंत भाग घेण्याची बंदी असते. दुसऱ्याच्या श्रमानें राहणारे श्रीमान् शेतकरी, व्याजबट्टा करणारे, धर्मोपदेशक व इतर परपुष्ट अथवा समाजविरोधी वर्तन करणारे लोक यांस सभेंत मत देण्याची व भाग घेण्याची मनाई असते. गांवांत कांहीं छोटे उद्योगधंदे व कांहीं सार्वजनिक संस्था असतील तर त्यांनाही सोव्हिएटमध्यें प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार असतो. त्याचप्रमाणें स्थानिक सहकारी-संस्था, शेतकी मजुरांचे संघ, स्त्रियांच्या संस्था व युवक-संघ इत्यादि संस्थांनादेखील प्रतिनिधि निवडण्याचा अधिकार प्राप्त होतो.

सामान्यपणें कॉम्यूनिस्ट नसणाऱ्या अशाच लोकांचें हुकमी बहुमत असतें. कॉम्यूनिस्ट नेहमीं अल्पमतवाले असतात; परंतु ते अत्यंत कार्यप्रवण व बुद्धिवान् असल्याकारणानें सोव्हिएटमध्यें त्यांचाच वरचष्मा असतो.

गांवकऱ्यांच्या सर्वसाधारण प्रश्नांचा निकाल करण्याचा अधिकार सोव्हिएटला असतो. वरिष्ठ सोव्हिएटकडे अपील करण्यास मुभा असतेच व जरूर तर वरिष्ठ सभा खालच्या सोव्हिएटच्या कारभारांत हातही घालते. याप्रमाणें जमिनीसंबंधाचे प्रश्न विशेषत: जमिनीची वांटणी, बीं-बियाण्याची वांटणी, लांकूडफांट्याची जंगलांत तोड, सर्वसाधारण नियमांप्रमाणें कर बसविणें, शाळा, दवाखाने बांधणें, औषधपाण्याची सोय, आगीचा प्रतिकार, परस्पर साहाय्य वगैरे विषय खेडेगांवची सोव्हिएट संस्था निकालांत काढते. सहकारी संस्था, परस्परसाहाय्यकारी संस्था, स्त्रियांच्या संस्था, तरुण-संघ, आपल्या बालचर चमूच्या पद्धतीवर निघालेल्या पुरोगामी संस्था ( Pioneers ), आंतर-

राष्ट्रीय साहाय्यक मंडळें वगैरे वगैरे ज्या विविध संस्था गांवांत असतात त्या एकमेकांस जोडणारी गांव-सभा ही एक सांखळीच होऊन बसते.

सोव्हिएट राज्यपद्धतीविषयीं दोन महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख केला पाहिजे. पहिली म्हटली म्हणजे, एकदां निवडलेल्या प्रतिनिधीस परत बोलाविण्याचा अधिकार ही होय. प्रत्येक मतदारसंघाला हा हक्क असतो व तो कोणत्याही प्रसंगीं उपयोगांत आणतां येतो. इतर देशांत एकदां प्रतिनिधि तीन चार वर्षांच्या निश्चित मुदतीकरितां निवडला म्हणजे त्याला परत बोलावतां येत नाहीं. या सोव्हिएट संस्थांत कायदे करण्याचें काम व त्यांच्या अंमलबजावणीचें काम हीं एकत्रित केलेलीं असतात. हें कसें काय केलें असतें, तें स्पष्टपणें समजत नाहीं.

खेडेगांवाचें खरें चारित्र्य या सभेच्या आरशांत पाहून घ्यावें असें अभिमानानें सांगण्यांत येतें. तें दुसऱ्या कोणत्याही स्थानिक संस्थेंत असें दिसत नाहीं. या राज्यपद्धतींत एक प्रकारचा स्थितिस्थापकपणाचा व परिस्थितीला अनुरूप होण्याचा गुण असतो, त्यामुळें जनतेच्या नैसर्गिक उत्क्रान्तीच्या मार्गांत तिजपासून कोणत्याही प्रकारचा अडथळा होऊं शकत नाहीं.

प्रकरण पांचवें

# मध्यवर्ती सोव्हिएट संघाची घटना

सन १९२२ च्या डिसेंबर महिन्यांत सर्व स्वतंत्र सोव्हिएट संस्थांचा मध्यवर्ती संघ स्थापन करण्यांत आला. हा संघ प्रस्थापित होण्यापूर्वी जीं चार स्वायत्त सोव्हिएट राज्यें होतीं तीं हीं : १ संयुक्त रशियन सोव्हिएट संघ, २ यूक्रेन, ३ श्वेत रशिया व ४ ट्रान्स-काकेशिया. हीं चार आपापला सवता सुभा चालवीत. फक्त कांहीं बाबतींत परस्पर तहनामे झालेले होते. या स्वायत्त सोव्हिएट सभांच्या स्वतंत्र परिषदा भरवून मूर्धाभिषिक्त असा सर्वांचा एक संघ स्थापन करण्याचा निश्चय करण्यांत आला. याच परिषदांत संघाची घटना तयार करण्यासाठीं प्रतिनिधिही निवडले गेले.

संघाचे मूळ हे चारच सभासद. पुढें सन १९२९ सालांत आणखी दोन स्वतंत्र राज्यें त्यांस येऊन मिळालीं. आज या संघांत १ संयुक्त रशियन सोव्हिएट रिपब्लिक, २ यूक्रेन, ३ श्वेत रशिया, ४ ट्रान्स काकेशिया, ५ तुर्कमेनिस्तान व ६ ऊझबेकिस्तान अशा राज्यांचा समावेश होतो. या घटकांपैकीं दोन संयुक्त राज्यें आहेत. संयुक्त रशियन सोव्हिएट रिपब्लिकमध्यें पुढील नऊ स्वतंत्र संस्थानांचा अंतर्भाव झालेला आहे : क्रीमियन, टार्टर, बष्कीर, बूरीयत–मंगोलियन, केगीझ, कारेलियन, दागेस्तान, लाकूत आणि जर्मन व्होल्गा रिपब्लिक. ट्रान्स कॉकेशियन संयुक्त संघांत अझरबैजान, आर्मेनियन आणि जॉर्जीयन् या स्वतंत्र संस्थानांचा समावेश होतो. या स्वतंत्र रिपब्लिक्स्‌शिवाय बरेचसे स्वतंत्र प्रांतविभागही या संस्थानांत अंतर्भूत झालेले आहेत. एवढ्या संयुक्त रशियन सोव्हिएटमध्येंच असले बारा विभाग आहेत.

मध्यवर्ती संघाला जे अधिकार वहाल करण्यांत आले आहेत ते वगळल्यास हीं सर्व घटक संस्थानें आहेत. परराष्ट्राचे संबंध, नवीन संस्थानांचा संघांत समावेश व व्यापारविषयक आणि करविषयक कांहीं प्रश्न या बाबी मुख्य संघाकडे सोपविलेल्या असतात. संघाच्या घटनेच्या चवथ्या कलमांत खालील नियम आढळतात : " समसमान लोकांचा हा ऐच्छिक संघ आहे; संघांतून फुटून निघण्याचा प्रत्येक संस्थानांस हक्क आहे; इ० सन १९१७ च्या आक्टोबर महिन्यांत शांततामय एकत्र निवास व मित्रत्वाचें परस्पर सहकार्य यांचा जो पाया भरला गेला त्यावरील इमारतीचा हा नवीन संयुक्त संघ म्हणजे योग्य व सुंदर असा कळसच होय."

इतर कायद्याप्रमाणेंच संघाची घटनादेखील बदलतां येते. अशा रीतीनें तिच्यांत लवचिकपणा आहे व जशी परिस्थिति पालटेल तसा तींतही बदल करतां येतो. राष्ट्राराष्ट्रांतील भिन्नता व निरनिराळ्या संस्कृतींचें संवर्धन करण्याचें स्वातंत्र्य या तत्त्वांवर त्या घटनेची उभारणी करण्यांत आली आहे. आपल्या ताब्यांतील राष्ट्रांवर आपली भाषा व संस्कृति जबरदस्तीनें लादण्याच्या पूर्वीच्या जुलमी व एकतंत्री राज्य-पद्धतीच्या धोरणाच्या ही राज्यपद्धति अगदीं सर्वस्वीं विरुद्ध !

ऑल यूनियन कॉंग्रेस ( सर्व-संघ परिषद् ) ही सर्वश्रेष्ठ व निर्णा-यक अशी संस्था. प्रत्येक घटक संस्थानाचे प्रमाणशीर पद्धतीनें प्रतिनिधि निवडून यूनियन कौन्सिल ( संघाचें कार्यकारी-मंडळ ) बनविण्यांत येतें. आणि प्रत्येक स्वतंत्र संस्थानाचे पांच व प्रत्येक स्वतंत्र प्रांत-विभागाचा एक या प्रमाणांत प्रतिनिधि निवडून कौन्सिल-ऑफ-नॅशनॅलिटीज ( सर्व—राष्ट्रीय प्रातिनिधिक-मंडळ ) ही राज्य-संस्था निर्माण करण्यांत येते. येणेंप्रमाणें या शेवटच्या मंडळांत संघांतील अत्यंत बलवान् संयुक्त रशियन सोव्हिएट रिपब्लिक जितके प्रतिनिधि सर्व

राष्ट्रीय प्रातिनिधिक-मंडळांत पाठविणार तितकेच लहानांत लहान संस्थानही पाठविणार, अशी स्थिति असते.

ऑल-यूनियन-कॉंग्रेसचें मध्यवर्ती-कारभारी-मंडळ (सेंट्रल एक्झीक्यूटिव्ह कमिटी) हें जसें कांहीं पार्लमेंटसारखें. या कॉंग्रेसमध्यें अकराशेंहून अधिक सभासद असतात व ती सहा महिन्यांनीं एकदांच जमावयाची. कायदे पास व्हावयाचे म्हणजे कारभारी-मंडळाच्या दोन्ही शाखांतून पास व्हावयाचे. सर्व महत्त्वाच्या विषयांत सर्वराष्ट्रीय प्रातिनिधिक-मंडळाच्या मतांस निर्णायक वजनदारी प्राप्त होते. अशा रीतीनें स्वतंत्र घटक संस्थानांना स्वतःचा आर्थिक व सामाजिक जीवनक्रम आणि स्वतःची संस्कृति सुधारण्याची पूर्ण मुभा असते इतकेंच नव्हे तर संघाच्या एकंदर राज्यव्यवस्थेंत त्यांस निश्चितपणें परिणामकारक असा भागही घेतां येतो. सर्व सोव्हिएट सभांची, त्यांच्या कार्यकारी-मंडळांची व त्यांच्या प्रतिनिधींची निवडणूक प्रतिवर्षी होते. फक्त ऑल-यूनियन-कॉंग्रेसची निवडणूक मात्र दर दोन वर्षांनीं होते. ही ऑल-यूनिगन-कॉंग्रेसच प्रत्येक खात्याच्या मुख्य अधिकाऱ्याची नेमणूक करते. या अधिकाऱ्यांना 'कॉमिसर्स' (दिवाण) ही संज्ञा असते. व अशा दिवाणांचें मंडळ तेंच संघाचें तादृश मंत्रिमंडळ होय.

प्रत्येक घटक संस्थानांत सोव्हिएट परिषद्, मध्यवर्ति कार्यकारी-मंडळ, मंत्रिमंडळ वगैरे संस्था असतातच. परराष्ट्रीय संबंधासारखीं कांहीं खातीं वरिष्ठ संघाकडे राखीव म्हणून ठेवलेलीं असतात. कांहीं कांहीं खातीं संघ व घटक संस्थानें यांच्यामध्यें विभागून दिलेलीं असतात. उदाहरणार्थ, वरिष्ठ आर्थिक कौन्सिल, मजूर, फडणिशीखातें हे विषय. बाकीचीं पूर्णपणें घटक संस्थानांकडेच असतात. तीं म्हटलीं म्हणजे शेतकी, न्याय, शिक्षण, आरोग्य, सामाजिक हित हीं होत.

प्रत्येक संस्थानांत गांव व कारखाना हा पाया धरून खालपासून

वरपर्यंत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पद्धतीच्या निवडणुकीच्या योगानें सर्व राज्य-यंत्र बांधून काढण्यांत आलें आहे. गांवसभेनें जिल्हासभेची व तिच्या कार्यकारीमंडळाची निवडणूक करावयाची. जिल्हासभेनें प्रांतिक सोव्हिएट कॉंग्रेसची निवड करावयाची आणि या प्रांतिक सोव्हिएटनें रिपब्लिकन कॉंग्रेसमध्यें आपले प्रतिनिधि पाठवावयाचे. ही खेडेगांवांची व्यवस्था. शहरांत शहरसभेनें आपल्या जिल्हासभेची व तशीच प्रांतिक सभेचीही प्रत्यक्ष पद्धतीनें निवड करावयाची असते. प्रांतिक सोव्हिएट संस्थांना श्रेष्ठ रिपब्लिकन कॉंग्रेसमध्यें प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार असतोच; पण शहरसभांनाही असा अधिकार प्राप्त होत असतो. अखिल रशियन किंवा इतर रिपब्लिकन कॉंग्रेसमध्यें खेडेगांवच्या सभांना अगदीं अप्रत्यक्षपणें प्रतिनिधित्व मिळतें व शहरवासी सभांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा दोन्ही प्रकारानें वरच्या संस्थांतून प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क प्राप्त होतो.

खेडेगांवांच्या सोव्हिएट सभांतून शेतकरीवर्ग बहुसंख्याक असतो हें उघडच आहे. परंतु वरवरच्या सोव्हिएट संस्थांत कॉम्यूनिस्टांचें प्रमाण वाढत वाढत जातें व अधिकाराच्या सर्व जागा त्यांच्या हातांत अपतात. अगदीं शिखराची जी ऑल रशियन सोव्हिएट ती तर संपूर्ण रीतीनें त्यांच्याच मुठींत आहे.

वरवर पाहिलें तर या सगळ्या संघटनेंत कॉम्यूनिस्ट पक्षाला अधिकारयुक्त असें स्थान मुळींच नाहीं. तथापि, वस्तुतः हा पक्ष म्हणजे सर्व सोव्हिएट राज्यपद्धतीचा आधारस्तंभ. कॉम्यूनिस्ट पक्ष म्हणजे कामकरी वर्गांतील जोरकस व मजबूत आणि संघटित असा प्रगतिपर लोकांचा पक्ष. या पक्षाचा उद्देश निश्चित व कार्यक्रम पक्का ठरलेला. तो पक्ष अत्यंत सुयंत्रित असून त्याची शिस्त तर कडकपणांत लष्करी स्वरूपाची. धर्मवेड्या माणसाच्या उत्साहाप्रमाणें व

विश्वासाप्रमाणें कॉम्यूनिस्ट मनुष्याला अशी खात्री वाटत असते कीं, मानवजातीचे भविष्यकालचे हितसंबंध आपल्याच ताब्यांत आहेत. अर्थात् या पक्षांत बुद्धिवान् लोक व शेतकरी यांचा समावेश होतो; नाहीं असें नाहीं. परंतु 'गरीबांची सत्ता व गरीबांची मत्ता' हें तत्त्व व त्याचा आचार हा ज्यांना मान्य आहे व ज्यांना समजतो त्यांनाच प्रवेश मिळतो; इतरांना नाहीं. या पक्षांत सामील होणें ही कांहीं सोपी गोष्ट नाहीं. याची शुद्धता राखण्यासाठीं मधून मधून ठराविक मुदतीनें साफसुफी करण्यांत येते व जे अनिष्ट वाटतील त्यांस काढून टाकण्यांत येतें. या पक्षाची सत्ता किती जबरदस्त आहे तें एकाच गोष्टीवरून व्यक्त होतें. या पक्षाचा सर चिटणीस स्टॅलिन हा दुसऱ्या कोणत्याही उच्च अधिकाराच्या जागेवर नसून सोव्हिएट संघांत बलिष्ठ असा महापुरुष होऊन बसला आहे.

वेगवेगळीं कामें करणारीं बरींच मंडळें, उपमंडळेंही असतात. त्यांत महत्त्वाचें म्हणजे वरिष्ठ आर्थिक-मंडळ (Supreme Economic Council) व त्याच्या विविध शाखा. मजूर-संघ वगैरे संस्था-देखील एकंदर राज्यव्यवस्थेचे भाग म्हणून कल्पिल्या जातात. हे मजूर-संघ कारखान्यांचे म्हणून बनविले असतात. विशिष्ट धंद्यापुरते मर्यादित असे नसतात. म्हणजे एका मोठ्या कारखान्यांतील सर्व मजूर एकाच मजूर-संघाचे सभासद असावयाचे, मग ते खाणीवाले किंवा सुतार किंवा साधे मजूर कोणीही असोत. याशिवाय सहकारी संस्था, स्त्रियांच्या संस्था, युवक-संघ, बालचर संस्था यांचें तर सर्वत्र जाळेंच पसरलेलें आहे.

कारखान्यांतील मजुरांचें हिताहित पहाणें हें मजूर-संघाचें अथवा फॅक्टरी-कमिटी असली तर तिचें काम. पण त्या कारखान्याचा एक व्यवस्थापक किंवा व्यवस्थापक-मंडळ नेमावयाचें तें ऑल रशियन

सोव्हिएटच्या वतीनें वरिष्ठ आर्थिक-मंडळानें. व्यवस्थापक व मजूर यांचा विरोध उत्पन्न झाला तर लवाद पद्धत असते व वर अपील करण्याचीही तरतूद असते. व्यवस्थापकाला कामावरून दूर करतां येतें किंवा त्याची बदलीही करतां येते.

थोडक्यांत सांगावयाचें तर, सोव्हिएट राज्यपद्धतीचा सामान्यपणें अशा स्वरूपाचा प्रपंच असतो. अष्टाधिकार कामकऱ्यांच्या हातांत असावेत, भांडवलशाहीला किंवा तिचें पुनरुज्जीवन करणारांस काडीइतकी देखील कूस असूं नये या उघड उघड उद्देशानें या राज्यपद्धतीची सर्व आंखणी केलेली. आतां भांडवलशाही दुसऱ्या कोणत्याही स्वरूपांत अवतीर्ण होणारच नाहीं असें निश्चयानें सांगतां येत नाहीं. तथापि, भांडवलशाहीशीं भांडतांना श्रीमान् मध्यम वर्गाच्या संधानानें चालावयाचें बोल्शेव्हिक लोकांच्या बिलकूल मनांत नाहीं. इ० सन १०१९ च्या मार्च महिन्यांत लेनिन, ट्रॉट्स्की प्रभृतींच्या सल्लयांनीं पहिल्या कॉम्यूनिस्ट इंटरनॅशनलनें ( अंतरराष्ट्रीय कॉम्यूनिस्ट परिषद् ) जो जाहीरनामा प्रसिद्ध केला त्यांत खालीलप्रमाणें म्हटलें आहे : “ शेंडी तुटो कीं पारंबी तुटो, असा भांडवलशाहीशीं जो गरीब वर्गानें निर्वाणीचा लढा लढावयाचा त्यांत त्यानें श्रीमान् मध्यम वर्गाच्या उपदेशाचें मेंढराप्रमाणें अनुकरण करावयास सांगणें फारच आश्चर्यकारक होय. फ्रेंच द्वंद्वयुद्धाच्या पद्धतींत शत्रुपक्षानें कृत्रिम दंडक घालून द्यावयाचे, पण त्यानें स्वतः मात्र ते पाळावयाचे नाहींत असें असतां दरोडेखोरांपासून आत्मरक्षण करतांना एखाद्यास ते नियम पाळण्यास सांगण्यासारखेंच हें विचित्र नव्हे का ? ”

आज गरीबांच्या राज्याची द्वाही सर्वत्र फिरलेली आहे; पण असें सांगण्यांत येतें कीं, प्रस्तुतचा काल हा फक्त संक्रमणाचा काल आहे; पुढें जो महत्त्वाचा काल येणार त्याची तयारी चालू आहे; व त्या

भावी काळांत सर्व वर्ग-भेद नष्ट होतील, सर्व जनतेचा एकच एक वर्ग होईल व सरकार ही संस्थाच निर्जीव व निर्माल्यवत् होऊन राहील. त्या वेळींच समाजसत्तावादाची खरी पूर्ति होईल आणि वरील जाहीरनाम्याचेच शब्द उध्दृत करावयाचे तर, अशा नवयुगाचा उदय होईल कीं, ज्यांत " भांडवलशाही अस्तास जाईल, युद्धें अशक्य होतील, राष्ट्राराष्ट्रांतील सरहद्दी लोप पावतील, सर्व जगाचें प्रचंड सहकारी लोकशाहींत रूपांतर होईल आणि खरें विश्वबंधुत्व व मानवी स्वातंत्र्य यांच्या अमदानीची प्रभात होईल."

## प्रकरण सहावें

# रशियासंबंधीं कांहीं पुस्तकें

मॉस्को येथील शास्त्रज्ञ व अध्यापक यांनीं दिलेल्या एका मेजवानी-च्या प्रसंगाची मला आठवण राहिली आहे. पुष्कळ देशांतून लोक आले होते व विविध भाषांतून भाषणें झालीं. दक्षिण अमेरिकेंतील दूरच्या युरूग्वे प्रांतांतून उपस्थित झालेल्या एका तरुणानें भाषण केलें तें मला विशेष लक्षांत ठेवण्यासारखें वाटलें. या आश्चर्यभूमीचें समक्ष अवलोकन करण्यासाठीं हा तरुण आपल्या मित्रांच्या तर्फे तेथें आला होता. तेथील परिस्थिति पाहून त्याचें अंतःकरण उत्साहातिरेकानें प्रज्वलित होऊन गेलें होतें. स्पॅनिश भाषेंत नादमधुर असें त्यानें भाषण केलें. तो म्हणालाः "माझ्या हृत्फलकावर रशियाचा लाल तारा कोरलेला आहे, तो घेऊन मीं मायदेशीं जाणार व माझ्या मित्रमंडळींस सामाजिक स्वातंत्र्याचा संदेश मी सांगणार." या तरुण व उदार अंतःकरणावर सोव्हिएट रशियाच्या निरीक्षणाचा असा परिणाम झाला. याच्या उलट कित्येक लोक असेंही सांगत सुटतात कीं, रशियांत अराजकता माजलेली, दारिद्र्याचा बुजबुजाट झालेला, बोल्शेव्हिक लोक म्हणजे डाकू लोक, अगदींच माणसांतून उठून गेलेले !

यांत बरोबर कोण ? कां कांहीं अंशानें दोन्हीही यथार्थ ? मी निर्णय देण्याचें धाडस करीत नाहीं व माझें निश्चित व अखेरचें मत अमुक असेंही सांगूं शकत नाहीं. माझें मनही कोमल आणि परिणाम-सुलभ आहे. मी हें कबूल करतों कीं, रशियाविषयीं माझें मत अनुकूल झालें आहे व जों जों जास्त वाचावें तों तों तें दृढ होत

जातें. तेथें कांहीं गोष्टी अशा आहेत कीं, त्या मला समजत नाहींत व पुष्कळ अशाही आहेत कीं, त्या मला आवडल्या नाहींत व मान्यही नाहींत. तेव्हां मीं काय पाहिलें तेवढेंच पुढें मांडणार. त्यावरून ज्यानें त्यानें आपलीं अनुमानें बसवावीं. मीं जें पाहिलें तें पहावयास हवें होतें त्याच्या प्रमाणाच्या मानानें अगदींच क्षुल्लक होय, हें येथें नमूद करणें अवश्य आहे.

प्रोफेसर के. टी. शहा यांनीं आपल्या पुस्तकांत ( The Russian Experiment 1917-1927–रशियांतील प्रयोग १९१७ते१९२७) म्हटल्याप्रमाणें एखाद्या व्यक्तीच्या मतांवरून व अनुमानांवरून विश्वसनीय असे सिद्धान्त काढणें बरोबर नाहीं. अगदीं रूक्ष इतिहासकथन करावयाचें, त्यांत मालमसाला घालून थोडी खुमारी उत्पन्न करावयाची इतकाच त्यांचा उपयोग. ज्यांना खरोखर या विषयाची आवड त्यांनीं प्रत्यक्ष तत्संबंधीं ग्रंथ वाचावे व तेही दोन्ही बाजूंचे. रशियाविषयीं पुस्तकें वाटेल तेवढीं पडलीं आहेत. आणखींची त्यांत भर होतच आहे. त्यांपैकीं मी पाहिलीं त्यांचें थोडक्यांत वर्णन मी देणार आहें. बोल्शेव्हिक पद्धतीवर टीकात्मक अशीं बरींच पुस्तकें इंग्रजींत झालीं आहेत. बोल्शेव्हिकांच्या बाजूचें वाङ्मय जर्मन व इतर भाषेंत अधिक आहे; परंतु अगदीं अलीकडे इंग्रजींतदेखील कांहीं छोटीं छोटीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. समाजसत्तावादाच्या कांहीं अंगांची त्यांत किंचित् निर्भर्त्सना केलेली असली तरी त्याचीं मूलतत्त्वें व त्याची यशःसिद्धि यांविषयीं कांहींशी सहानुभूतिही प्रदर्शित करण्यांत आली आहे.

बोल्शेव्हिझमचा खरा अभ्यास करावयाचा म्हणजे कॉम्यूनिझमच्या तत्त्वांचें व त्याच्या ऐतिहासिक वाढीचें जुजबी ज्ञान संपादन करणें ज़रूर आहे. सन १८७१ च्या पॅरिसच्या कॉम्यूनचा प्रणेता

ब्लँकाय यानें म्हटलें आहे कीं, " समाजसत्तावाद व अज्ञान यांचें विळ्या–भोपळ्याइतकें सख्य." आपल्या समाजसत्तावादाचीं तत्त्वें जो भेटेल त्याच्या गळीं उतरविण्याचा कॉम्यूनिस्टांचा विलक्षण अट्टाहास पाहिला म्हणजे आपण थक्क होतों. एखाद्याला आपल्या पक्षांत ओढावयाचें त्यांनीं एकदां ठरविलें म्हणजे त्यांचा वेदग्रंथ म्हणजे मार्क्सचें 'कॅपिटॅलिझम्' या पुस्तकापासून व एंजलसच्या लेखांपासून तों लेनिन व बुखारीन यांच्या पुस्तकांपर्यंत सारीं पुस्तकें त्याच्या डोक्यावर ते आदळतील; परंतु 'अनंतपारं किल शब्दशास्त्रं स्वल्पं तथायुः' हा नियम येथेंही लागू आहे. ऑक्सफर्डच्या लिंडसे नांवाच्या एका आचार्यानें 'कॉर्ल मार्क्सचें कॅपिटल' हें लहानसें पुस्तक लिहिलें आहे, त्यावरून मार्क्सचें तत्त्वज्ञान सुलभ होतें. हें टीकापर पुस्तक आहे. याहूनही जास्त टीकापर सॉल्टर यांचें 'कॉर्ल मार्क्स आणि आधुनिक समाजसत्तावाद' हें आहे. बुखारीनचें 'हिस्टॉरिक मटिरिॲलिझम्' व 'ईकॉनॉमिक थिअरी ऑफ धि लीझर क्लास' (सुखवस्तु वर्गाचें आर्थिक तत्त्वज्ञान) या पुस्तकांत कॉम्यूनिस्टांची बाजू उत्तम रीतीनें पुढें मांडिली आहे. बॉगजेनॉकचें 'शॉर्ट कोर्स ऑफ ईकॉनॉमिक सायन्स' (शालोपयोगी अर्थशास्त्र) हें पुस्तक तर रशियांत अजूनही शिक्षणसंस्थांतून नेमण्यांत येत असतें. इंग्लिश भाषेंत लेनिनचीं पुष्कळ पुस्तकें छापलेली आहेत. मीं फक्त 'इंपीरिॲलिझम् धि लास्ट स्टेज ऑफ कॅपिटॅलिझम्' (साम्राज्य-वाद अर्थात् भांडवलशाहीची अंतकालची स्थिति) हेंच पाहिलें आहे. जर्मन कार्ल कौट्स्काय हा स्वतःस मार्क्सचा अनुयायी म्हणवून घेऊनही बोल्शेव्हिझमवर सडकून टीका करतो. हा वाद ज्यांना वाचावयाचा असेल त्यांनीं कौट्स्कायचें 'धी लेबर रेव्होल्यूशन' हें पुस्तक वाचावें लेनिननें याला उत्तर दिलेंच आहे व ट्रॉट्स्कीचें

'इन् डिफेन्स ऑफ टेरोरिझम्' हें जोरदार व ओजस्वी पुस्तकही एक उत्तरच आहे म्हटलें तरी चालेल.

'होम युनिव्हर्सिटी लायब्ररी' या मालेंतील प्रोफेसर लास्की यांचें 'कॉम्यूनिझम' हें पुस्तक फारच उत्तम रीतीनें लिहिलें आहे. 'कॉम्यूनिझम्'चें तत्त्व व त्याचें व्यवहारांत आचरण या दोहोंवरही या पुस्तकांत टीका केली आहे. ब्रिटिश कॉम्यूनिस्ट पक्षामार्फत या पुस्तकाला तोडीस तोड उत्तर देण्यांत आलें आहे म्हणतात; पण माझ्या पाहण्यांत मात्र तें आलें नाहीं.

बोलशेव्हिकांचें म्हणणें तरी काय याची थोडीबहुत कल्पना वरील पुस्तकांच्या वाचनानें या विषयाचें चौकसपणानें परिशीलन करणारास येईल. दोन विवादपूर्ण पुस्तकांचाही उल्लेख करतों. तीं म्हणजे ट्रॉट्स्कीचें 'व्हेअर इज ब्रिटन गोईंग ?' (ब्रिटन कोणी-कडे चाललें आहे ?) व नॉर्मल एंजेलचें 'मस्ट ब्रिटन फॉलो धि मॉस्को रोड ?' (म्हणजे ब्रिटननें मॉस्कोच्या रस्त्यानें गेलेंच पाहिजे का ?) दुसरें एक पोस्टगेट यांचें 'धि बोल्शेव्हिक थिअरी' हें पुस्तक आहे. त्यांत सोव्हिएट राज्यपद्धतीच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वांचा योग्य परामर्ष घेतला आहे; पण तें थोडेंसें जुनें झालें आहे.

तात्त्विक ज्ञानापुरतें हें झालें; परंतु नुसत्या निर्लेप तात्त्विक ज्ञानानें रशियांत घडलेल्या महाक्रान्तीचा अथवा तिच्या बुडाशीं असलेल्या गूढ शक्तींचा कांहीं उलगडा होऊं शकत नाहीं. ऑक्टोबर महिन्यां-तील क्रान्ति ही खरोखर जगाच्या इतिहासांत चिरस्मरणीय अशी झाली. फ्रेंच राज्यक्रान्तीनंतर तीच पहिली मोठी क्रान्ति. आणि इतिहास म्हटला म्हणजे एखाद्या नवलकथेपेक्षांही अधिक मनोरंजक व नाट्यमय यांत संशय नाहीं. ती क्रान्ति घडत असलेली ज्यांनीं समक्ष पाहिली त्या दोन इंग्लिश व अमेरिकन गृहस्थांच्या वर्णनांत

या प्रचंड क्रान्तीच्या जोमाची कल्पना येते. 'मँचेस्टर गार्डियन' पत्राचे रशियाचे बातमीदार फिलिप्स प्राइस यांनीं 'रशियन राज्य-क्रान्तींतील माझ्या आठवणी' या पुस्तकांत तेथें दररोज घडलेल्या हकीगतींचा इतिहास दिला आहे. मार्चच्या क्रान्तींत केरेन्स्की अधिकारारूढ झाला तेव्हांपासून यानें इतिहास सांगितला आहे. मास्को येथें रक्त-प्रभातीचा उदय केव्हां व कसा झाला, झारशाहीच्या गंजलेल्या बेड्या एकदम कशा तोडल्या गेल्या, प्रथमागमनाचे समयीं लेनिनची लोकांनीं चेष्टा कशी केली व लगेच त्याला आपल्या देशाचीं सर्व सूत्रें देऊन राष्ट्रसूत्रधार कसा केला, केरेन्स्कीचा करुणास्पद थारेपालट, प्रतिगामी पक्षाशीं त्याच्या तडजोडी, सोव्हिएट संस्थांचा उदय, त्यांचा विजय व बोल्शेव्हिकांचा या संस्थांवरील पूर्ण कबजा वगैरे वगैरे गोष्टींचा इतिहास त्यांनीं लिहिला आहे. या राज्य-पद्धतीला अंतर्बाह्य शत्रु होते त्यांना कसें तोंड देण्यांत आलें व कित्येक वेळां या राज्यपद्धतीचें जीवित किती निराशामय व साशंक स्थितींत होतें याचेंही वर्णन सदर बातमीदारानें केलें आहे.

दुसरें पुस्तक अमेरिकन वार्ताहर जॉन रीड यांचें. त्याचें नांव 'टेन डेज दॅट शुक धि वर्ल्ड' (जगाला हालवून सोडणारे दहा दिवस.) ऑक्टोबरच्या क्रान्तीच्या पहिल्या दहा दिवसांचें यांत फारच तपशीलवार वर्णन सांपडतें. तें वाचतां वाचतां क्वचित् अंगावर शहारे येतात, खेदही वाटतो; पण त्याबरोबरच ही एवढी अचाट घटना कशी यशस्वी झाली याचें आश्चर्य वाटतें! दुर्लंघ्य अडचणी आल्या असतां जे डगमगले नाहींत, युद्ध, बंड वगैरे जोरांत असतां, मृत्यु केव्हां येईल याचा नेम नसतां, ज्या महापुरुषांनीं भोंवताल-च्या गोंधळांतून सोशालिस्ट स्वरूपाची राज्यपद्धति निर्माण केली त्यांचें तर सर्वांत जास्त कौतुक वाटतें. रस्त्यांत गोळीबार चालला असतां

राज्यक्रान्तीच्या चवथ्याच दिवशीं त्यांनीं कामकऱ्यांना आठ तासांचा दिवस ठरवून टाकला व लोकशिक्षणाची योजना तयार केली! एक आठवड्याच्या आंत अल्पसंख्याक लोकांचा प्रश्न सोडवून टाकला, आणि तोच प्रश्न हिंदुस्थानांत मात्र आपला कायमचा सोबती होऊन बसला आहे. याहूनही जास्त आश्चर्यकारक म्हणजे त्यांनीं खालील महत्त्वांची जाहीर घोषणा केली :

१. रशियांतील लोकांची समता व कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम् अशी सत्ता त्यांचीच चालावयाची.

२. रशियांतील जनतेला स्वयंनिर्णयाचा हक्क आहे. जरूर पडेल तर त्यांनीं वेगळें निघून स्वतंत्र संस्थान प्रस्थापित करावें.

३. राष्ट्रीय व धार्मिक-राष्ट्रीय असे सर्व विशेष हक्क, सवलती व निर्बंध रद्द करण्यांत यावे.

४. रशियांत वास्तव्य करणाऱ्या राष्ट्रीय अल्पसंख्याक वर्गांनी व जातींनीं आपापली वाढ करून घेण्यास पूर्ण मुभा असावी.

प्रकरण सातवें

# लेनिन

रशियन राज्यक्रान्तीची .पार्श्वभूमिका काय होती याची माहिती देणारीं पुस्तकें कोणतीं याविषयीं पूर्वीं थोडेंसें लिहिलेंच आहे. कोणतेंही मोठें परिवर्तन म्हटलें म्हणजे त्याचीं पाळेंमुळें खूप खालीं दूरवर गेलेलीं असावयाचीं; आणि त्यांचें संशोधन करतांना मुळाशीं कोठेंतरी मनुष्यजातीचे पिढ्यान् पिढ्या चाललेलें दारिद्र्य दिसून यावयाचेंच. तसेंच रशियांतील या क्रान्तीचेंही जगाच्या व्यवहारांत प्रभावी व नियामक सत्ता म्हटली म्हणजे आर्थिक परिस्थितीची; आणि राजकारण झालें तरी झपाट्यानें अर्थशास्त्राच्या दासीप्रमाणें होत चाललें आहे. मनुष्य आपल्या करणीनें दैवाला कलाटणी देऊं शकतो व कधीं कधीं एक मनुष्य आपल्या इच्छेच्या बळानें लाखों मानवांच्या चारित्र्यांत क्रांति घडवून आणतो, हाच इतिहासाचा धडा रशियानें फिरून खरा करून दाखविला आहे. म्हणून ज्या क्रांतिकारक महात्म्यांनीं अराजकता व सांवळागोंधळ यांच्या दंगलींतून नूतन मजबूत रशिया निर्माण केला त्यांच्या चरित्रांचा अभ्यास करणें बोधप्रद असतें. लष्करी ज्ञान नसतां हद्दपार झालेले लोक विजयशाली असें मोठें सैन्य उभें करूं शकतात. राजकारणांतील व्यवहाराची माहिती नसून इतर देशांच्या मुरलेल्या मुत्सद्द्यांशीं यशस्वीपणानें तहाचीं बोलणीं करूं शकतात. व्यापाराविषयीं अथवा राज्यव्यवस्थेविषयीं अनभ्यस्त असून देखील उत्पादन व वांटणी या दोन्ही शाखा ताब्यांत ठेवून अवाढव्य राज्ययंत्रही चालवूं शकतात! अशा तेजस्वी व कृतार्थ पुरुषांचा मुकुटमणि म्हणजे लेनिन. त्याच्याविषयीं माहिती असणें अगत्याचें आहे हें लिहावयास नकोच.

प्र. ग्रं. ले.

पुष्कळ गृहस्थांनीं लेनिनवर-स्तुतीचा वर्षाव केला आहे; पण अगदीं संगतवार असें त्याचें चरित्र आढळण्यांत आलें नाहीं. नुकतें एकच चरित्र जर्मनमधून इंग्रजींत भाषांतर झालेलें व्हॅलेरिन मार्कू यांचें आहे. हिंदी वाचकांना गोडी लावील असें पुस्तक म्हटलें म्हणजे रेनी फुलॉप मिलर यांचें 'लेनिन आणि गांधी' हें होय. हा लेखक फारसा खोलांत शिरलेला नाहीं; परंतु लेनिनचें शब्दचित्र मात्र त्यानें त्यांतल्या त्यांत बरें रेखाटलें आहे. एमिल लडविग यांच्या 'जीनियस अँड कॅरॅक्टर' या ग्रंथांतदेखील लेनिनचें लहानसें पण मनोरंजक चरित्र सांपडतें.

चार वर्षांपूर्वी लेनिन निवर्तला. मरणाचे वेळीं पन्नाशी उलटून तो थोडा पलीकडे गेला होता. पैकीं तीस वर्षें तयारींत, अत्यंत श्रमांत व हालअपेष्टांत गेलीं. कांहीं वर्षे तर त्याला सैबीरियांत फार त्रासांत घालवावीं लागलीं. अखेरीस विजयश्रीनें त्याच्या गळ्यांत माळ घातली खरी; तथापि विजयाबरोबर भयंकर अडचणी व आपत्ति आल्या. त्याला गोळी लागून मृत्यु आला. परंतु प्राणोत्क्रमण होण्यापूर्वीं त्यानें सर्व अडचणींवर विजय मिळविला होता व या विजयाच्या ज्ञानाचें तेज त्याच्या चेहऱ्यावर मरणसमयीं विलसत होतें. आज तो मॉस्कोच्या सुंदर 'लाल चौकांतील' क्रेमलिन राजवाड्याच्या तटबंदीच्याखालीं साध्या थडग्यांत समाधिस्थ होऊन राहिला आहे. तथापि तो झोंपी गेला आहे असेंच वाटतें, तो मरण पावला या गोष्टीवर विश्वासच बसत नाहीं. दिसण्यात तो विशेष सुंदर नव्हता असें म्हणतात. तो अतिशय साधा व अकृत्रिम होता. रशियाच्या भूमींतून उद्भव पावल्याचा वास त्याच्याभोंवतीं दरवळत असे. मरणोत्तर त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारचें सौंदर्य खुलून दिसतें, निरभ्र शांतीचें साम्राज्य पसरलेलें भासतें. ओष्ठ–प्रदेशावर हास्याची लकेर चमकत असेलसें वाटतें व

प्रकरण सातवें

# लेनिन

रशियन राज्यक्रान्तीची .पार्श्वभूमिका काय होती याची माहिती देणारीं पुस्तकें कोणतीं याविषयीं पूर्वीं थोडेंसें लिहिलेंच आहे. कोणतेंही मोठें परिवर्तन म्हटलें म्हणजे त्याचीं पाळेंमुळें खूप खालीं दूरवर गेलेलीं असावयाचीं; आणि त्यांचें संशोधन करतांना मुळाशीं कोठेंतरी मनुष्यजातीचे पिढ्यान् पिढ्या चाललेलें दारिद्र्य दिसून यावयाचेंच. तसेंच रशियांतील या क्रान्तीचेंही जगाच्या व्यवहारांत प्रभावी व नियामक सत्ता म्हटली म्हणजे आर्थिक परिस्थितीची; आणि राजकारण झालें तरी झपाट्यानें अर्थशास्त्राच्या दासीप्रमाणें होत चाललें आहे. मनुष्य आपल्या करणीनें दैवाला कलाटणी देऊं शकतो व कधीं कधीं एक मनुष्य आपल्या इच्छेच्या बळानें लाखों मानवांच्या चारित्र्यांत क्रांति घडवून आणतो, हाच इतिहासाचा धडा रशियानें फिरून खरा करून दाखविला आहे. म्हणून ज्या क्रांतिकारक महात्म्यांनीं अराजकता व सांवळागोंधळ यांच्या दंगलींतून नूतन मजबूत रशिया निर्माण केला त्यांच्या चरित्रांचा अभ्यास करणें बोधप्रद असतें. लष्करी ज्ञान नसतां हद्दपार झालेले लोक विजयशाली असें मोठें सैन्य उभें करूं शकतात. राजकारणांतील व्यवहाराची माहिती नसून इतर देशांच्या मुरलेल्या मुत्सद्यांशीं यशस्वीपणानें तहाचीं बोलणीं करूं शकतात. व्यापाराविषयीं अथवा राज्यव्यवस्थेविषयीं अनभ्यस्त असून देखील उत्पादन व वांटणी या दोन्ही शाखा ताब्यांत ठेवून अवाढव्य राज्ययंत्रही चालवूं शकतात! अशा तेजस्वी व कृतार्थ पुरुषांचा मुकुटमणि म्हणजे लेनिन. त्याच्याविषयीं माहिती असणें अगत्याचें आहे हें लिहावयास नकोच.

संपादन करण्याचा निश्चय पक्का बाणला होता. पण आपल्या देशबांधवांच्या दारिद्र्यदु:खानें तो निराश किंवा संकोचित झाला नाहीं. "त्याचें अंत:करण कसें चैतन्यानें भरून गेलें होतें आणि केवढाही संकटाचा प्रसंग आला तरी त्याचें गांभीर्य ढळत नसे व त्यांची आनंदी वृत्तिही मावळत नसे."

लेनिनचें बालपण त्याचें त्यालाच शोभण्यासारखें होतें. तो सतरा वर्षांचा असतांना झारचा प्राण घेण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्याच्या थोरल्या भावास फांशीं देण्यांत आलें. या गोष्टीचा त्याच्या मनावर फार जबरदस्त परिणाम झाला. तरी पण अत्याचारांच्या मार्गांत कांहीं फायदा होण्याचा संभव नाहीं ही त्याची खात्री होतीच. तो म्हणत असे : "या मार्गानें यश येणार नाहीं; हा बरोबर नव्हे." पण या म्हणण्याचा अर्थ लढा संपवून हात झाडून मोकळें व्हावयाचें असा मात्र नव्हे. आपल्या मार्गानें जाण्याची त्याची तयारी चालू होतीच. अर्थात् त्याचा मार्ग दूरचा व त्रासदायकही होता. परंतु शांतपणानें तीस वर्षेंपर्यंत त्याचें आक्रमण अव्याहत चाललेंच होतें. एकदम उठला तो कामकऱ्यांचा पुढारी बनला असें त्याचें झालें नाहीं. लेख लिहिणें अगर जाहीर सभांत बोलणें या गोष्टींकडे त्याचें फारसें लक्ष नसे. सामान्य जनतेच्या स्थितीची चौकशी करावयाची व तिचें पूर्णपणें आकलन करून घ्यावयाचें हा उद्योग अगदीं अविश्रांत चालू. पुढें मोठेपणींही वक्ते किंवा इतर सुंदर भाषण करणारे यांच्याविषयीं त्याला तिटकाराच वाटे. शब्दांचा पूर व कृति रतिमात्र असें होण्याची त्याला भारी भीति वाटावयाची. कृतीखेरीज याच्यापाशीं दुसऱ्या कशाचीही किंमत नसे. त्याचें मत असें : "क्रान्ति नुसत्या कागदावर राहून काय उपयोग? प्रत्यक्ष कृतींत उतरली तर ती क्रान्ति! सोव्हिएट सभेविषयीं दहा ठराव करण्या-

पेक्षां एखादी क्षुल्लक बाब जरी योग्य प्रकारें अंमलांत आणली गेली तरी तिचें महत्त्व अधिक." म्हणूनच मॅक्सिम गॉर्कीनें याचें वर्णन केलें आहे तें योग्य आहे : "त्याच्या वीर्यशालित्वांत भपकेबाजपणा नव्हता पृथ्वीवर न्याय प्रस्थापित होणार असा दृढ विश्वास असणाऱ्या क्रान्तिकारकाचा विनयपूर्ण व निर्लोभी असा उत्साह आणि अंगीकृत कार्य यशस्वी करण्यासाठीं ऐहिक सुखावर लाथ मारणाऱ्या वीराचें शौर्य हे त्याचे प्रधान गुण." त्याचें प्रसंगावधान कमालीचें बिनचूक असे. सर्व राष्ट्र धोक्यांत असतांदेखील अगदीं बारीकसारीक तपशिलाच्या गोष्टींकडे त्याचें लक्ष किती असे याचें एक नमुनेदार उदाहरण सांगण्यांत येतें इ. सन १९२१ सालीं असा समय आला कीं, मॉस्कोच काय, पण सर्व सोव्हिएट राज्यपद्धति कोसळून पडते कीं काय असें वाटलें; पण इकडे लेनिन खेडेगांवांत विजेचा पुरवठा कसा करावा याचा विचार करीत होता व कांहीं भागांतून तर ताबडतोब विजेचा पुरवठा होण्याबद्दल त्यानें हुकूम सोडले.

लेनिन कार्यनिष्ठेनें भारावून जावयाचा हें खरें; पण तो अतिशय निर्विकार असे. तो उत्साहातिरेकाच्या पंखानें कधीं उडून जात नसे. स्नेहांत बिघाड झाला तरी तो जिवलग मित्रालाही हार जात नसे. प्रत्यक्ष रंगणांत न उतरतां नुसती सहानुभूति दाखविणारांस तो फारशी भीक घालीत नसे. आपल्या कार्याला सर्वस्वी वाहून घेणारे तज्ज्ञ क्रान्तिकारक, शंभर टक्के एकनिष्ठ मदतनीस त्याला फार आवडत. क्रान्तीची पूर्वतयारी सावधपणानें व शांततेनें करावयाची असते. क्रान्ति हाच ज्यांचा निदिध्यास व उद्योग असे तज्ज्ञ शिकवून तयार करावे लागतात. तेथें नुसत्या उत्साही, ध्येयवादी अथवा फुलपांखरासारखे इकडून तिकडे उडणाऱ्या माणसांचा काय उपयोग? रोजच्या व्यवसायांत गुरफटलेल्या लोकांना विशिष्ट शिक्षण नसतें व वेळही

नसतो. अशा स्थितींत अशा हौशी लोकांनीं आहे ही राज्यपद्धति टिकविणें हा ज्यांचा जन्माचा धंदा त्या लोकांशीं टक्कर देणें कठिण, जवळ जवळ अशक्य नाहीं का? हिंदुस्थानांत ही गोष्ट आतां जरा जरा पटूं लागली आहे; पण लेनिनला ती पक्की कळून चुकली होती. तो म्हणे : "आमच्या सर्व बांधवांनीं 'शास्त्रीय तज्ज्ञ' हा कडक शब्द-प्रयोग उपयोगांत आणावा. कारण मी जेव्हां तयारीची कमतरता म्हणतों तेव्हां तो आरोप मजकडेही येतो. मोठया जबाबदारीचीं दुष्कर कामें शिरावर घेणारांच्या बरोबर मीं सहकार्य केलें आहे. तथापि आपण हौशी असलों तरी अतज्ज्ञ आहों ही जाणीव सारखी आम्हांस टोंचत असे. हें कबूल करण्याची खरोखरच लाज वाटे व क्रान्ति-कारकाला केवळ एखाद्या सामान्य हौशी माणसाच्या पंक्तीला नेऊन बसविणाऱ्या खोटया समाजसत्तावाद्यांची चीड येई." राज-कारणांत उथळपणानें भाग घेणाऱ्या आपणां हिंदी लोकांना हें सत्य कितीतरी पटीनें अधिक लागू पडतें बरें?

आपल्या देशांत ठिगळें जोडून केलेल्या एकीचा फार वडेजाव होतो. असल्या ऐक्यावर लेनिनचा बिलकुल विश्वास नसे. कृतीचा आग्रह धरून तर त्यानें इ० सन १९०३ सालीं जाणूनबुजून आपल्या पक्षाचीं शकलें केलीं. त्याचा सहकारी ट्रॉट्स्की यानेंच त्याचा 'पक्षविध्वंसक' या नांवानें अधिक्षेप केला. लेनिनचा हट्ट असा कीं, पक्षाच्या प्रत्येक सभासदानें नुसती द्रव्याची मदत करून भागा-वयाचें नाहीं; तर त्यानें प्रत्यक्ष कार्यांत अंशभागी झालें पाहिजे, असा स्पष्ट नियम पक्षाच्या घटनेंत घातला पाहिजे. पक्षांतील अल्पसंख्य कांचें म्हणणें पडलें कीं, सहानुभूति व सांपत्तिक साहाय्य मिळालें तरी पुरे. कार्याशिवाय लेनिन यांची बातही ऐकण्यास तयार नव्हता. यानंतर कांहींतरी एकीच्या सूचना घेऊन त्याच्याकडे कोणी लोक

गेले. किंचिदपि विकारवश न होतां, शांत चित्तानें हंसून त्यानें उत्तर दिलें : " राजकीय विरोधकांशीं तडजोड करण्याचा मार्ग एकच व तो म्हणजे त्यांच्या ठिकऱ्या उडविणें हा होय."

आस्ते आस्ते त्याच्या सहकाऱ्यांनीं त्याला राम राम ठोकला; पण त्याला कांहीं धास्ती वाटली नाहीं व तो पाय रोंवून ठाम बसला होता तेथेंच राहिला. तो म्हणाला : " कदाचित् मी एकटा एकच शेवटीं शिल्लक राहीन; परंतु माझ्या मतांपासून मात्र मला कोणीही भ्रष्ट करूं शकणार नाहीं. मी त्यांचा पुरस्कार केव्हांही सोडणार नाहीं आणि सदैव सरळ मार्गानेंच जात राहणार ! "

लेनिन जरी असा कार्यवेडा व दुराराध्य असे तरी मोठा चाणाक्ष होता व परिस्थितीप्रमाणें आपल्या धोरणाला मुरड घालणें त्याला जरूर वाटलें कीं, तो ती घालण्यास एका पायावर तयार असे. रशियांतील शिक्षणखात्याचे मुख्य व त्याचे स्नेही लूनाकास्की हे तर त्याला वारा वाहील तशी पाठ देण्याच्या कामांत अत्यंत तरबेज समजत. लेनिननें लिहिलें आहे : " तत्त्वावर तडजोड होत असलेली मोडणें हें पोरकटपणाचें होय. परिस्थितीची फोड कशी करावयाची व प्रत्येक मुद्दयाच्या प्रत्यक्ष अटी कोणत्या हें चांगलें समजलें म्हणजे झालें." समाजसत्तावादाच्या एका मूलतत्त्वापासून च्युत झाल्याचा आरोप त्याजवर केला तेव्हां तो म्हणाला, " तुम्हांला कोंबडीइतकेंही ज्ञान नाहीं. खडूची रेघ काढली, कीं कोंबडीला ती ओलांडून पलीकडे जाण्याचें धाष्टर्य होत नाहीं. पण ती रेषा तिनें स्वतः तरी काढलेली नसते, म्हणून ती समर्थन निदान करूं शकते. पण तुमच्या बाबतींत तुम्हीं स्वतःच ती मर्यादेची रेषा ओढली आहे व आतां प्रत्यक्ष स्थिति पाहण्याऐवजीं त्या रेषेकडेच टक लावून बसलां आहां !" हिंदुस्थानांत

असल्या रेषा कित्येक तरी आपणच काढलेल्या आपणांस दिसतात आणि आपण त्यांच्यापलीकडे वस्तुस्थितीचें निरीक्षण करूं शकत नाहीं.

सन १९०५ ची राज्यक्रान्ति निष्फळ ठरल्यानंतर त्यानें आपल्या अनुयायांस अतिशय जबरदस्त धक्का दिला. बिलकुल न कचरतां, हत्यारबंद बंडाच्या या पुरस्कर्त्यानें एकदम मवाळ व निमसरकारी डयूमा (लोकसभा) सभेंत भाग घ्यावा अशी शिफारस केली आणि तिच्या बैठकींच्या तपशीलवार हकीगतींचा अभ्यास करण्याविषयीं आपल्या अनुयायांस अनुज्ञा केली. स्वतःचीं तत्त्वें सोडून त्यानें उत्क्रान्तीच्या मार्गाचें अवलंबन केलें असा याचा अर्थ नव्हे. त्याला असें दिसून आलें कीं, सांप्रत क्रान्तीची चळवळ करण्यास आपणांस मोकळी भूमिका म्हणजे या डयूमा सभेची. दुर्बल म्हणून त्याचा धिक्कार झाला. पार्लमेंटच्या सनदशीर मार्गाच्या चळवळीस हा बळी पडला असें विधान करण्यांत आलें. तथापि त्यानें या लोकनिंदेची पर्वा केली नाहीं. सशस्त्र बंडाचें ध्येय नजरेसमोर ठेवून तो धैर्यानें आपल्या मार्गानें गेला. कौन्सिल-प्रवेशाच्या आपल्या आजच्या वादविवादांत लेनिनचें हें मतांतर मोठें मनोरंजक वाटेल.

प्रस्तुत तहनामे, तडजोडी व ऐक्यपरिषदा यांचे दिवस आहेत; त्यामुळें लेनिनचीं मतें बोधप्रद वाटतील. सन १९१२ सालीं एका मित्राच्या पत्रांत त्यानें लिहिलें कीं : “ श्रीमान्, मध्यम वर्गाचे लोक, नेमस्त व सामाजिक क्रान्तिकारक हे मोठया प्रश्नांचा गंभीरपणानें कधीं विचारच करीत नाहींत. असे प्रश्न ते एकामागें एक ठेवून दृष्टीआड करतात, तडजोड करतात, आलटापालट करून जुन्या चाकोरींतून ते पावलें टाकतात आणि सामाजिक लोकशाहींत भांडाभांड व तंटे असतात असा डांगोरा पिटतात. सामाजिक लोकशाही व हे सर्व लोक यांमध्यें बरोबर हाच मतभेद आहे. सामाजिक लोकशाहींत जे

वेगवेगळे पक्ष अगर संघ असतात त्यांमधील परस्पर मतभेद मूलतः विचारांच्या उगमस्थानापासून निघालेले असतात. पण या लोकांना असें वाटतें कीं, या केवळ पृष्ठभागावरच्या मतभेदांची सारवासारव करण्यांत आली असते व आंतूनही ते मतभेद पोकळ, क्षुल्लक व वरवरचे असतात. सामाजिक लोकशाहींत अस्तित्वांत असणाऱ्या भिन्न भिन्न प्रवृत्तींचा जोराचा झगडा सोडून, सामाजिक क्रान्तिकारक व त्यांचे भागीदार यांचें शृंगारलेलें पोकळ दारिद्र्य स्वीकारण्यास मी तर कालत्रयीं तयार होणार नाहीं."

या पद्धतीनें लेनिननें त्या महादिनाची सर्व तयारी केली. सन १९१७ सालाच्या आरंभास क्रान्तीचें नेतृत्व अंगीकारण्यास त्यास स्वित्झरलंड देशामधून येण्याविषयीं पाचारण करण्यांत आलें तेव्हां त्यानें त्या देशांतील कामकऱ्यांसाठीं एक निरोप मागें ठेवला. आपल्या आयुष्यांतील कामगिरीचें सार्थक होणार, तपाला फळ येणार म्हणून तो लवमात्र जोषाच्या किंवा आवेशाच्या आहारीं गेला नाहीं अगर विकारांच्या ताब्यांत गेला नाहीं. रशियांतील खरी स्थिति काय होती व त्याचें तत्संबंधीं उद्दिष्ट काय होतें याचें त्यानें एखाद्या शास्त्रज्ञाप्रमाणें टिपण तयार करून ठेवलें.

वस्तुस्थितीस धरून आपलें ध्येय व तत्त्वज्ञान यांचा विचार करणें पुष्कळसें दुरापास्त वाटतें. स्वराज्याविषयीं कित्येक वर्षें आपण लिहीत व बोलत आहोंत; पण जेव्हां स्वराज्य प्रत्यक्ष व्यवहारांत दिसूं लागेल तेव्हां आपण आश्चर्यचकित व दिङ्मूढ होऊन बसूं. राष्ट्रीय सभेंत आपण स्वातंत्र्याचा ठराव करून बसलों आहों; तथापि त्याच्या खऱ्या अर्थाची आपणांपैकीं कितीकांना कल्पना आहे? कितीजण तो ठराव आपल्या शब्दांनीं व कृतींनीं खोटा पाडतात वरें? त्यांना वाटतें कीं, स्वातंत्र्य हें फार दूरचें ध्येय आहे आज-

उद्यां साध्य होणारी गोष्ट नव्हे. ते सभांतून व कौन्सिलांतून स्वातंत्र्य आणि स्वराज्य हे शब्द अघळपघळ बोलतात; पण मनांत पुष्कळ वाद करतात आणि त्यांच्या कृति तर दुर्बळपणाच्या आणि अर्धवट असतात.

रशियांतदेखील मागील पिढीचे क्रान्तिकारक असेच केवळ तात्त्विक जगांत रहात असत; आणि आपलें ध्येय सिद्ध होईल असें त्यांना वाटत असे अगर नसे याची वानवाच होती; परंतु वस्तु-स्थितीचें ज्ञान असणारा व प्रत्यक्षाप्रत्यक्ष रोखठोक बोलणारा आणि कार्य करणारा लेनिन जेव्हां येऊन दाखल झाला, तेव्हां जुनापुराणा समाजसत्तावाद व तसलीच क्रान्ति त्यानें नष्ट करून टाकली. ज्या ध्येयांचीं आपणांस स्वप्नें पडलीं व ज्यांच्या सिद्धीसाठीं आपण श्रम केले तीं नुसतीं मनोराज्यें नव्हतीं, तर प्रत्यक्ष व्यवहारांत नांदणारीं होतीं हें त्यानें जनतेला शिकविलें. स्वतःच्या जबरदस्त इच्छाशक्तीनें त्यानें सबंध राष्ट्रावर एक प्रकारची मोहिनी घातली व बेकीनें दुभंगलेल्या आणि अधःपतित झालेल्या राष्ट्राच्या अंतःकरणांत नवजीवन ओतलें व त्यास अंगीकृत कार्याच्या सिद्धीसाठीं निश्चयपूर्वक आणि स्वार्थत्याग-पूर्वक वाटतील तितके परिश्रम करण्यास समर्थ केलें.

एवढा मोठा विजय संपादन करण्यांत पुष्कळांचा हात होता. ट्रॉट्स्कीचा फार मोठा भाग होता. तो आतां सैबीरियांत जाऊन पडला आहे; पण सर्वांत श्रेष्ठ भाग लेनिनचा होता. त्याला साधु म्हणा, भोंदू म्हणा. ही जादू त्यानेंच मुख्यतः घडवून आणली आणि म्हणूनच रोमेन रोलंडनें लेनिनचें "आपल्या शतकांतील मोठ्यांत मोठा आणि निःस्वार्थी सुकृती" असें वर्णन केलें आहे त्याचेंच आपणही अनु-करण करतों.

प्रकरण आठवें

## आणखी कांहीं पुस्तकें

रशियाच्या आजच्या परिस्थितीचें यथार्थ आकलन व्हावयाचें तर समाजसत्तावादाचें तत्त्वज्ञान व रशियन राज्यक्रान्तीचा इतिहास यांचा परिचय करून घेतला पाहिजे हें पूर्वीं सुचविण्यांत आलेंच आहे. यासाठीं उपयुक्त असणाऱ्या कांहीं पुस्तकांचा नामनिर्देश माझ्या समजुती-प्रमाणें मीं केला आहे; परंतु क्रान्तीचें खरें यश व कसोटी तात्त्विक चर्चेंत नाहीं, जनतेच्या धैर्यांत व उत्साहांत नाहीं किंवा लेनिनच्या मोठेपणांतही नाहीं. तसेंच, बोल्शेव्हिक लोकांनीं निष्ठुरपणानें आपल्या विरोधकांचा उच्छेद केला आणि पांढरी जुलमशाही घालवून तिच्या ऐवजीं लाल उभी केली म्हणून राज्यक्रान्ति अयशस्वी ठरली असेंही अनुमान काढणें बरोबर नाहीं. जनतेच्या सुखांत पडलेली भर हेंच एक यशस्वितेचें माप. अर्थात् हा प्रश्न थोडा मानसिक आहे हें खरें; पण थोडासा व्यावहारिक स्थितीचा व आंकड्यांनीं आणि इतर प्रत्यक्षप्रमाणांनीं सिद्ध करण्यासारखाही आहे हें कबूल केलें पाहिजे. दीर्घ काळपर्यंत दृढ परिचय असल्याशिवाय जनतेची मनःस्थिति ताडून पाहणें कठिण आहे. कांहीं वेळ ऐहिक सुख थोडें कमी झालें तरी पुरवलें; पण एकदांचें पारतंत्र्यांतून मुक्त होणें बरें, हें म्हणणें योग्य आहे आणि रशियांत जाऊन आलेले लोकही असेंच सांगतात कीं, क्रान्तीच्या सुरवातीस अंतस्थ यादवीमुळें व व्यापारी बंदीमुळें लोक अन्नावांचून अगदीं जर्जर झाले होते, सुखाला मुकले होते, पण नवीन मिळालेल्या स्वातंत्र्यांत त्यांनीं समाधान मानलें. परंतु वाटलें तर आपण मानसशास्त्राचा भाग सोडून देऊं. कांहीं झालें तरी क्रान्तीनंतरच्या व्यावहारिक परिस्थितीचें अवलोकन आपण करूं

ग्र. क्र. ४६०३

शकतों, प्रतिवर्षी तींत कसकसा बदल होत गेला हें आपण पाहूं शकतों आणि त्यावरून पुढें प्रगति अगर पीछेहाट कशी होणार याचें अनुमान बांधूंही शकतों.

असा अभ्यास करण्यासाठीं आज भरपूर वाङ्मय व इतर साधन-सामुग्री तयार आहे. दुर्दैवानें माझें ज्ञान मात्र अपुरें आहे. मीं वाचलेल्या व ऐकलेल्या कांहीं पुस्तकांचाच येथें निर्देश करणार आहें. कोपन-हेगन विद्यापीठांतील स्लाव्ह भाषेचे अध्यापक अँटॉन कार्लग्रेन यांचें 'बोल्शेव्हिस्ट रशिया' हें पुस्तक तर उघड उघड बोल्शेव्हिकांच्या विरुद्ध चळवळ करण्याकरितांच लिहिलें आहे. त्याचा विरोधी पक्षाची समजूत करून घेण्याकरितां उपयोग होईल म्हणूनच उल्लेख केला आहे. बरट्रँड रसेल यांचें 'बोल्शेव्हिझमचें तत्त्व व व्यवहार' हें पुस्तकही टीकात्मक आहे; पण पहिल्याहून सौम्य आहे. हे स्वतः सपत्नीक रशियांत जाऊन आले. तथापि मौज अशी कीं, दोघांचींही मतें वेगवेगळीं पडलीं. बरट्रँड रसेलसाहेबांचें मन तेथील परिस्थिति पाहून खिन्न झालें, तर त्यांच्या पत्नीला असें वाटलें कीं, सुखाच्या भावी कालाचा पाया बोल्शेव्हिक लोक घालीत आहेत. अंतस्थ यादवींतून रशिया बाहेर पडून सगळीकडची स्थिरस्थावर करण्यापूर्वींच बरट्रँड रसेल हे तिकडे जाऊन आले होते.

रेनी फुलॉप मिलर यांचें 'माइंड अँण्ड फेस ऑफ बोल्शेव्हिझम्' हें बरेंच जाडें पुस्तक निदान त्यांतील बोधपर सुंदर चित्रांसाठीं तरी जरूर पहावें. त्यांत रशियाच्या संस्कृतीचा बराच ऊहापोह आहे आणि तें जरी प्रायः टीकाप्रधान असलें व गुणग्राही नसलें तरी रशियांत आज विचारप्रवाह कसकसे वाहत आहेत तें त्यावरून चांगलें स्पष्ट होत आहे.

मॉरीस जॅब्स यांचें 'क्रान्तीपासून रशियाची आर्थिक प्रगति' हें

सन्मान्य असें पुस्तक आहे. स्वतः जॅक्स हे नामांकित अर्थशास्त्रज्ञ आहेत, रशियन क्रान्तीच्या मूलतत्त्वांविषयीं त्यांची बरीच सहानुभूति आहे; तथापि ते मार्मिक व शास्त्रोक्त चिकित्सक नाहींत असें मात्र नव्हे. रशियांतील आर्थिक धोरणांतील वाढ व बदल, शहरवासी कॉम्यूनिस्ट व खेडेगांवांतील रूढिप्रिय शेतकरी आणि विशेषेंकरून उत्पादन-शक्तीवरील त्या धोरणाचे परिणाम यांचें विवेचन या ग्रंथांत केलेलें आढळतें.

अगदीं अलीकडचें आणखी एक साधन म्हटलें म्हणजे गेल्या वर्षीच्या दशम वाढदिवसाच्या समारंभास हजर असलेल्या ब्रिटिश प्रतिनिधींचा वृत्तान्त. त्याचें नांव 'आजचा सोव्हिएट रशिया'. बोलून चालून हा रशियाच्या मित्रांचा वृत्तान्त. तो फार मूल्यवान् व माहितीनें भरलेला आहे. इंग्लंड आणि स्कॉटलंड यांमधील कामकरी संस्थांच्या ९२ प्रतिनिधींनीं यावर सह्या केल्या आहेत. हें किती एकदेशीय असलें तरी अशा पत्रकाचा परामर्श घेतल्याखेरीज गत्यंतर नाहीं. तें पत्रक विवेचक स्वरूपाचें नाहीं. त्यांनीं जें जें पाहिलें त्यानें त्यानें ते उत्साहभरित झाले व त्यांचा उत्साह या पत्रकांत दिसतोच. त्यांनींच म्हटलें आहे, " प्रत्येक दिवशीं आमच्या अंतःकरणांत उत्साहातिरेकाच्या ज्या लाटा उसळल्या त्यांचें वर्णन करण्यास शब्द असमर्थ आहेत. या देशांत घातुक जमीनदारी व भांडवलशाही नष्ट झाली. सर्व प्रकारचें उच्च ज्ञान आणि औद्योगिक शोध व प्रगति कामकऱ्यांच्या सेवेस सादर आहेत असें आम्हांला आढळलें तेव्हां आमचा आनंद गगनांत मावेना." अनुभविक, व्यवहारी अशा कामकऱ्यांच्या प्रतिनिधींच्या मनावर असा परिणाम व्हावा ही विशेष विचारांत घेण्यासारखी गोष्ट होय. निरनिराळ्या देशांतील कामकऱ्यांच्या अंतःकरणांत रशियन राज्यक्रान्ति कसें स्थान पटकावीत आहे व मॉस्को

ही गरिबांची 'काशी' कशी होत चालली आहे याचें प्रत्यंतर आपणांस या गोष्टीपासून मिळतें. त्यांच्या मनांत जें अरूपावस्थेंत होतें आणि ज्याचीं स्वप्नें त्यांस पडत तें सोव्हिएट रशियानें सत्यसृष्टींत आणलें. यामुळें कामकऱ्यांस नवीन आशा वाटूं लागली व त्यांना नवीन धीर आला.

साम्राज्यवाद-विरोधी कॉंग्रेस ब्रूसेल्स येथें भरली होती, तेव्हां दक्षिण आफ्रिकेंतील एक निग्रो मला भेटला. तो फारसा बहुश्रुत नव्हता. तो एक अगदीं साधा कामकरी होता. तो म्हणाला, " मला रशिया-विरुद्ध पुष्कळ गोष्टी सांगण्यांत आल्या असल्या तरी त्या सर्वच खऱ्या नसाव्या असें माझें मन मला सांगतें. रशियाविषयीं मला व आमच्या सर्व जातीला आपुलकीची भावना वाटते आणि आम्ही मोठ्या आशेनें त्या देशाकडे पाहतों ! "

ब्रिटिश मजूर प्रतिनिधींच्या या रिपोर्टावरून आपणांस पुष्कळ गोष्टी थोडक्यांत कळतात. कारखाने, ते चालविण्याची पद्धति, मजुरी, भाडें, राहाण्याची व्यवस्था, शिक्षण, तुरुंग, शेतकरी, सहकार्य वगैरे वगैरे विषयांची माहिती त्यांत मिळते. एकदां तें पत्रक वाचलें म्हणजे, असें वाटूं लागतें कीं, लिहिलेल्या गोष्टींपैकीं अर्ध्या जरी खऱ्या असल्या तरी रशिया म्हणजे आशेच्या किरणांचा देशच समजला पाहिजे.

आणखी एका ग्रंथमालेचा निर्देश करतों. न्यूयॉर्क येथील 'व्हॅन-गार्ड' छापखान्यामार्फत ती प्रकाशित केली जात आहे. प्रत्येक पुस्तकाची किंमत पन्नास सेंट्स्. अशीं तेरा पुस्तकें. रशियांतील एकंदर जीवनक्रमाच्या प्रत्येक बाजूचा व पैलूचा यांतून विचार आणि वर्णन केलें आहे. सर्व लेखक नाणावलेले व आपापल्या विषयांत तज्ज्ञ असे आहेत. या मालेचें पहिलें पुष्प मि० एच्. एन्. ब्रेल्सफर्ड यांचें 'सोव्हिएट संस्थांचें काम कसें चालतें' हें. दुसरीं पुष्पें म्हटलीं म्हणजे रशियाचें परराष्ट्रीय धोरण, धर्म, गांवगाडा, आर्थिक व्यवस्था,

कुटुंबपद्धति, शाळा, राजकीय हक्क, मजूरसंघ, राष्ट्रांतील अल्पसंख्याक वर्ग व कला आणि संस्कृति या विषयांसंबंधींचीं आहेत. या मालेनें रशियाविषयींच्या वाङ्मयांत बहुमोल भर टाकली आहे यांत शंका नाहीं.

बोल्शेव्हिक राज्यक्रान्तीपासून आतांपर्यंत दहा वर्षे लोटलीं; परंतु परकी व अन्तस्थ शत्रूंशीं लढण्यांत आणि त्याहूनही अधिक कठोर अशा दुष्काळास व व्यापारी बंदीस तोंड देण्यांत पहिलीं पांच वर्षें जवळ जवळ सर्व खर्चीं पडलीं. अनेक प्रकारच्या शत्रूंनीं त्या देशावर हल्ला चढविला व खाण्यापिण्याचे पदार्थ पाठविण्याचेंच बंद करून त्याची उपासमार व गळचेपी करण्याचा प्रयत्न केला. कित्येक वर्षेपर्यंत या राज्यक्रान्तीच्या परिणामाचा कांटा कोणत्या बाजूस झुकतो तें सांगतां येत नव्हतें अशी स्थिति होती. राष्ट्राचा सांपत्तिक व्यवहार शतशः खंडित झाला होता. गेलीं पांच वर्षेंच काय तीं थोडीं शान्ततेचीं मिळालीं आणि तेव्हांच रशियास आपली स्थिति सुधारण्यास कांहीं फुरसत लाभली म्हणावयाची. याही अवधींत झालें तरी युरोपखंडांतील बहुशः सर्व राष्ट्रांतील सरकारांचा व त्याचप्रमाणें परात्पर भांडवलशाहीच्या शिरोभागीं असणाऱ्या अमेरिकन राष्ट्राचा विरोध व शत्रुभाव यांना रशियाला तोंड द्यावयाचें होतें. स्वतः रशियाजवळ आत्मोन्नति करून घेण्यास साधनें नव्हतींच. बाहेरूनही पैसा व इतर मदत मिळणें अगदीं अशक्य. गेल्या पांच वर्षांत जी कांहीं प्रगति झाली ती या अडचणी असूनही झाली हेंच विशेष; आणि या बाबतींत ज्यांचा ज्यांचा अधिकारानें बोलण्याचा हक्क त्यांचा त्यांचा निर्णय असा कीं, रशियाची प्रगति झाली इतकेंच नव्हे, तर त्यानें गेल्या आठ वर्षांच्या युद्धकालांत झालेलें नुकसानदेखील भरून काढलें आहे. जर्मन महायुद्धाच्या प्रारंभीं, म्हणजे इ० सन

१९१४ सालीं रशियाचें जें उत्पन्न होतें तें बरेंच वाढलें आहे व तें वेगानें आणखीही वाढत आहे.

अमेरिकन राष्ट्र सोव्हिएटसरकार मान्य करीत नाहीं; पण असा विरोध असूनही कित्येक अमेरिकन व्यापारी लोक रशियाच्या प्रगतीचें समक्ष अवलोकन करण्याकरितां रशियांत जातात व कित्येक अध्यापक व विद्यार्थी तिकडे तेथील परिस्थितीचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यासाठीं जातात. परदेशीय प्रवासी रशियांत पुष्कळच असतात व ते देखील नुसते पाश्चिमात्य युरोपखंडभर विहार करीत फिरणारे उडते प्रवासी नव्हत; तर काळजीपूर्वक अभ्यास करणारे व चौकस लोक; स्तुतिपाठ गाण्याकरितां गेलेले केवळ समाजसत्तावादी नव्हत, तर व्यापारी क्षेत्रें हुडकून काढणारे व पिढीजात कल्पनांचा उच्छेद करणारें हें विरोधी राष्ट्र तरी काय आहे हें कुतूहलबुद्धीनें पाहणारे विचारी भांडवलवाले. चीन, इराण व अफगाणिस्तान या पौर्वात्य राष्ट्रांचे प्रतिनिधिही या चौकस मंडळींत असतातच. मुख्यतः शिक्षणपद्धति, शेतकी, सहकार्य, लष्करी यंत्र इत्यादि गोष्टींचें निरीक्षण करण्यास ते जात असतात. आम्ही जेव्हां मॉस्कोच्या शिक्षणमंत्र्यांची कचेरी बघावयास गेलों तेव्हां तेथें आम्हांस अफगाण शिक्षणखात्याचे दोन वरिष्ठ अधिकारी भेटले आणि त्यांपैकीं एक तर अलिगड कॉलेजचा माजी विद्यार्थीच होता.

आमच्याइकडील प्रोफेसर व विद्यार्थीदेखील अशी चौकशी करून माहिती मिळविण्याकरितां रशियांत गेले व त्यांनीं तिकडील शिक्षण, शेतकी वगैरे पद्धतींचा व प्रगतीचा अभ्यास केला, तर फारच उत्तम गोष्ट होणार आहे. राजकारणी पुरुषांच्या भेटीपेक्षां यांच्याच भेटीचा आपणांस अधिक उपयोग होईल. आपल्या विद्यापीठांनीं लायक

प्रतिनिधींचीं अशीं शिष्टमंडळें या कार्यासाठीं तिकडे पाठविलीं तर काय हरकत आहे ?

आमचीं विद्यापीठें व त्यांत लक्ष घालणारे इतर लोक यांनीं पत्र-द्वारा रशियांतील शिक्षण-संस्था व इतर संस्कृति-विषयक संस्था यांच्याशीं संबंध ठेवावा व यांच्याबरोबर आपल्या प्रकाशितांची अदलाबदल करावी. अर्थात् ब्रिटिशसरकारनें ह्याला हरकत घेतली तर प्रश्न निराळाच; रशियाला तर असलें सहकार्य हवेंच आहे. जरूर ती माहिती पुरविण्यास रशिया आनंदानें तयारच आहे. आपली प्रगति कशी चालली आहे, याविषयीं इंग्लिश वगैरे निरनिराळ्या भाषांतून मधून मधून पत्रकें व पुस्तकें रशियांत प्रसिद्ध केलीं जातात. हीं सर्व एका बाजूचीं असणार हें उघडच आहे; पण तीं तरी अधिकारयुक्त रीतीनें कळतील व आंकडे तर अगदीं ताजे मिळतील. मॉस्कोचें शिक्षण-प्रसिद्धि खातें नियमितपणें आपला वार्षिक वृत्तान्त व आंकडे प्रसिद्ध करीतच असतें.

परदेशांशीं सांस्कृतिक संबंध ठेवणारी व संवर्धित करणारी एक संस्था आहे, ती इतर पुस्तकांखेरीज, रशियन, इंग्लिश, फ्रेंच व जर्मन या भाषांतून साप्ताहिक वृत्तपत्रें प्रसिद्ध करते. या संस्थेचा पत्ता 'मलाया निकित्सकाया, मॉस्को नंबर ६' असा आहे. सोव्हिएट संघाचें वार्षिक पुस्तक (ईअर बुक) प्रसिद्ध होतें; तें तर रशियाविषयक माहितीची एक खाणच असतें. अगदीं ताजें म्हणजे इ० सन १९२८चें असें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे.

## प्रकरण नववें

# शेतकरी वर्ग

मॉस्को येथें आम्हीं पाहिलेल्या ठिकाणांत मनावर विशेष परिणाम करणारें असें ठिकाण म्हटलें म्हणजे मध्यवर्ति शेतकरी-गृह हें होय. या गृहाची इमारत बरीच मोठी होती. तींतच प्रदर्शनें, प्रयोग-शाळा, व्याख्यानालयें व सुमारें २९० माणसांना राहण्यास जागा एवढी तरतूद केलेली होती. ज्यापासून शेतकऱ्यास बोध होईल किंवा ज्यांत त्याला गोडी लागेल असें सर्व कांहीं त्यांत समाविष्ट केलें होतें. शेतकी-पासून उत्पन्न होणारे सर्व पदार्थ तेथें व्यवस्थित रीतीनें गौरीप्रमाणें मांडून ठेवले होते. सर्वांवर ज्याच्या त्याच्या नांवाचा कागद लावला होता व माहिती लिहिलेली होती. कांहीं दिवाणखाने तर अगदीं नवीन शेतकी-च्या औतांनीं व यंत्रांनीं गच्च भरून गेले होते. शेतकऱ्यांच्या नवीन धर्तीच्या व स्वच्छ घरांचे आणि शेतांचे नमुने करून पुष्कळ मांडून ठेवले होते. इमारतीची एक पाकळी आरोग्यविषयक चळवळीला वाहिलेली होती. रोगाचें निवारण कसें करावें, घरें निर्मळ व आरोग्यावह कशीं राखावीं याचें ज्ञान, चित्रें, जाहिराती वगैरेंच्या साहाय्यानें देण्यांत येत होतें.

एका भागांत विजेची व्यवस्था होती. उजेडासाठीं व शेतकीच्या कामासाठीं तिचा कसा उपयोग करावयाचा याचें प्रयोगात्मक ज्ञान देण्यांत येत होतें. विजेनें चालणारे विविध प्रकारचे पाण्याचे पंप बरेच दिसून येत होते. रशियांत विद्युत्संचयाचीं स्थळें किती झपाट्यानें वाढलीं हें एका कागदावर नकाशा काढून दिग्दर्शित केलें होतें. एकंदर देखावा असा सजविण्यांत आला होता कीं, विजेचे फायदे पाहून शेतकरी क्षणभर आश्चर्यचकितच होऊन जावा!

या गृहांत असंख्य शेतकरी लोक येऊन जात, व त्यांना सर्व देखावे हिंडवून दाखविण्यांत येत आणि जरूर ती माहितीही पुरविण्यांत येई. शेतकीविषयक जरुरीच्या विषयांवर व्याख्यानें होत. यांत्रिक व कायदेशीर सल्ला मोफत देण्यांत येत असे. ठराविक शेतकीचा शिक्षणक्रम पूर्ण व्हावा या हेतूनें निदान दोन महिने तरी या गृहांत राहण्यास शेतकऱ्यांचें मन वळविण्यांत येई. मुख्य इमारतीला लागूनच एक उपाहारगृह ठेवण्यांत आलें होतें, त्यांत स्वस्त खाण्यापिण्याची व्यवस्था केली जात असे. थेट खेड्यापाड्यांतून आलेले पुष्कळ शेतकरी लोक तेथेंच उतरलेले आम्हीं पाहिले.

ही फारच सुंदर संस्था होती व ती पाहिल्यावर कोणालाही असें वाटे कीं, असली एक संस्था जरी असली तरी शेतकऱ्यांचें नशीब थोडेंबहुत उघडल्याखेरीज राहणार नाहीं. या मध्यवर्ति संस्थेचीं लहानमोठीं अपत्यें रशियाभर सारखीं पसरत होतीं असें आम्हांस सांगण्यांत आलें. मॉस्को जिल्ह्याचें असें दुसरें गृह मॉस्को शहरीं होतेंच. खुद्द रशियांत ३५० च्या आंतबाहेर अशीं गृहें होतीं. यांच्याशिवाय युक्रेन व आशियाटिक रशिया या भागांत असलेलीं वेगळींच. असें असल्यावर अगदीं स्वल्प कालांत शेतकऱ्यांचा जसा नवा मनूच सुरू होईल म्हटलें तर त्यांत आश्चर्य काय ?

रशिया हा तर शेतकी-प्रधान देश आहे हें महशूरच आहे. असें असून प्रारंभीं क्रान्तीचा सर्व बोजा उद्योगधंद्यांतील मजुरांवरच पडला. क्रांतीचे शिरोमणि म्हटले म्हणजे लेनिनग्राड व मॉस्को या शहरांतील गरीब लोक. कांहीं कालपर्यंत सोव्हिएट संस्थांत शेतकरीवर्गाचे प्रतिनिधी बेताबाताचे असत. जमिनीची मालकी राष्ट्राची असा जाहीरनामा मात्र जेव्हां सोव्हिएट सरकारानें काढला तेव्हां तत्काल त्याचा फायदा घेऊन, मध्यवर्ति सरकारची पडत्या फळाची आज्ञा घेऊन,

शेतकऱ्यांनीं जमीनदारांचें उच्चाटन केलें व आपापसांत जमिनीची वांटणी करून घेतली. हें एकदां उरकल्यावर सुखवस्तु शेतकरी होते, ते आहे या स्थितींत संतुष्ट राहिले व विद्यमान स्थितींत बदल होऊं नये आणि कांहीं उलटापालट होऊं नये या मताचे बनले. त्यांच्यापैकीं पुष्कळांना समाजसत्तावाद काय आहे याचें ज्ञान नव्हतें व तें संपादन करण्याची त्यांना इच्छाही नव्हती. सोव्हिएट सत्ता धान्यसंचयाच्या व नफेबाजीच्या विरुद्ध म्हणून हे शेतकरी लोक या सत्तेचा द्वेष करूं लागले. एका बाजूनें पाश्चिमात्य युरोपियन राष्ट्रांनीं रशियावर व्यापारी बहिष्कार घातलेला, व दुसऱ्या बाजूनें रशियाच्या दक्षिणभागांतील सुपीक व संपत्तिमान् शेती या विरोधी लोकांच्या ताब्यांत. अशा स्थितींत मोठ्या शहरांत तर फार हलाखीची अवस्था उत्पन्न झाली व 'लाल' सैन्याची उपासमार होऊं लागली. पण सोव्हिएट सरकारानें तावडतोब कडक उपाय योजले आणि श्रीमंत शेतकऱ्यांचीं कोठारें सरकारमार्फत ताब्यांत घेण्यांत आलीं व तीं खुलीं करण्यांत आलीं.

या योगें परिस्थितींत कल पडला हें खरें; पण वर्गवैशिष्ट्याची जाणीव झालेला व पुढारलेला नागरिक मजूर आणि वंशपरंपरागत जमिनीला चिकटून राहणारा पुराणमतवादी शेतकरी यांच्यामधील तंटा चालूच राहिला व अखेर शेतकऱ्यानें जिंकली. लेनिनच्या सांगीवरून सरकारचें सर्व धोरण बदललें आणि ज्याला 'नवीन आर्थिक धोरण' म्हणतात त्याची अमदानी सुरू झाली. परिस्थितीच्या माऱ्याखालीं लेनिनला असें धोरण स्वीकारणें भाग पडलें, किंवा कोणी म्हणतात त्याप्रमाणें, त्याच्या एकंदर तत्त्वज्ञानाचें नैसर्गिक उद्दिष्टच तें होतें हें सांगतां येणें कठीण आहे. लष्करी स्वरूपाचा समाजसत्तावाद फार-वेळ टिकणें शक्यच नव्हतें. परंतु त्याची अमदानी ज्या पद्धतीनें संपुष्टांत आली तिजवरून मात्र लोकमताचा दाव सरकारवर जबर

पडला असला पाहिजे असें अनुमान काढण्यास कांहींच हरकत दिसत नाहीं.

समाजसत्तावादाच्या आपल्या कांहीं तत्त्वांस जरूर तर थोडीशी मुरड घालूनदेखील लेनिन परिस्थितीशीं जुळतें घेत असे. शेतकरी व छोटेखानी व्यापारी यांना तो शरण जाई; परंतु त्याच्या कल्पकतेची व योजकतेची मातबरी अशी कीं, त्यानें शेतकऱ्यांनाही औद्योगिक वळण लावलें. एकदां लेनिननें सवाल टाकला, 'कॉम्यूनिझम्चा अर्थ काय?' व त्यानेंच असें आश्चर्योत्पादक उत्तर दिलें कीं, 'समाजसत्तावाद, समाजसत्तावाद म्हणजे काय विशेष आहे? सोव्हिएट रिपब्लिकमध्यें अधिक विद्युत्प्रसार म्हणजे समाजसत्तावाद, दुसरें काय!' सर्व रशियाभर जिकडे तिकडे वीज चालू व्हावयास पाहिजे असें त्यानें निश्चित केलें होतें. ही योजना जगड्व्याळ होती. कारण रशिया अतिशय अफाट. परंतु आजच विद्युत्प्रवाह बऱ्याच भागांत खेळतो व रशियाभर सर्वत्र पसरलेल्या विद्युत्संचयागारांचा नकाशा रशियन लोक सानंदाभिमानानें दाखवितात.

शेतकऱ्यांची सत्ता दिवसेंदिवस वृद्धिंगत होत चालली आहे यांत संशय नाहीं. अधिकाराच्या जागा बुद्धिवान् लोक व कामकरी यांच्या हातांत असल्या तरी, शेतकऱ्यांची पसंती नाहीं अशा गोष्टी करणें दुष्कर आहे. कॉम्यूनिस्ट पक्षांतील स्टॅलिन विरुद्ध ट्रॉट्स्की हे दोन तटदेखील शेतकीविषयक प्रश्नांवर काय धोरण ठेवावयाचें यावरून पडलेले. आज स्टॅलिनचा पक्ष बलिष्ठ आहे व शेतकऱ्यांशीं तडजोड करावी असा त्याचा सर्वांहून जास्त आग्रह.

कांहीं लोकांचें म्हणणें असें आहे कीं, शेतकरीवर्गांतून एक नवीन उमरावशाही हळुहळू निर्माण होत आहे. कदाचित् हें खरें असेल. परंतु ही उमरावशाही फारशी वाढणार मात्र नाहीं हें खास. सरकारी अधिकार-

यंत्र याच्या सर्वस्वीं विरुद्ध; लोकमत तर याला बिलकुल थारा देणार नाहीं व सामान्य गरीब जनतेची सत्ता इतकी जबरदस्त आहे कीं, सर्व संपत्ति व अधिक बल आपल्या हातांत केंद्रीभूत करूं पाहणाऱ्या कंपूची तेथें कांहींच डाळ शिजणें शक्य नाहीं. करांची पद्धतिच अशी बसविली आहे कीं, सर्वांचें उत्पन्न एका पातळीवर यावें. लहान लहान शेतांपैकीं शेंकडा पंचवीस टक्के शेतांना शेतकीचा कर अजी-बात माफच असतो व आणखी दहा टक्क्यांना माफी देण्याची सूचना पुढें आलेली आहे. अशा शेतीपासून येणारें उत्पन्न योग्य रीतीनें आयुष्यक्रमण करण्यास शेतकऱ्यांस पुरेसें नाहीं म्हणूनच त्यांस करांची माफी दिलेली आहे. साहजिकपणेंच सधन वर्गांवर करांचा बोजा अधिक पडतो.

तत्त्वत: जमीन ही सरकारच्या मालकीची. प्रत्यक्ष व्यवहारांत खेडे-गांवची सोव्हिएट सभा रहिवाशांत जमिनीची वांटणी करते. जितक्या जमिनीची त्याच्या कुटुंबाकडून मशागत केली जाईल तितकी एका मनुष्याला द्यावयाची. प्रत्येक शेत केवढें असावयाचें तें एका भागां-तील लोकसंख्येच्या दाटपणावर अगर विरळपणावर अवलंबून असतें. हा घनविरलभाव सगळीकडे सारखा करण्यासाठीं निरनिराळ्या भागांत लोकवस्ती करण्याच्या योजना सुरूच आहेत. एखाद्या व्यक्तीकडे किंवा कुटुंबाकडे जमीन दिली गेली, कीं ती बहुधा त्यांच्याकडेच रहावयाची. पण तें कुटुंब लहानमोठें झालें तर सोव्हिएट सभेमार्फत पुन्हा वांटणी होईल तेव्हां त्या जमिनींत त्या प्रमाणानें कमी-जास्त करण्यांत येतें.

शेतकीच्या उत्पन्नाचे अलीकडचे कांहीं आंकडे मनोरंजक वाटण्या-सारखे आहेत. ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे कीं, गेलीं सहा-सात वर्षें परकीयांशीं व स्वकीयांशीं युद्ध, व्यापारी बहिष्कार व इतरांची

लुडवूड, उपासमार व थंडी, सार्वत्रिक अध:पात आणि जुन्या सामाजिक परंपरेचें उच्चाटन यांनीं रशियांत बजबजपुरी माजून राहिली होती. सर्व सरकारी यंत्रच मोडून तोडून अस्ताव्यस्त होऊन गेलें होतें, व नवीनाची उभारणी चालली होती. सन १९२१-२२ सालपर्यंत उत्पन्न एकसारखें कमी कमी होत होतें. तेव्हांपासून पारडें बदललें. युद्धाच्या व अधोगतीच्या काळांत शेंकडा तीस समर्थ माणसें कामास आलीं व जनावरें, हत्यारें वगैरेंचेंही बरेंच नुकसान झालें. शेंकडा चाळीस गुरांची पैदास कमी झाली व सन १९१४ सालच्या लागवडीखालील जमिनीच्या तीन चतुर्थांशाहून कमी हिस्सा सन १९२२सालीं लागवडीस आला. हे आंकडे सरकारी अहवाल–पुस्तकांतूनच उद्धृत केले आहेत. रायकॉफ नांवाच्या मंत्र्यानें हे आंकडे दिलेले आहेत. त्यानें एकंदर शेतीच्या उत्पन्नाचेंही आंकडे दिले आहेत.

| | सन | उत्पन्न रूबल्स* |
|---|---|---|
| | १९१३ | ११,७९० |
| | १९२१ | ६,९०० |
| | १९२६—२७ | १२,७७६ |
| अंदाज | १९२७—२८ | १३,१८६ |

अशा रीतीनें सन १९२१च्या पीछेहाटीनंतर रशिया झपाट्यानें सांवरला. आतां उत्पन्नाचें प्रमाण युद्धपूर्वकालीन प्रमाणाच्या पलीकडे जाऊन पोंचलें आहे. सन १९२७ सालीं लागवडीखालच्या जमिनीचें व गुरांच्या पैदाशीचें प्रमाणही पूर्वीइतकें झालें. शेतकी सुधारण्याच्या कामीं पुष्कळ सरकारी पैसा खर्च केला जात आहे. १९२६-२७ सालीं एकेचाळीस कोटींचे वर रूबल्स यासाठीं खर्च केले होते, तर सन १९२७-२८ सालांत बावन्न कोटी मंजूर केले होते.

*( १ रूबल=१ रु. ५ आ. ४ पै.)

निराळ्या मार्गानें ताळा घेऊन पाहिला तरी हे आंकडे खरेच असें सिद्ध होतें. त्यावरून प्रगतीचें पाऊल वेगानें पुढें पडत आहे असें मानण्यास हरकत नाहीं. वर नमूद केलेल्या विविध अडचणी व बाहेरच्या मदतीचा पूर्ण अभाव यांचा विचार केला तर झाली ही प्रगति कौतुकास्पद आहे असें म्हटल्याशिवाय राहवतच नाहीं.

प्रकरण दहावें

# फौजदारी कायदा

फौजदारी कायदा व तुरुंगांतील कैद्यांची व्यवस्था यांविषयीं इतकी उलटसुलट माहिती कानीं येते कीं, रशियाच्या परिस्थितीच्या अभ्यासकाचें मन गोंधळून जातें. लाल जुलूमशाही, तिचीं अमानुष व अंगावर शहारे आणणारीं कृत्यें यांविषयीं आपण एका बाजूनें ऐकतों, तर दुसऱ्या बाजूनें कोणी सांगतात कीं, रशियांतील तुरुंग म्हणजे सुखानें निवास करण्याचें घर. मॉस्को येथील मुख्य कैदखाना आम्हीं पाहिला व त्याविषयीं आमचा ग्रह तर फारच अनुकूल असा झाला. दोन्ही टोंकांच्या विधानांत थोडाथोडा सत्याचा अंश असेल यांत संशय नाहीं. फौजदारी कायद्याची प्रत्यक्ष व्यवहारांत अंमलबजावणी कशी होते हें पाहण्यापूर्वीं रशियांतील फौजदारी कायद्याचीं मूलतत्त्वें काय आहेत हें पाहिलें पाहिजे. मूलतत्त्वें व त्यांची प्रत्यक्ष बजावणी यांत पुष्कळ विरोध असेल. पण तत्त्वांवरून रशियन लोकांनीं या बाबतींत ध्येय तरी कोणतें डोळ्यांसमोर ठेवलें आहे हें समजून येतें.

खुद्द रशियांत नवीन फौजदारी कायदा सन १९२७च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेपासून अंमलांत आला. संयुक्त सोव्हिएट संघांतील दुसऱ्या संस्थानांतून तो अंमलांत आला कीं नाहीं माहीत नाहीं. सन १९२७चे पूर्वीं कोर्टांना कामाची दिशा दाखविण्यास कांहीं हुकुमनामे होते, पण सर्वसाधारणपणें व्यवहारज्ञान व न्यायबुद्धि यांच्या मदतीनेंच फैसला करण्यांत येत असे. हीं कोर्टें कामकरी व शेतकरी लोकच न्यायाधीश म्हणून चालवीत.

राजकीय हक्क ज्यांना प्राप्त होतात त्या लोकांमधूनच न्यायाधीश व पंच यांची निवड नवीन फौजदारी कायद्याप्रमाणें करावयाची असते.

म्हणजे ते कामकरी असले पाहिजेत; मग ते हातानें काम करणारे असोत अगर बुद्धीनें काम करणारे असोत. भांडवलवाले, भाड्यावर उपजीविका करणारे लोक व इतर सर्व प्रकारचे श्रीमान् लोक यांना अर्थात् मज्जाव होतो. कामकऱ्यांच्या व शेतकऱ्यांच्या स्थानिक सोव्हिएट सभेमार्फत कोर्टांतील न्यायाधीश एक वर्षाकरतां निवडला जातो. त्याच स्थानिक सभेनें म्हणजे सर्व मतदारांनीं निवडलेले दोन पंच त्याला मदतनीस म्हणून बसतात. या पंचांची सारखी बदलाबदल होत असते, कारण एका पंचानें एका वर्षांत सहाच दिवस काम करावयाचें असतें. अशा रीतीनें पुष्कळ कामकऱ्यांना कोर्टाच्या न्यायदानाच्या कामांत भाग घेतां येतो. सन १९२६—२७ सालांत रशियांतील सुमारें पांच लाख कामकऱ्यांनीं व शेतकऱ्यांना न्यायदानांत मदत केली.

लेनिनची अशी इच्छा होती कीं, जास्तींत जास्त लोकांनीं, विशेषतः गरीब लोकांनीं, न्यायदानांत मदत करावी. याचा हेतु असा, गरिबांचा या कामांत भाग असला म्हणजे ते सरकारी कार्यांत समाविष्ट होतात व शेवटीं सरकार आणि ते एकजीव होऊन जातात. त्यांनाही राजकीय सत्ता चालविण्याचें शास्त्रीय ज्ञान आपोआपच प्राप्त होतें.

सोव्हिएट फौजदारी कायद्यांत 'शिक्षा' हा शब्दच अस्तित्वांत नाहीं. त्याच्याऐवजीं 'सामाजिक संरक्षणाचे उपाय' अशी शब्दयोजना वापरण्यांत येते. शारीरिक हाल करण्याची किंवा कोणत्याही रीतीनें मानवी सभ्यपणास कमीपणा आणणारी गोष्ट करण्यास लावण्याची सक्त मनाई आहे. फौजदारी कायद्याच्या नवव्या कलमांत स्पष्टपणें म्हटलें आहे कीं, "शारीरिक हाल करणें, मनुष्यत्त्वास नीचपणा आणणें, किंवा सूड घेणें आणि शिक्षा करणें हे सामाजिक संरक्षणाच्या उपायांचे उद्देशच नव्हत." (तुलनेच्या दृष्टीनें संयुक्तप्रांताच्या जेल

मॅन्युएलचें ९७८ नंबरचें कलम काय म्हणतें तें पहा—" तुरुंगांत काम करून घ्यावयाचें तें उद्योग पाहिजे म्हणून नव्हे, तर शिक्षा देण्याकारितां म्हणून. त्यांत फायदा किती होतो हा महत्त्वाचा मुद्दा नव्हे. तुरुंगांतील काम म्हटलें म्हणजे तें जाचक व मेहेनतीचें असलें पाहिजे. गुन्हेगारांना त्याची धास्ती वाटली पाहिजे. )

सोव्हिएट फौजदारी कायद्यान्वयें, जातिविभक्त समाजाचा परस्पर विद्वेष हेंच गुन्ह्याचें उगमस्थान; सामाजिक दुर्व्यवस्था हेंच गुन्ह्याचें माहेर व दोषपूर्ण परिस्थिति हें त्याचें वाढण्याचें क्षेत्र.

गुन्हा व शिक्षा यांविषयींच्या या कल्पना प्रथम एनरिको फेरी या इटालियन गृहस्थानें पुढें आणल्या. पण त्यांचा फौजदारी कायद्यांत समावेश सोव्हिएट रशियाखेरीज इतर कोठेंही झालेला नाहीं.

दोषी ठरलेले गुन्हेगार झाले तरी या पद्धतींत साध्या राजबंद्यां-प्रमाणेंच होत. यांनीं सर्वांनीं मिळून एकत्र काम करावयाचें एवढाच यांच्यावर गुन्ह्यांबद्दल शिक्षा व निष्कृति म्हणून निर्बंध. दुसरी पद्धत अशी कीं, माणसाचें व्यक्तिस्वातंत्र्य सर्वस्वीं हिरावून न घेतां, त्याच्या-कडून सक्तीनें काम करवून घेणें. विशेष मोठ्या गुन्ह्यांखेरीज बाकीच्या अपराधांना ही दुसऱ्या प्रकारची शिक्षाच देण्यांत येते.

पुन्हा, कायद्यांत जेवढ्या गोष्टी सामाजिक शांतीच्या विरुद्ध अशा म्हटल्या गेल्या आहेत त्यांपैकीं प्रत्येकीच्या बाबतींत वरील सामाजिक संरक्षणाचे उपाय अंमलांत आणलेच पाहिजेत असें नाहीं. एखादी गोष्ट केल्यापासून विशेष धोका नसेल अगर गुन्हेगार फारसा भयंकर नसेल तर कोर्टांनीं तिकडे दुर्लक्ष केलें तरी चालतें. पुष्कळ वेळां असेंही होतें कीं, मागें भयंकर स्वरूपाचा असलेला गुन्हा कांहीं दिवसांनंतर तसाच राहात नाहीं. उदाहरणार्थ, सन १९२८ सालच्या व्यापारी बहिष्काराचे वेळीं, सगळ्यांची अन्नान्नदशा असतां, धान्य,

भाकऱ्या वगैरे जास्त मिळविण्यासाठीं बनावट तिकिटें तयार करणें हा मोठाच गुन्हा होता. पण सन १९२७ सालीं हा कांहीं विशेष ध्यानांत घेण्यासारखा अपराध नव्हता; कारण तेव्हां साधारण सुगीचे दिवस होते. तसेंच पूर्वी हा अपराध घडला म्हणून आतां बहुशः कोणतेंही कोर्ट एखाद्या अपराध्याला सजा सुनावणार नाहीं.

सोव्हिएट सत्ता प्रस्थापित झाल्यावर लगेच त्या सत्तेनें फांशीची शिक्षा रद्द केली होती. परंतु मागाहून राजद्रोहाच्या अपराधासाठीं कायद्यांत पुन्हा ती घालण्यांत आली. लांच किंवा सार्वजनिक पैशाची अफरातफर वगैरेंसारख्या गुन्ह्यांनाही क्वचित् ती शिक्षा सांगितली आहे. कायद्याच्या एकविसाव्या कलमांत लिहिलें आहे कीं, "मूळ सोव्हिएट सत्ता व दरिद्रिनारायण जनताजनार्दनाचें हें सरकार यांच्या अस्तित्वालाच धक्का बसेल अशा भीषण गुन्ह्यांना निर्बंध म्हणून फांशीची शिक्षा तात्पुरती ठेवण्यांत आली आहे. ती अजीबात रद्द होईपर्यंत अगदीं विशेष अपवादात्मक अशा गुन्ह्यांनाच देण्यांत येईल."

एक अट एवढीच आहे कीं, ही शिक्षा गरोदर स्त्रियांना व गुन्हा घडला तेव्हां १८ वर्षें वयाच्या आंत असलेल्या इसमास, ही अंतिम शिक्षा देण्यांत येऊं नये.

गुन्हेगारांविरुद्ध तीन प्रकारचे उपाय योजण्यांत येतात: १ प्रतिबंधक उपाय. २ औषधी योजना व ३ शैक्षणिक उपचार.

हा शेवटचा उपाय लहान मुलें व तरुण मुलगे यांच्यासाठीं. वयाच्या चवदाव्या वर्षापर्यंत मुलांच्या वर्तनसुधारणेसाठीं कायदेशीर उपाययोजना करण्याची पूर्ण बंदीच आहे. १४ ते १६ वर्षांपर्यंत असले उपाय योजावयाचे; परंतु एक शिक्षणशास्त्रज्ञ व एक वैद्य यांच्या शिष्टमंडळानें तशी शिफारस केली तर. तेंदेखील औषधी योजना व शैक्षणिक उपचार यांच्यापासून कांहीं फायदा होण्यासारखा आहे असें

आढळून असल्यास, एरवीं नव्हे. प्रतिबंधक म्हणून खालीलप्रमाणें विविध उपाय योजण्यांत येतात :

१ फांशीची शिक्षा.

२ गुन्हेगार हा कामकऱ्यांचा शत्रु गणला जातो. संयुक्त सोव्हिएट रशियांतील त्याचें नागरिकत्व नष्ट करण्यांत येतें. त्याला हद्दपार करतात. एकदां हकालपट्टी झालेला मनुष्य पुन्हा स्वेच्छेनें परत यऊ शकत नाहीं. परत आल्यास त्याला देहान्त प्रायश्चित्त.

३ दहा वर्षेंपर्यंत बंदिवास. पूर्वीं पांच वर्षांचीच मुदत होती. पण सन १९२२ सालीं ती वाढविण्यांत आली. पण दहा वर्षेंपर्यंत असें फार थोड्या कैद्यांना तुरुंगांत राहावें लागतें. कामाबद्दल माफी म्हणून या अवधींतून दोनतीन वर्षें कमी होऊं शकतात.

४ व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट न करतां सक्तीनें काम करून घेणें. गुन्हेगाराला सदासर्वकाळ डांबून ठेवण्यांत येत नाहीं. त्याला रजा मिळते. पिकांच्या कापणीच्या वेळीं किंवा इतर शेतकीच्या कामानिमित्त शेतकऱ्यांना तर जबरदस्तीनें रजा दिली जाते.

५ वैयक्तिक हक्कांचा अपहार.

६ संयुक्त सोव्हिएट रशियांतून ठराविक मुदतीपर्यंत हद्दपारी.

७ खुद्द रशियांतून अगर दुसऱ्या घटक संस्थानांतून उचलबांगडी. मात्र विवक्षित स्थळींच राहिलें पाहिजे असा निर्बंध नाहीं.

८ सरकारी नोकरांस बडतर्फी. एखादी विशिष्ट जागा मिळण्याची बंदी.

९ विशिष्ट धंदा करण्यास मनाई.

१० मालमत्तेची पूर्ण किंवा अंशतः जप्ती.

११ सार्वजनिक निषेध.

१२ दंड.

फौजदारी कायद्यांत असा दंडक घालून ठेवण्यांत आला आहे कीं, दंड व शिक्षा यांची अदलाबदल होऊं शकत नाहीं. म्हणजे या दोहोंत विकल्प नाहीं.

संयुक्त सोव्हिएट रशियन संघांतील संस्थानांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही कामकऱ्यांच्या सत्तेविरुद्ध केलेला गुन्हादेखील राजद्रोह अगर क्रान्तिविरोधी गुन्हा असें समजलें जाईल, असा नियम नमूद केलेला आहे. संकुचित वृत्तीचे असे राष्ट्रीयत्ववादी आपण नाहीं याचा रशियन लोकांना अभिमान वाटतो. 'कामकऱ्यांचें आन्तरराष्ट्रीय ऐक्य' या कल्पनेवर त्यांचा ठाम विश्वास आहे; व 'रशियन लोक हो, एकी करा' ही नव्हे तर 'जगांतील मजुरांनो, एक व्हा' ही त्यांची विजयपताका !

प्रकरण अकरावें

## तुरुंग.

मॉस्को शहरीं असतांना उपनगर भागांतील एक तुरुंग पाहण्याची संधि आम्हांस मिळाली. तो तुरुंग फक्त भयंकर गुन्हेगारांसाठींच होता असें आम्हांस सांगण्यांत आलें. इमारत होती जुनीच. झार-शाहीमधीलही तो कैदखानाच होता व तिचें बाह्य स्वरूपदेखील फारसें डामडौलाचें होतें असें नाहीं. साधारणपणें त्या इमारतीचा आकार फुलाच्या पाकळ्यांसारखा होता. रे-मार्केटाच्या मध्यभागीं उभें राहिलें म्हणजे सर्व बाजूंनीं लांब लांब पसरलेल्या पाकळ्या दिसतात, तसें आम्ही प्रथम तुरुंगांत गेलों तेव्हां वाटलें. एकेका पाकळींत मधून जाण्यायेण्याची वाट व दुतर्फा कोठड्या. एकंदर तीन मजले होते. वाटेल त्या कोठड्या पहा, निवडकच पाहिल्या व दाखविल्या असें नको, म्हणून तुरुंगाधिकाऱ्यानें आम्हांस सांगितलें. आमची आम्हींच निवड करावयाची याचें अंमळ आम्हांस आश्चर्य वाटलें. जशी कांहीं तुरुंग म्हणजे प्रेक्षकांना दाखविण्याची एखादी देखाव्याचीच जागा !

कांहीं कोठड्या आंत जाऊन आम्हीं पाहिल्या. त्या लहान व गैरसोयीच्या होत्या. प्रत्येकींत दोन-दोन, तीन-तीन खाटा, हवा येण्यास जागा थोडी—कदाचित् भयंकर थंडीसाठीं ही व्यवस्था मुद्दाम केली असेल.—कोठड्या विशेष स्वच्छ किंवा नीटनेटक्या होत्या असें नाहीं. पुस्तकें इकडेतिकडे पडलेलीं दिसलीं. दोन खोल्यांत तर कैद्यांनीं स्वतः बसविलेले रेडिओ होते.

गंभीर स्वरूपाच्या अपराधांसाठीं दहा वर्षेपर्यंत शिक्षा झालेले सुमारें ४९० कैदी तेथें होते. अर्थात् ही दहा वर्षांची शिक्षा चांगल्या कामाबद्दल व वर्तणुकीबद्दल दोन-तीन वर्षांनीं कमी होत असे ही गोष्ट

निराळी. मुख्य अधिकारी, डॉक्टर वगैरे मिळून सगळें अधिकारी-मंडळ ५०—५२ गृहस्थांचें होतें. रोज आठ तास याप्रमाणें तीन-तीन तुकड्या करून हें मंडळ काम करीत असे. म्हणजे एका वेळीं एकदम १७—१८ पेक्षां जास्त अधिकारी कामावर केव्हांच नसत. कैद्यांपैकीं कोणी रखवालदार नसल्यामुळें एवढे अधिकारी थोडे होते. एका कैद्यानें इतरांवर देखरेख करणें तेथें मुळींच मान्य होत नसे असें सांगण्यांत आलें. रखवालदारांजवळ हत्यारेंच काय; पण दंडुकेही नसत. मुख्य दरवाजाजवळच्या शिपायांजवळ मात्र बागनेटें असावयाचीं.

मुख्य अधिकाऱ्यानें आम्हांस असें सांगितलें कीं, 'शिक्षा करणें किंवा इतर गुन्हेगारांना एखाद्या गुन्हेगाराचें उदाहरण दाखवून धाक्यांत ठेवणें हा तुरुंगांचा उद्देशच नाहीं. समाजापासून गुन्हेगाराला निराळा ठेवणें व शिस्तींत काम करावयास लावून त्याची सुधारणा करणें हा तुरुंगाचा खरा हेतु होय'. फार काय, तुरुंग हा शब्ददेखील रुचत नाहीं, कारण त्याला सूड, शिक्षा इत्यादि जुन्या पद्धतींचा वास येतो. तुरुंगाच्याऐवजीं एक लांबलचक शब्द योजण्यांत येतो त्याचा आशय काम करवून सुधारणा करणें असा आहे. मूळ कल्पनाच त्यांची अशी आहे कीं, कैद्यांच्या अंगांतील मनुष्यत्व नाहींसें न व्हावें. कैद्यांना नंबर देण्यांत येत नाहींत व वेगळा पोषाखही नाहीं. मधल्या सुटींत तुरुंगाच्या आवारांत इकडे तिकडे हिंडतांफिरतांना पंचवीस-तीस कैदी आमच्या नजरेस पडले. पण विशिष्ट पेहराव कांहीं कोठें आढळला नाहीं. या अंगणांत बास्केट बॉलसारखे खेळही खेळण्यांत येतात.

बेड्या, हातकड्या वगैरे उपयोगांत आणल्या जातात किंवा काय, असें जेव्हां आम्हीं विचारलें तेव्हां तर मुख्य अधिकारी हंसला. 'आम्ही त्या फक्त प्रदर्शनांत ठेवतों व त्यांचा उपयोग पहावयाचा

असेल तर भांडवलवाल्यांच्या व धनिकांच्या देशांत जा' असें त्यानें उत्तर दिलें. तुरुंगाच्या बाहेर काढल्यावरदेखील पायकड्या व हातकड्या घालण्यांत येत नाहींत.

कैद्यांना दररोज आठ तास काम करावें लागे. पूर्वीच्या शिक्षणामुळ व अभ्यासामुळें कांहींजण विशेष काम करीत; परंतु सामान्यपणें तुरुंगाला जोडलेल्या कापडाच्या गिरणींतच बहुतेकांना काम करावें लागे. तुरुंग म्हणजे जणुं काय सूत कांतण्याचा व कापड विणण्याचा एक जंगी कारखानाच. अतिशय जोरानें सारखें यंत्रांचें काम चालूंच असावयाचें. या कारखान्याच्या आंत तो तुरुंग आहे हें ओळखण्याची खूण एकच. प्रत्येक दिवाणखान्याच्या दाराशीं एक बिनहत्यारी शिपाई असावयाचा व तो दाराला कुलूप लावी, इतकेंच काय तें.

कामाचे तास वगैरे बाबतींत होतां होईलतों मजूरसंघांचे नियम तुरुंगांतही लावण्यांत येतात. क्वचित् मजूरसंघाचे लोक तुरुंग पाहण्यासही जातात. मजूरसंघाच्या कामाच्या दराच्या ३० ते ५० टक्के या प्रमाणांत कामकऱ्यांना मजुरीही देण्यांत येते. या मजुरीचा दोन-तृतीयांश हिस्सा कैद्यांकरितां निराळ्या फंडांत जमा करून ठेवण्यांत येतो. कैदी त्याला स्पर्शही करूं शकत नाहीं. शिक्षा संपली म्हणजे बाहेर पडण्याच्या वेळीं ही रक्कम व दुसरी कांहीं त्याच्या खातीं जमा असेल तर ती अशी सर्व त्याच्या हवालीं करण्यांत येते. त्या रकमेनें त्यानें आपल्या आयुष्याचें 'पुनश्च हरिः ओम्' करावें. आपल्या मिळकतीचा तिसरा भाग खर्च होईपर्यंत कैद्यानें तुरुंगांतील दुकानांतून वाटेल तें खरेदी करावें. शक्य असेल तर बाहेरूनही एखादा जिन्नस आणावा. आम्हीं हें दुकान पाहिलें. एक कैदीच त्याची व्यवस्था पाही. सिगारेट, खाण्याचे पदार्थ, साबू वगैरे आंघोळीचें सामान दुकानांत मिळे. पुस्तकेंही विकत घेण्याची मुभा असे. रोख पैसा मात्र कैद्याच्या हातांत देण्यांत येत नाहीं. सामान

घेतांच आंकड्यावर त्यानें सही करून द्यावी व बाकी सर्व हिशेब तुरुंगाचे अधिकारी ठेवीत. बाहेरून स्नेही व संबंधी लोकांनाही पैसा किंवा इतर वस्तु कैद्यांना पाठविण्याची परवानगी असते.

कैद्यांनीं वाटेल तेव्हां धूम्रपान करावें आणि एकमेकांशीं संभाषण करावें. एखाद्या शहरांतील दुकानाप्रमाणें तुरुंगांत एक स्वस्त केंस कापण्याचें दुकानही होतें. तें एक कैदीच चालवी व काम करून पैसा मिळवी. गिऱ्हाईकही स्वतःच्या मिळकतींतून केंस कापण्याचे पैसे देत. श्मश्रू करीत असलेला एक कैदी आम्हीं पाहिला व हजामती-नंतर वासाचें कोलन वॉटरही त्याच्या डोक्यावर शिंपडण्यांत आलें.

राजकीय कैदी आहेत काय याची आम्हीं चौकशी केली. आम्हांला दोन कैदी दाखविण्यांत आले. झेको-स्लोव्हाकिया या राष्ट्राच्या वतीनें एकानें रशियांत हेराचें काम केलें म्हणून त्याला दहा वर्षांची शिक्षा झाल्याचें समजलें. हा कैदी चांगला सुशिक्षित व गवई होता. त्याला तुरुंगांत संगीताचा व्यवस्थापक करण्यांत आलें होतें. आम्ही त्याच्या कोठडींत शिरलों तेव्हां तो खरोखरच एका पद्याचा ताल वगैरे बस-विण्याच्या व लिहिण्याच्या कामांत गर्क होता. त्याच्या खोलींत बिन-तारी संदेशाचें यंत्र त्यानें आपल्या स्वतःच पैशानें सज्ज केलेलें होतें.

दुसरा राजकीय कैदी रशियन होता आणि त्याला एका फार भयंकर अपराधाबद्दल शिक्षा झाली होती. तो लाल सैन्यांत वैमानिक होता. अंतस्थ युद्धाचे वेळीं जुन्या जमान्यांतील रशियन सेनापति, दोस्त राष्ट्रांच्या मदतीनें, सोव्हिएट सत्तेचें पेंकाट मोडण्याचा प्रयत्न करीत होते तेव्हां तो विश्वासघात करून लाल सैन्य सोडून विमानासह शत्रुपक्षांत सामील झाला! मागून त्याला गिरफदार करण्यांत आलें व फांशीची शिक्षा सांगण्यांत आली; परंतु पुढें ती रद्द करण्यांत येऊन त्याला फक्त दहा वर्षांचीच सजा करण्यांत आली. त्या वेळीं ३।४ वर्षें

शिक्षा भोगूनही झालीं होतीं व आणखी ३।४ वर्षांनीं सुटून जाण्याची त्याला आशा वाटत होती. त्याच्याकडे तुरुंगांतील विजेच्या फिटिंगचें काम होतें. त्याच्या खोलींतही रेडिओचें ( ध्वनिवाहक ) यंत्र होतें व पुस्तकेंही होतीं.

वेळ थोडा होता म्हणून आम्ही जेवढें पाहावयास पाहिजे होतें तेवढें अर्थात् पाहूं शकलों नाहीं. तुरुंगाच्या व्यवस्थेची चांगली बाजूच आम्हांस दाखविण्यांत आली असावी असें आमचें किंचित् मत झालें. तथापि दोन गोष्टी मात्र अगदीं प्रमुखपणें नजरेस पडल्या यांत शंका नाहीं. इतर देशांत आजही अस्तित्वांत असलेल्या व रशियाच्या पूर्वीच्या तुरुंगांच्या पद्धतींत जमीनअस्मानाची अशी इष्ट सुधारणा करण्यांत आली आहे. याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे तुरुंग-खात्यांतील अधिकाऱ्यांची व त्याचप्रमाणें तत्संबंधीं वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही मनोभूमिका ही होय. प्रत्यक्ष स्थिति चांगली असेल किंवा नसेल; परंतु निदान तुरुंगाच्या व्यवस्थेबाबत घालून दिलेलीं सामान्य तत्त्वें मात्र आपल्या इतरत्र माहीत असलेल्या तत्त्वांपेक्षां बरींच पुढारलेलीं आहेत. हिंदुस्थानांतील तुरुंगांची ज्यांना माहिती आहे व ज्यांनीं हातकड्या घालणें वगैरे रानटी पद्धति पाहिली आहे त्याला या गोष्टीचें स्वारस्य बरोबर पटेल. आम्हांला ज्या अधिकाऱ्यानें तुरुंग दाखविला तो पुनः पुन्हा आम्हांला बजावून हें सांगे कीं, कैद्याचें मनुष्यत्व कायम राखण्याकडे अतिशय लक्ष दिलें जातें व आपण कोणी तरी बहिष्कृत अगर अमानुष प्राणी आहों असें त्यास न वाटावें म्हणून खबरदारी घेण्यांत येते. याच हितकर तत्त्वाच्या समर्थनाची व रोजच्या व्यवहारांत आचरणाची हिंदुस्थानांत तुरुंगाबाहेरदेखील किती बरें आवश्यकता आहे!

आम्हीं जो तुरुंग पाहिला तो मध्यवर्ति तुरुंग खून, राजद्रोह वगैरे-सारखा घोर अपराध करणाऱ्या गुन्हेगारांसाठीं होता. या गुन्ह्यांना

नेहमींच परमावधीची म्हणजे फांशीची व ती वगळल्यास दहा वर्षांच्या कैदेची शिक्षा व्हावयाची. हलक्या गुन्हेगारांसाठीं जो तुरुंग होता त्यांत तर परिस्थिति त्याहून फारच अधिक समाधानकारक असते व जास्त स्वातंत्र्य देण्यांत येतें असें आम्हांस सांगण्यांत आलें. नुसत्या शाब्दिक वचनावर त्यांना घरीं जाण्यास परवानगी मिळते. शेतकऱ्यांना ही रजा हंगामाच्या वेळीं देतात म्हणजे सुटीचा त्यांना शेतीच्या कामाकडे उत्तम उपयोग करतां येतो.

जॉर्जिया या संस्थानांतील बोल्शेव्हिक अमदानींतील एक तुरुंग समक्ष पाहिल्यानंतर मिस् फ्रीडा उटली यांनीं 'सोशॅलिस्ट रिव्ह्यू' नामक मासिकांत एक मनोरंजक लेख लिहिला आहे. तो तुरुंग टिफलिस या गांवीं होता. कैद्यांना किती दयाळूपणानें वागविण्यांत येतें व त्यांना शिक्षण कसें देण्यांत येतें याविषयीं बाईनीं फार मार्मिक वर्णन केलें आहे. मानसशास्त्रज्ञांनीं ज्या तत्त्वांची नुसती कागदी चर्चा केली तींच तत्त्वें रशियन लोकांनीं प्रत्यक्ष व्यवहारांत आणून दाखविलीं. त्यांची तुरुंगाची पद्धत अशी कीं, गुन्हेगारांना पशु बनविण्याऐवजीं उत्तम नागरिक बनवावयाचे. गुन्ह्याचा उगम वाईट स्थितींतून, शिक्षणाच्या अभावांतून अगर समजुतीच्या कोतेपणांतून होतो असा त्यांचा सिद्धान्त. आणि म्हणून गुन्हेगारांना आर्थिक परिस्थितीला बळी पडलेल्या माणसांप्रमाणें अगर आजारी किंवा अज्ञ माणसांप्रमाणें वागवावयाचें, म्हणजे त्यांना समाजांत योग्य रीतीनें राहण्याचें शिक्षण मिळावें.

ही बाईची माहिती बरोबर असेल व आम्हीं स्वतः पाहिलें तेंही यथातथ्य वस्तुस्थितीचें चित्र असेल तर खरोखरच एखाद्या हिंदी कारखान्यांत मजूर म्हणून राहण्यापेक्षां रशियांतील तुरुंगांत कैदी म्हणून राहणें बरें. कारण कारखान्यांत रोज १०—११ तास राबावयाचें

व नंतर गोठ्यापेक्षांही वाईट अशा कोंदट व काळोख्या खबदाडांत जाऊन गर्दीत पडावयाचें, हेंच मजुरांचें नशीब! आम्ही पाहिल्या-प्रमाणें कांहीं कैदखाने तरी खास आहेत ही गोष्ट सोव्हिएट सरकारला कांहीं कमी अभिमानाची नव्हे.

या प्रश्नाचा विचार करतांना मुख्यत: दोन बाबींचा विचार केला पाहिजे. राजकीय विरोधक व क्रान्तिविरुद्ध चळवळ करणारे लोक यांच्याशीं सोव्हिएट सरकारची वागण्याची पद्धत फार विलक्षण व निष्ठुर-पणाची असते. हे समाजाचे शत्रु असल्याकारणानें सामान्य गुन्हेगाराला लागू असणारीं माणुसकीचीं तत्त्वें यांना गैरलागू समजलीं जातात. अशा लोकांना अत्यंत क्रूरपणानें वागविल्याचीं उदाहरणें आहेत; म्हणून तर लाल जुलूमशाहीच्या व बोल्शेव्हिक अधमपणाच्या गोष्टी कानीं येतात. युद्धप्रसंगाची भूमका असल्याशिवाय असलीं अमानुष कृत्यें आतां घडणार नाहींत हें खरें; परंतु एकंदरींत सोव्हिएट सरकारचा हात राजकीय विरोधकांच्या डोक्यावर जबरदस्त जोरानें पडतो हें नाकबूल करतां येत नाहीं. साधारणपणें या रीतीनें शेंकडा ९५ लोकांना भूतदयेचे सामान्य नियम लावले जातात, व फक्त पांच लोकांना अंमळ वेगळ्या पद्धतीनें व कठोरपणानें वागविण्यांत येतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे प्राय: मजूरवर्ग व शेतकरीवर्ग बऱ्या स्थितींत आहे आणि झारशाहीचे जिवंत अवशेष म्हणून वावरणारे कांहीं लोक व सरकारशीं फटकून वागणारे कांहीं इतर लोक मात्र बरेच निकृष्टावस्थेंत पडलेले आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

विचारांत घेण्यासारखा दुसरा मुद्दा म्हटला म्हणजे बोल्शेव्हिकांची पैशाची टंचाई. त्यांच्याजवळ होतें नव्हतें तें सारें त्यांना औद्योगिक प्रगति, शिक्षण व शेतकी यांवर खर्च करावयास पाहिजे. मोठमोठे

तुरुंग उभारण्याकडे त्यांना खर्च व्हावासें वाटत नाहीं. समाजाची सुसंघटना करून जवळ जवळ सर्व तुरुंगच नाहींसे करण्याची त्यांना आशा वाटते. मग तुरुंगावर पैसा ओता कां ? सध्यां जुन्या झार-शाहींतील तुरुंगावरच काम भागविलें जात आहे. कदाचित् मॉस्को-सारख्या मोठ्या शहरांतील तुरुंग सुस्थितींत असतील व इतर तुरुंग अगदीं गलिच्छ असतील आणि सोव्हिएट सरकार तर तुरुंग-सुधारणेवर पैसा खर्च करण्यास तयार नाहीं. मग हे तुरुंग आहेत त्याच अवस्थेंत राहावे यांत काय नवल ?

तथापि अधिक सुव्यवस्थित समाज-रचना व भूतदयाप्रेरित फौजदारी कायदा हीं दोन ध्येयें सोव्हिएट सरकारनें आणि त्याच्या अधिकाऱ्यांनीं तुरुंगाच्या आंतबाहेर आपल्यापुढें ठेवलीं तीं केव्हांही चुना, विटा व तुरुंगाच्या इमारती यांच्यापेक्षां अधिक मूल्यवान् नाहींत का ? हीं ध्येयें निश्चित व अढळ राहिलीं तर बाकीच्या अडचणी किती आल्या तरी, रशिया कोणत्याही बाबतींत मागें पडणार नाहीं हें निःसंशय !

प्रकरण बारावें

# अल्पसंख्याक वर्गांचा प्रश्न

अल्पसंख्याक वर्ग व विविध जाति या गुंतागुंतीच्या प्रश्नाचें भूत दुर्दैवानें भारत मातेच्याच मानगुटीस बसलें आहे असें आपणांपैकीं पुष्कळांस वाटण्याचा संभव असतो. वास्तविक पाहतां, हा प्रश्न पुष्कळ देशांत उद्भवलेला आहे, त्यांनीं त्यास यशस्वी रीतीनें तोंड दिलेलें आहे व तो सोडविलाही आहे. रशियांत तर अनेक राष्ट्रीय अल्पसंख्याक वर्गांचा समावेश झालेला आहे; त्यांच्या भाषा अनेक व संस्कृतिही विभिन्न. त्यांची बोल्शेव्हिकांनीं कशी काय व्यवस्था लावली हें पाहणें मनोरंजक व बोधप्रद होईल.

झारशाहींत रशियन भाषा न बोलणाऱ्या अशा १४० अल्पसंख्याक राष्ट्रीय जाति होत्या. सुमारें वीस जाति प्रत्येकीं दहा लाख लोकसंख्येच्या होत्या. तुर्की-तार्तर लोक २ कोटी; युक्रेनियन लोक सुमारें अडीच ३ कोटी; पोल लोक ८० लाख व यहुदी ७० लाख. एकंदर लोकसंख्येच्या मानानें रशियन बोली न बोलणारे लोक शेंकडा ५७ इतके होते.

या बाबतींत झारशाहींतील धोरण म्हणजे एका जातिविरुद्ध दुसरी उठवावयाची हें. परकीयांना रशियन धर्मांत ओढण्याचेही प्रयत्न होत. या अल्पसंख्याक राष्ट्रीयांपैकीं कोणा एखाद्यास विद्यापीठांत वरिष्ठ अध्यापक व्हावयाचें असेल तर त्याला स्वधर्म सोडून सनातन रशियन धर्माची दीक्षा घेणें अवश्य होतें. अल्पसंख्याक लोकांच्या अभ्यासास कांहीं उत्तेजन मिळत नसे. कांहीं प्रसंगीं तर त्यांना दाबून टाकण्याचा प्रयत्न केला जाई. इ० सन १८३१ सालीं झार बादशहानें जादा हुकूम काढून सर्व पोलिश शाळा बंद केल्या होत्या; फक्त

यहुदी व मुसलमान लोकांच्या धार्मिक शाळा मात्र खुल्या ठेवण्यांत आल्या. अशा रीतीनें या अल्पसंख्याक जाति मागासलेल्याच राहिल्या.

इ० सन १९१७ च्या आक्टोबर महिन्याच्या राज्यक्रान्तीनंतर लवकरच अखिल रशियन संयुक्त सोव्हिएट संघाच्या दुसऱ्या परिषदेंत खालील गोष्टी जाहीर करण्यांत आल्या : १ रशियांतील जनतेची समता व प्रभुता; २ स्वतंत्र होण्याचा स्वयंनिर्णयाचा हक्क व स्वतंत्र संस्थान प्रस्थापित करण्याचा हक्क; ३ सर्व प्रकारच्या राष्ट्रीय, जातिविशिष्ट व धार्मिक सवलतींचा इन्कार; ४ राष्ट्रीय व जातीय अल्पसंख्याक वर्गास आत्मोन्नति करून घेण्यास पूर्ण मुभा.

अखिल रशियन संयुक्त सोव्हिएट संघांत सहा स्वतंत्र संस्थानांचा अंतर्भाव होतो. हीं स्वतंत्र संस्थानेंही आपल्यापरी संयुक्त स्वरूपाचीं आहेत व कांहींत स्वायत्त प्रांतविभागही समाविष्ट झालेले आहेत. अशा रीतीनें प्रत्येक अल्पसंख्याक वर्गाला बरेंच स्वातंत्र्य लाभतें व स्वतःच्या भाषेची आणि संस्कृतीची प्रगति करतां येते. मध्यवर्ति सरकारचें धोरणच असें असतें कीं, या स्वतंत्र संस्थानांना व प्रांतविभागांना स्वतःची वाढ करून घेण्यास मोकळीक द्यावी, एवढेंच नव्हे तर त्यांची संस्कृति व संपत्ति वाढविण्यास प्रत्यक्ष आणि सकर्तृक मदतच करावी. स्थानिक भाषेंत चालविल्या जाणाऱ्या शाळा उघडण्यांत येतात; सार्वजनिक चळवळी व सोव्हिएट संस्थांतील काम स्थानिक भाषेंतून करण्याचा प्रयत्न करण्यांत येतो; व वर्तमानपत्रेंही त्याच भाषेंत प्रसिद्ध करण्यांत येतात.

अल्पसंख्याक वर्गाच्या हक्कांत राजकीय व सांस्कृतिक असा भेद करण्यांत येतो. पहिल्या बाबतींत इतर अल्पसंख्याक वर्गांना किंवा बहुसंख्याक वर्गाला जे हक्क तेच या वर्गाला असावयाचे. एखाद्या सबंध प्रांतविभागाला स्वायत्तता देऊन काय विशेष हक्क प्राप्त होतील

तितकेंच. परंतु अल्पसंख्याक म्हणून जादा संरक्षण नाहीं, कोणत्याही बाबतींत अधिक तोल नाहीं किंवा स्वतंत्र मतदारीचा व प्रतिनिधिकत्वाचा अधिकार नाहीं. सांस्कृतिक विषयांत मात्र त्यांना पुष्कळच स्वातंत्र्य देण्यांत येतें व त्यांच्या स्वतंत्र हक्कांचें संरक्षणही करण्यांत येतें. जोंपर्यंत मागसलेल्या जाति किंवा वर्ग आहेत तोंपर्यंत सर्व संघाची प्रगति अडखळून राहणार, तेव्हां या सर्व जातींचा किंवा वर्गांचा उद्धार केल्याखेरीज गत्यंतर नाहीं, असें मध्यवर्ति सरकारास वाटत असतें.

अखिल रशियन संयुक्त सोव्हिएट संघांत पहिल्या प्रतीचें एक मोठें घटक संस्थान आहे. त्यांत नऊ स्वतंत्र प्रांतांचा समावेश होतो. त्यांत निरनिराळ्या राष्ट्रीय वर्गांसाठीं इ० सन १९२६–२७ सालीं खालीलप्रमाणें शाळा होत्या :

| | | |
|---|---|---|
| तुर्की राष्ट्रीयांकरितां | | ११९७ |
| यूग्रो-फिन्सकरितां | | १८१० |
| पाश्चिमात्य संस्कृतीच्या लोकांकरितां | | १२७२ |
| मोगल व मांचूरीयन | ,, | २३३ |
| उत्तर कॉकेशसमधील | ,, | ७८८ |
| उत्तरेकडील | ,, | ३६ |

निरनिराळ्या भाषांतून क्रमिक पुस्तकें तयार करण्यांत येतात. सोव्हिएट संघांत खरोखरच ६२ निरनिराळ्या भाषांच्याद्वारां आज प्राथमिक शिक्षण दिलें जातें व पुस्तकें, पत्रकें वगैरे ९२ भाषांत लिहिलीं व प्रसिद्ध केलीं जातात. इ० सन १९२७ सालच्या ऑगस्ट महिन्यांत सोव्हिएट संघांतील अल्पसंख्याक राष्ट्रीयवर्गाचीं २०१ वर्तमानपत्रें होतीं व एकूण वाचकवर्ग सव्वानऊ लाखांचे वर होता.

क्रान्तीच्या पूर्वी मोरडवा, ऑयरेट इत्यादि राष्ट्रीय जातींना व्यवस्थित

लिपीदेखील नव्हती. सोव्हिएट सरकारनें अशा सोळा जातींसाठीं नवीन लेखनपद्धति सुरू केली व इतर लिप्यांची सुधारणा करून त्या साध्या व शास्त्रोक्त केल्या.

पूर्वेकडील संस्थानांत स्थानिक भाषेच्या शाळांपाठोपाठ स्थानिक सोव्हिएट सभेंत व इतर सार्वजनिक संस्थांतही त्याच भाषेचा उपयोग करण्याचे प्रयत्न चालले आहेत. तार्तर लोकांच्या वस्तीच्या प्रांतांत हा प्रयोग फार जोरानें यशस्वी होत आहे. या प्रांतांत सोव्हिएट गांवसभांतून फारच झपाट्यानें तार्तर भाषेचा प्रसार झाला. इ० सन १९२२ सालीं अशा गांवसभा २० होत्या; त्या इ० सन १९२३मध्यें ५०, इ० सन १९२४मध्यें ८० व इ० सन १९२५ मध्यें ८५ पर्यंत वाढल्या. शहरसभांतही अशीच प्रगति होत आहे.

गेल्या दोनतीन वर्षांत रशियन भाषेव्यतिरिक्त दुसऱ्या भाषेंतील उच्च शिक्षणाकरितां शिक्षक तयार करण्याचें काम विशेष जोरानें चाललें आहे. याकरितां निरनिराळ्या उच्च विद्यालयांत २८ भाषांचीं खातीं उघडण्यांत आलीं. कांहीं वर्षांनंतर या खात्यांतूनच उच्च पदवीधर पुरेसे निर्माण होऊं लागतील.

शिक्षणखात्यामार्फत विविध भाषा, राष्ट्रांचे आचार वगैरेंचें शिक्षण देऊन कांहीं तरुण तयार करण्यासाठीं कांहीं स्थळें मुक्रर करण्यांत येतात. गेल्या कांहीं वर्षांतील अशा तरुणांची आंकडेवारी येणेंप्रमाणें :

| | |
|---|---|
| सन १९२३ | ९९१ |
| ,, १९२४ | १०३४ |
| ,, १९२५ | ११७७ |
| ,, १९२६ | १२८३ |

यांपैकीं २३६ जण तुर्की-तार्तर जातीचे होते.

या पौर्वात्य स्वायत्त संस्थानांतील स्त्रियांची प्रगतिही शीघ्र होत आहे.

उझबेकिस्थानमध्यें राज्यक्रान्तीपूर्वी स्त्रिया पडदानशीन असत, क्वचित् थोडया सुशिक्षित व अर्ध्या गुलामगिरींत असत. आज या संस्थानांतील स्थिति पहा, तेथें स्त्रीशिक्षणाच्या २७६ संस्था आहेत व त्यांत ३२०० विद्यार्थिनी शिकत आहेत. राष्ट्रीय अल्पसंख्याक जातींतील विद्यार्थ्यांपैकीं गतवर्षीं शेंकडा २० विद्यार्थिनी होत्या. शैक्षणिक काम व वैद्यकी यांकडे त्यांचा ओढा विशेष दिसून येतो.

रशियांतील व्यवस्थेविषयीं अगर परिस्थितीविषयीं आजच एकदम मत कायमचें ठोकून देणें कठीण आहे. तथापि गेल्या पांच वर्षांतील प्रगतीवरून असें स्पष्ट दिसतें कीं, तेथें अल्पसंख्याकांचा प्रश्न बऱ्याच अंशांनीं सोडविला गेला आहे. तेथें संपूर्ण समता अस्तित्वांत आली आहे व सर्व कांहीं निर्दोष आहे असा याचा अर्थ नाहीं. गेल्या सालींच रशियन संघाचे मुख्य प्रधान रायकॉफ म्हणाले कीं, पुष्कळ प्रगति झाली असली तरी, अद्यापि बऱ्याच गोष्टी साधावयाच्याही राहिल्या आहेत. शेतकऱ्यांची गुलामगिरी, अज्ञान व अंधश्रद्धा यांचा विध्वंस व्हावयाचा आहे. संघांतील राष्ट्रीय अल्पसंख्याक जातींच्या समतेचे कागदी घोडे नाचविले जातात; पण प्रत्यक्ष व्यवहारांत ही समता पूर्णांशानें उतरली नाहीं. आर्थिक व सांस्कृतिक भेद नष्ट होतील तेव्हांच संपूर्ण समता सिद्ध झाली असें म्हणावयाचें. स्त्रिया झाल्या तरी, आर्थिक स्वातंत्र्य त्यांस प्राप्त होई-पर्यंत स्वतंत्र झाल्या हें कसें होणार ?

काय केलें नाहीं हें दाखविण्यांत रायकॉफनें चांगलें केलें, म्हणून जें यश रशियानें पदरांत पाडलें तें क्षुल्लक असें मात्र नव्हे. अल्प-संख्याकांचा प्रश्न लवकर आणि सुलभतेनें सुटणार हें तर त्यावरून उघड होतच आहे. हा प्रयत्न पहा व ब्रिटिशांच्या हिंदुस्थानांतील दीडशें वर्षांच्या सत्तेचे परिणाम पहा ! पण........पण ब्रिटिशांना हा प्रश्न सुटावयास नकोच आहे, त्याला काय करावयाचें ?

प्रकरण तेरावें

## शिक्षण

अनेक बाजूंनीं नवोदित रशियन परिस्थितीचा अभ्यास चित्ताकर्षक वाटतो. आणि हिंदुस्थानाला तर त्या अभ्यासाचा अत्यंत मनोरंजक व बोधप्रद भाग म्हटला म्हणजे रशियांतील शिक्षण-व्यवस्था व अज्ञाननिर्मूलनाचे उपाय यांचा होय. विस्तीर्ण शेतजमीन आणि जवळ जवळ निरक्षर असा शेतकरी वर्ग हे प्रश्न आपल्याप्रमाणें रशियांतही आहेत. अमेरिकेंतील विद्वान् शिक्षणशास्त्रज्ञ डॉ० ल्यूसी विल्सन् यांनीं 'नवीन रशियांतील नवीन शाळा' या नांवाचें एक पुस्तक लिहिलें आहे. त्यांत त्यांनीं हे प्रश्न सोडविण्याचा रशियांत कसा प्रयत्न होत आहे, त्याचा खुलासा केला आहे. न्यूयॉर्कच्या 'व्हॅनगार्ड' छापखान्यांतून जी एक उत्कृष्ट ग्रंथमाला सोव्हिएट रशियाविषयीं प्रसिद्ध केली जात आहे तिजपैकीं हें पुस्तक फार उत्तम असें आहे.

रशियांतील या बाबतींतील परिस्थितीचें अवलोकन करणारास व तिजविषयीं लिहिलेली माहिती वाचणारास एक गोष्ट चांगलीच पटते. ती ही कीं, बोल्शेव्हिक पुढारी व अनुयायी या सर्वांनाच तरुणांच्या शिक्षणाविषयीं वाटणारें निःसीम महत्त्व. योग्य प्रकारच्या शिक्षणाखेरीज समाजाची अधिक चांगल्या पायावर बांधणी होणें शक्य नाहीं, हा सिद्धान्त आतां जगन्मान्य झाला आहे. समाजाची ही भावी संघटना कशी असावी याविषयीं रशियांतील पुढारी लोकांना बिलकुल संशय नाहीं. त्यांच्या निश्चित ध्येयांनीं ते उद्दीपित झाले आहेत व तीं ध्येयें आपल्या हयातींत सफळ करून घेण्याच्या ठाम निश्चयानें ते कंबर कसून पुढें सरसावले आहेत. देशांतील तरुणांना शिक्षण

द्यावयाचें या गोष्टीवर त्यांनीं आपले परिश्रम एकवटले आहेत आणि त्यांच्यांतील समर्थ स्त्री-पुरुषांच्या शिरावर सर्वस्वीं याच कामाची जबाबदारी टाकण्यांत आली आहे. आक्टोबर महिन्यांतील क्रांति संपून थोडे दिवस लोटतात न लोटतात तोंच, पेट्रोग्राड शहरांत यादवी माजली असतांही व आतां बोल्शेव्हिकांचें राज्य लयास जाणार असे घूत्कार कानीं पडत असतांही, त्यांनीं आपल्या शिक्षणविषयक कार्यक्रमाचा जाहीरनामा शांतपणानें प्रसिद्ध केला ! नंतर मोठ्या आश्चर्यकारक बढाईखोरपणानें, आम्ही दहा वर्षांचे आंत निरक्षरतेची हकालपट्टी करतों अशी घोषणा केली; पण ही पोकळ घमेंड नव्हती. कारण तरुणांच्या शिक्षणाचाच नव्हे तर वयातीतांच्या अज्ञानाचें 'दिवाळें वाजविण्याचा' निश्चित कार्यक्रम त्यांनीं आंखला.

त्यांचा प्रयत्न फसला. दैवच त्यांना प्रतिकूल त्याला ते काय करणार ? अंतःस्थ कलह, परदेशांची लुडबूड, दुष्काळ, व्यापारी बहिष्कार वगैरे आपत्तींनीं सर्व देश उजाड झाला व जिकडे तिकडे अवकळा पसरली. असें असूनही अज्ञान अजिबात नष्ट झालें नसलें तरी, गेल्या वर्षांत त्यांनीं स्तुत्य प्रगति केली आहे यांत संशय नाहीं.

बाहेरील जग व शाळा यांचा संबंध रशियांत फार निकट आहे व रशियन शिक्षण-पद्धतीचा हा एक विशेष होय. शिक्षण म्हणजे हवेंत तरंगणारी कांहीं तरी वस्तु नव्हे, कीं जिचा रोजच्या जीवनक्रमाशीं व विद्यार्थ्यांच्या नागरिक या नात्याच्या पुढील आयुष्याशीं बिलकूल संबंध नाहीं. रशियांतील शिक्षणाची कल्पना अशी कीं, शिक्षण प्रत्यक्ष परिस्थितीवर उभारलेलें पाहिजे व त्यानें विद्यार्थी भावी आयुष्यांतील जबाबदारी योग्य रीतीनें पार पाडण्यास तयार झाला पाहिजे. अशा रीतीनें उत्तम अभ्यासक्रम आंखण्यासाठीं एका नामांकित शिक्षण-शास्त्रांतील तज्ज्ञानें औद्योगिक व शेतकी या क्षेत्रांचें

सूक्ष्म निरीक्षण केलें होतें. विद्यार्थ्यांच्या परिस्थितीस जुळणारें असें शिक्षण त्यांस पाहिजे, म्हणून त्यांच्याशीं निकट व सतत परिचय ठेवण्यासाठीं शिक्षकांना आर्जवून सांगण्यांत येतें.

अर्थात् या सर्व गोष्टी सिद्ध होण्यास मातृभाषेंतूनच शिक्षण दिलें पाहिजे हें उघड होतें. पाहिलें तर हिंदुस्थानापेक्षां रशियांतच जनतेची व भाषांची विविधता आणि विचित्रता फार अधिक. तथापि हें तत्त्व अमळ कडकपणानें व्यवहारांत पाळलें जातें. निरनिराळ्या भाषासंघांच्या शाळांतून ती ती विशिष्ट भाषाच उपयोगांत आणली जाते. कित्येक वेळीं, एकाच शहरांत अनेक भाषांतून चाललेल्या शाळा दृष्टीस पडतात. स्थानिक भाषेची वाढ व्हावी म्हणून कसोटीनें प्रयत्न करण्यांत येतो. सोव्हिएट सभांचें कामही स्थानिक भाषेंतच चालविण्यास उत्तेजन देण्यांत येतें. सरकारी पत्रकें व पुस्तकें त्या त्या भाषांत प्रसिद्ध करण्यांत येतात; व लेनिनग्राड व मॉस्को येथें निरनिराळ्या भाषांचे शिक्षक तयार करणाऱ्या संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत. अशा हल्लीं ४९ संस्था अस्तित्वांत आहेत. राष्ट्रीय अल्पसंख्याक वर्गांच्या व्यवस्थेसाठीं मोठ्या विद्यापीठांत स्वतंत्र अधिकारमंडळें निर्माण केलेलीं असतात. अल्पसंख्याक जातींची संस्कृति कायम टिकविण्याची इच्छा इतक्या थरापर्यंत जाऊन पोंचली आहे कीं, ज्या भाषा फक्त बोलल्या जात व ज्यांना लिप्या नव्हत्या. अशांसाठीं नवीन लिप्या बनविण्यांत आल्या आहेत. आम्हीं जेव्हां शिक्षणखातें पाहण्यास गेलों तेव्हां आम्हांस बऱ्याच प्रकारच्या लिप्यांचीं पुस्तकें दाखविण्यांत आलीं. त्यांपैकीं कांहीं लिप्या फारशीसारख्या होत्या व कांहीं तर आम्हांस अगदींच अपरिचित वाटल्या.

अंतिम स्वरूपाचें एक उदाहरण घेतलें म्हणजे सोव्हिएट सरकारच्या या बाबतींतील खऱ्या धोरणाची प्रचीति येईल. सैबीरियांतील

इर्कतुस्क भागांत एक लहानशी टोळी वास करून असते. तिचें नांव कारागास; व लहान मुलें धरून एकंदर डोकीं ४०५. तुर्की भाषेसारखी कांहींतरी बोली ते लोक बोलतात. नेहमीं इतस्ततः भटकावयाचें व शिकारीनें उदरनिर्वाह करावयाचा, ही यांची स्थिति. तथापि या लोकांच्या मुलांसाठींही एक स्वतंत्र शाळा उघडण्यांत आली होती. या शाळेंत मुलें फक्त हिंवाळ्यांतच जातात. कारण उन्हाळ्यांत त्यांस वडील माणसांबरोबर फिरावें लागतें. जिप्सी नांवाची दुसरी एक भटकणारी जात आहे. तिच्यासाठीं तीन शाळा सुरू केलेल्या आहेत व त्या जातीच्या बोलीचें एक पुस्तकही काढण्याचा प्रयत्न चालू आहे; पण जिप्सी लिपी नसल्याकारणानें हें तेवढें सोपें नाहीं.

सोव्हिएट संघांतील आणखी अल्पसंख्याक वर्गांचीं नांवें सांगितलीं तर तीं मनोरंजक वाटतील. पोल यूक्रेनियन, लॅट्व्हिअन, इस्थोनियन, जर्मन, फिन हिब्र्यू, आर्मीनियन श्वेत रशियन, सामोयेन, ऑस्टिआक, मंगोलियन, याकूत, तार्तर, बष्कर, तुंग, बरयत, युकागर, कामचाडोलन एस्कीमो, किरगीज, हाकेनियन, ऑयराट शून्हाश, कोमी, मारी, कालमक, इंगुश, मारड्वान, ॲसिरियन व कोरीयन, या त्या जाती होत. ही यादी पूर्ण आहे असें समजण्याचें कारण नाहीं हें लिहावयास नकोच.

ह्या मजकूर लिहिला जात असतांच लेनिनग्राडच्या मध्यवर्ती शास्त्रीय विद्यापीठानें बौद्ध संस्कृतीच्या अभ्यासासाठीं स्वतंत्र शाखा स्थापन केल्याचें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालें. बौद्ध धर्माचा एक मोठा कोश ही संस्था तयार करीत आहे व लवकरच बौद्ध संस्कृतीच्या अभ्यासासाठीं एक आंतरराष्ट्रीय परिषद् भरविण्यांत येणार आहे.

रशियन सोव्हिएट संघाच्या सीमाप्रांतांतील कांहीं कांहीं संस्थानांत, उदाहरणार्थ, तार्तर व बष्कर या जातींत, गोषांतील स्त्रियांना शिक्षकिणी-चें काम शिकविलें जात आहे.

शिक्षण सामान्य जनतेकरितां पाहिजे हें तत्त्व तर समाजसत्ता-वादांतून आपोआपच निघतें व रशियांतील शिक्षण-पद्धतीचा तोही एक प्रधान गुण आहे. बहुतेक देशांत वरच्या दर्जाचें शिक्षण म्हणजे फक्त सुखवस्तु लोकांसाठीं खाजगी शाळांतून मिळावयाचें. हेंच शिक्षण सर्वांस मिळावें हा रशियाचा प्रयत्न; आणि या शिक्षणाचें मूलतत्त्व असें कीं, तें सांघिक अगर सहकारी स्वरूपाचें असावें, म्हणजे त्याचें ध्येय, ज्ञानार्जन व व्यक्तीचें चातुर्यसंवर्धन हें नसून दुसऱ्यांना देण्याचें व दुसऱ्यांकडून घेण्याचें सामर्थ्य हें असावयाचें. लेनिनची पत्नी क्रुप्सकाया ही मोठी शिक्षणज्ञ आहे. तिनें याविषयीं असें म्हटलें आहे, 'या सांघिक किंवा सहकारी तत्त्वांतच आमच्या प्रत्येक शिक्षण-पद्धतीचा विशेष आहे व तेंच अंतिम ध्येय होय. सगळें धोरण या तत्त्वाच्या तांबडया दोऱ्यांत नीट जसें कांहीं ओंवून टाकलें आहे. मुलांची सांघिक संघटना केल्याखेरीज सामाजिक शिक्षणच होऊं शकत नाहीं. हें तत्त्व त्या शिक्षणाचा पाया, त्याचें सारसर्वस्व, त्याचा आंतील गाभा.'

झारशाहींत शिक्षण बहुतांशीं सनातनधर्मीयांच्या हातांत होतें. झारशाहीशीं व जुन्या धर्माशीं एकनिष्ठ असावें व हिंदुस्थानाप्रमाणें, सरकारी नोकऱ्यांकरितां कारकून तयार करणें एवढाच त्या शिक्षणाचा हेतु होता. खालच्या लोकांना वर येण्यास कांहींच उत्तेजन देण्यांत येत नसे. झारशाहींतील एका शिक्षण-मंत्र्यानें असा नियमच करून ठेवला होता कीं, 'गाडीवान, इतर नोकर चाकर, आचारी, धोबी व असेच दुसरे लोक यांच्या मुलांबाळांनीं आपल्या जन्माच्या जातीच्या वर चढण्याचा प्रयत्न करण्यास उत्तेजन देण्यांत येऊं नये.' मुलांना खालीलप्रमाणें प्रश्नोत्तरें पाठविण्यांत येत असत:—

**प्रश्न**—झारसंबंधीं कोणतें कर्तव्य आपला धर्म आपणांस शिकवितो ?

उत्तर—पूजा, एकनिष्ठा, कर देणें, नोकरी, प्रेम व प्रार्थना. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, पूजा व एकनिष्ठा या दोन तत्त्वांत सर्व कांहीं येतें.

धर्म व शाळा यांची ताटातूट, मुलांमुलींस एकत्र शिक्षण, आणि रशियन जातीखेरीज अल्पसंख्याक जातीस आपापल्या भाषांत शाळा काढण्यास प्रोत्साहन या तीन गोष्टी सोव्हिएट सरकारनें आरंभींच्या हुकुमानें अंमलांत आणण्याची व्यवस्था केली. शिवाय, तीन ते सात वर्षांपर्यंत शाळेंत घालण्यापूर्वीचें मुलाचें शिक्षण, आठ ते बारा वर्षांपर्यंत प्राथमिक शिक्षण व तेरा ते सोळा वर्षांपर्यंत दुय्यम शिक्षण हें सार्वत्रिक, सक्तीचें व मोफत करण्यांत आलें होतें. इतकेंच नव्हे तर प्रत्येक रशियन नागरिकाचा उच्च शिक्षण संपादन करण्याचा हक्कही जाहीर करण्यांत आला होता. पंधरा-सोळा वर्षांपर्यंतचें मुलांचें सामाजिक शिक्षण ही सरकारची जबाबदारी असून, कुटुंबाची नव्हे असें समजून सर्व तरतूद केली जात असे. या शिक्षणाचें ध्येय असें: ‘व्यक्तीची सर्वंकष वाढ होऊन प्रत्येक मनुष्य निरोगी, सुदृढ, चपळ, धीर, विचारांत व कृतींत स्वतंत्र बाण्याचा, सुसंस्कृत व्हावा. त्यानें कार्यक्षम होऊन कामकऱ्यांच्या हितासाठीं झटावें, कारण यांतच सर्व मानवजातीचेंही हित आहे.’

अशा रीतीनें शिक्षण तिसऱ्या वर्षापासून सुरू होतें. त्याच्यापूर्वींही बालकाचीच काय, पण गरोदर मातेची जबाबदारी देखील आरोग्यखात्याकडे येऊन पडते. प्रसूतीच्या पूर्वीं व नंतर तीन-चार महिने स्त्री-कामकऱ्यांना सुटी देण्यांत येते, भरपूर पगार देण्यांत येतो व जरूर तर मोफत औषधयोजनाही होते. कामावर रुजू झाल्यावर देखील आईस मुलाच्या संगोपनासाठीं कामाच्या तासांत मधूनमधून मोकळीक देण्यांत येते व कारखान्याच्या जागींच मुलें ठेवण्यासाठीं

अर्भकालयाची स्वतंत्र व्यवस्था केलेली असते तेथें त्यांस नीट ठेवण्यांत येतें.

प्रत्येक कारखान्यामार्फत व मंजूर-संघामार्फत संस्कृति-पट्टी (कल्चर फंड) जमा करण्यांत येते व तिच्यांतूनच अर्भकालयें, बालशाळा, उद्यान-शाळा, क्रीडांगणें वगैरेचा खर्च चालविण्यांत येतो. शाळेंत दाखल होण्यापूर्वी मुलाचें आरोग्य, अन्न, झोंप या गोष्टींकडे विशेष लक्ष पुरविलें जातें आणि शाळापूर्वकालीन अभ्यासक्रमांत खेळ, गोष्टी, सहली, संगीत, कला व नाट्य इत्यादि विषयांचा समावेश केला जातो. या वयांत देखील सहकारी तत्त्व मुलांचे मनावर बिंबविण्याची व त्याची संवय मुलांस लावण्याचा प्रयत्न करण्यांत येतो. गेल्या कांहीं वर्षांत अशा प्राथमिक शाळांच्याही पूर्वीच्या शाळा दहा हजार काढल्या आहेत; परंतु अर्थातच लोकसंख्येच्या मानानें या थोड्याच असल्याकारणानें थोड्या लोकांनाच त्यांचा उपयोग होऊं शकतो.

मजूर-संघांकडून वयातीत मनुष्यांच्या शिक्षणासाठीं देखील त्यांच्या उत्पन्नाचा दहावा हिस्सा मिळतो. आणि कारखानदारांशीं किंवा मालकांशीं त्यांचे करार झालेले असतात. त्यांतही एकंदर मजुरीच्या आंकड्याचा शेंकडा एक टक्क्याप्रमाणें या फंडास मदत म्हणून त्यांनीं द्यावा.

प्राथमिक व दुय्यम शिक्षण यांचा एकत्र विचार केला जातो. शाळेला 'संयुक्त मजूर शाळा' अशी संज्ञा असते व तिचे 'प्राथमिक' व 'दुय्यम' असे दोन विभाग पाडण्यांत येतात. सबंध अभ्यासक्रम सात ते नऊ वर्षांपुरता आंखलेला असतो. या शाळेच्या कांहीं विशेष ध्यानांत ठेवण्यासारख्या गोष्टी असतात. पहिली गोष्ट म्हणजे प्रवेश-परीक्षा नाहींत व वरच्या वर्गांत मुलास घालावयाचें तें सबंध वर्षाचा

अभ्यास पाहून व सबंध वर्गाची एकंदर प्रगति पाहून. सर्व शाळांत मुलांमुलींस एकत्र शिक्षण देण्यांत येतें. मधून मधून मुलांची वैद्यकीय तपासणी करण्यांत येऊन मुलांच्या सामर्थ्याकडे व्यक्तिशः लक्ष पुरविण्यांत येतें. अशा रीतीनें अशक्त मुलांना अवघड काम सांगण्यांत येत नाहीं. ज्यांचे डोळे खराब असतील त्यांना पहिल्या रांगेंत बसविण्यांत येतें. डाल्टन योजनेचा स्वीकार सर्वत्र केलेला आहे. त्यामुळें व्याख्यान-द्वारा शिक्षण देण्याच्या पद्धतीस अजिबात फांटा देण्यांत आला आहे.

शाळांत विद्यार्थ्यांचें सरकार निर्माण करण्याच्या पद्धतीस उत्तेजन देण्यांत येतें व खास विद्यार्थ्यांच्या अशा संस्थाही बऱ्याच आढळतात. उदाहरणार्थ, आक्टोबरवाले, पुरोगामी, कॉम्सोमॉल, सहकारी संस्था वगैरे. शाळेचा कार्यक्रम ठरविण्यांत मुलांचें पुष्कळ अंग असतेंच. समाजसत्तावाद हा उघड उघड जातीजातींतील लढ्यावर पूर्ण विश्वास ठेवणारा; तथापि शाळांविषयीं मात्र क्रुप्स्कायानें लिहून ठेवलें आहे कीं, मोठ्या माणसांच्या स्वराज्याची नक्कल विद्यार्थ्यांच्या स्वराज्यांत दिसतां कामा नये. कारण मुलांच्या जीवितक्रमांत जातीजातींतील लढ्यास किंवा एकाच विशिष्ट वर्गाच्या आधिपत्यास जागाच नसते. वर्गविरहित भावी समाज कसा असावयाचा त्याचें शाळा ही एक शुभशंसी खूणच होय. हें ध्येय स्तुत्य आहे हें निःसंशय आहे खरें; परंतु शाळांतून अगदींच वैरभाव किंवा घासाघीस नाहीं असें मात्र नव्हे.

सहलींची पद्धति शाळांतून बरीच जारी असते. आरंभीं आरंभीं पुस्तकें वगैरे शालोपयोगी उपकरणें अपुरीं होतीं. म्हणून ह्या पद्धती-ला विशेष महत्त्व प्राप्त झालें. प्रदर्शनें, ऐतिहासिक स्थळें, कलामंदिरें वगैरे दाखविण्यासाठीं वारंवार नेण्यांत येतें व त्यांच्याकडून निसर्ग-सौंदर्याचें निरीक्षणही करवून घेण्यांत येतें. कांहीं प्रसंगीं सहलीच्या निमित्तानें लांबचा पल्लाही गांठून दूरदूरचीं प्रसिद्ध ठिकाणें त्यांस दाख-

विण्यांत येतात. त्याकरितां पैसा कमी पडला तर वाटेंत जातां जातां मदत जमा करण्यांत येते.

शिकविण्याची आणखी एक पद्धत म्हटली म्हणजे 'कॉंप्लेक्स'ची किंवा 'प्रॉजेक्ट'ची. कॉंप्लेक्स म्हणजे असें एक केंद्र असावयाचें कीं, त्याच्याभोंवतीं तत्संबंधीं सर्व कल्पना एकजीव करावयाच्या उदाहरणार्थ, खेडेगांवचें 'कॉंप्लेक्स' म्हटलें म्हणजे खेडेगांवांचा सर्व जीवनक्रम, पिकें, हंगाम, शेतकीचें इतर उत्पन्न, आरोग्य, सामाजिक चारित्र्य, स्थानिक व्यापार-टापार, खेडीं व शहेंर यांचा संबंध, खेडेगांवांतील जीवनांचे गुण-दोष, दोषनिवारणाचे उपाय, खेडेगांवांची व्यवस्था, खेड्यांची सुधारणा करण्याच्या उद्देशानें सार्वजनिक कार्य करणाऱ्यांचें परस्पर सहकार्य इत्यादि सर्व गोष्टींचा अंतर्भाव या 'संघांत' व्हावयाचा. असल्या सार्वत्रिक संघांत काम करतांना विद्यार्थ्यास खेडेगांवांत कार्य करण्यास व आपल्या कल्पना व्यवहारांत आणून दाखविण्यास प्रोत्साहन देण्यांत येतें.

आरोग्य संघ घेतला तर त्यांत व्यक्तीचें, कुटुंबाचें व समाजाचें आरोग्यवर्धन समाविष्ट होतें. पहिल्या दोन संस्थांचें आरोग्य शेवटल्या संस्थेच्या आरोग्यावर अवलंबून असतें हें तत्त्व शिकविण्यांत येतें. शरीर, अन्न, पचनक्रिया वगैरे गोष्टींचें उद्घाटन करण्यांत येतें; व दारूच्या दुष्परिणामाचें सप्रमाण आविष्करण करण्यांत येतें.

अशा रीतीनें निसर्ग-निरीक्षण, कार्य, बालजीवन, मानवी संबंध व शेवटीं सामाजिक जीवन या विषयांचा सांघिक अभ्यासांत समावेश केला जातो. या सर्वांचा मुख्य उद्देश हा कीं, समाज-सेवा करण्याची इच्छा उत्पन्न व्हावी व मिळालेलें ज्ञान केवळ व्यक्ति-हिताकरितां नव्हे तर सार्वजनिक हिताकरितां उपयोगांत आणण्याची बुद्धि वाढीस लागावी.

शिक्षकांकरितां अशा सांघिक अभ्यासाचा अगदीं तपशीलवार कार्यक्रम तयार करण्यांत येतात. पण ते केवळ शिक्षकाला मार्गदर्शक म्हणून होत. इतर शिक्षक व मुलें यांच्या साहाय्यानें त्यानें आपले स्वतंत्र कार्यक्रम आंखावे. कृत्रिम प्रवृत्ति व नीतीचे पोकळ धडे यांस आळा घालण्याविषयीं ताकीद असते. विशेष भर मुलांनीं स्वतः विचार करावा व निर्णय काढावे या गोष्टींवर असतो.

आजूबाजूच्या परिस्थितीचा शाळेवर विशेष परिणाम होत असतो. कारण ही परिस्थिति म्हणजेच शाळेची एक प्रकारची प्रयोगशाळा. खेडवळ भागांत खेडेगांवांतील परिस्थितीचा प्रभाव शाळेवर दिसून येतो. बरें, शाळेशेजारीं एखादा लहान-मोठा कारखाना असला तर त्याची छाया देखील साहजिकच भूगोल, शास्त्र, गणित या विषयांच्या शिक्षणावर पडतेच.

शहरवस्तींत शिक्षण सार्वत्रिक झालेंच आहे; खेडेगांवांतून मात्र या बाबतींत पुष्कळ कार्य व्हावयाचें आहे. शिक्षण-प्रसाराचे कामांत शेतकरी-वर्ग मनापासून लक्ष घालीत आहे. कांहीं ठिकाणीं शेतकऱ्यांनीं स्वतः आपल्या हातांनीं शाळेच्या इमारती बांधल्या. विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे, शास्त्रीय दृष्टीनें परीक्षा करूनदेखील शेतकऱ्याचें मूल शहरवासी गृहस्थांच्या मुलापेक्षां बुद्धींत श्रेष्ठ ठरतें. कदाचित् निसर्गाशीं त्याचा संबंध अगदीं जवळचा म्हणून असें होत असेल. शिवाय शाळेचा अभ्यास-क्रम असा योजिलेला असतो कीं, बुद्धीच्या नैसर्गिक परिपोषणास मदतच व्हावी.

रशियाच्या कांहीं भागांत नुसत्या जमिनीवर शेतकऱ्यांची उपजीविका होऊं शकत नाहीं; कोणत्यातरी जोड धंद्याची आवश्यकता भासते. हातमाग प्रचारांत असतात. घरांतील मुलेंदेखील त्यावर काम करतात व दिवसभर तो चालू असतो म्हटलें तरी चालेल.

खेडेगांवांत शिक्षण किती प्रमाणांत वाढलें त्याचा एक पुरावा मिळतो. सन १९१३सालीं खेडेगांवांत एकूण २८०० पोस्टाच्या पेट्या होत्या, सन १९२६ सालीं त्या ६४००० पर्यंत गेल्या व शिवाय फिरतीं डाकघरें कांहीं दूरदूरच्या खेड्यांकरतां होतीं तीं निराळींच. या फिरत्या पोस्ट-ऑफिसांचे चालकच शेतकीच्या मालाची ने-आण करतात. सन १९२३ सालीं 'पेझंट्स् गॅझेट' (शेतकरीवृत्त) नांवाचें एक वर्तमानपत्र काढण्यांत आलें. त्याचा खप दहा लाखांवर गेला. त्यांत शेतकीविषयक विविध विषयांची माहिती असते. या वर्तमान-पत्राकडे निरनिराळी माहिती विचारणारीं, अधिकाऱ्यांच्या विरुद्ध तक्रारी प्रसिद्ध करणारीं वगैरे हजारों पत्रें येतात व त्यांच्याविषयीं चौकशी करण्यांत येते आणि जरूर तर त्यांचें निवारणही करण्यांत येतें.

शिक्षण-प्रसाराकरितां सोव्हिएट सरकारानें सिनेमाच्या चित्रपटाचा बराच उपयोग केला आहे. त्यांच्या एका कुशल चलच्चित्रपटकारानें व्हिलेज पॉलिसी म्हणजे 'गांवगाड्याचें धोरण' या नांवाचा पट नुकताच तयार केला आहे. शेतकी, खेडवळांचें चारित्र्य व विशेषतः शेतकऱ्यां-चे प्रश्न व त्यांच्या अडचणी या विषयांसंबंधीं चित्रांचा त्या पटांत समावेश केला आहे. त्यांतच प्रेक्षकांनीं त्या प्रश्नांस तोंड देण्यास व ते सोडविण्यास उद्युक्त व्हावें म्हणून प्रयत्न करण्यांत आला आहे.

खरें म्हणावयाचें म्हणजे क्रांति घडवून आणली ती मुख्यतः शहरांतील मजुरांनीं; शेतकरीवर्ग तींत मागाहून प्रवाहपतित झाला. त्यानंतर कांहीं कालपर्यंत शहरें व खेडीं यांमधील विरोधभाव स्पष्टपणें होताच. शेतकऱ्यांच्या जबरदस्त प्रभावानें लेनिननें नवीन आर्थिक धोरणाचा उपन्यास केला. अर्थात् तें धोरण म्हणजे अगदीं शंभर नंबरी समाजसत्तावादापेक्षां थोडें वेगळें होतें. या दोन ध्येयांमधील विरोध व लढा अजूनही आहेच आणि रशियाच्या अंतःस्थ धोरणाचें

तें एक वैशिष्ट्यच होऊन बसलें आहे. हा विरोध नष्ट करून दोहोंत सहकार्य प्रस्थापित करण्याची अधिकाऱ्यांची तीव्र इच्छा आहे आणि लेनिननें तर ही 'सांधेजोड' करण्याची शिकस्त चालविली होती. 'नगर-ग्रामैक्य-संघ' या नांवानें एक मजुरांची संस्था इ० सन १९२३ सालीं काढण्यांत आली. त्या संघाचे आज लाखों सभासद झाले आहेत व त्यांच्या शाखा देशभर पसरल्या आहेत. कारखान्यांचे संघ व मजूरमंडळें खेडेगांवांशीं जास्त जास्त परिचय घडवून आणतात व ग्रामस्थिति सुधारण्याचा प्रयत्नही त्यांच्याकडून होत असतो.

निरक्षरता घालवून टाकण्याचा प्रयत्न अनेक मार्गांनीं करण्यांत आला. मजूरसंघ, कामकऱ्यांचीं मंडळें, शेतकऱ्यांच्या संस्था, सहकारी संस्था, तुरुंग हीं सर्व स्थळें शिक्षण-प्रसार करण्यासाठीं उपयोगांत आणलीं होतीं. औद्योगिक व शेतकीविषयक शाळा, प्रौढ लोकांकरितां दिवसां व रात्रीं, अशा नवीन सुरू करण्यांत आल्या. निरक्षरतेचें विध्वंसन करण्याच्या कामासाठीं एक जादा कमिशन नेमण्यांत आलें होतें व 'निरक्षरतेचा नाश करा' हें ब्रीदवाक्य असणारी एक स्वयं-सेवक संस्था अतिशय भरभराटीस आली होती. या शिक्षण-प्रसारांत नुसता श्रीगणेशाच मुलांना द्यावा हा उद्देश नाहीं, तर त्यांना सामाजिक ज्ञान प्राप्त व्हावें व राष्ट्राच्या अभ्युदयाच्या कार्यांत सह-कार्य करण्याची इच्छा त्यांच्या मनांत प्रज्वलित व्हावी हा असतो. वाचनालयांची संख्या झपाट्यानें वाढत आहे व प्रत्येकाला निदान एक तरी अभ्यास-मंडळ जोडलेलें आहेच. फिरतीं वाचनालयेंही आहेत. शेतकऱ्यांच्या व मजुरांच्या रोजच्या प्रश्नांची चर्चा करणारीं पत्रकें तर लाखोंनीं छापून वांटण्यांत येतात.

या सर्वांचा परिणाम असा झाला आहे कीं, शहरवस्तींतून व मजुरांतून निरक्षरता साफ नष्ट झाली आहे म्हणण्यास हरकत नाहीं.

खुद्द कृषिप्रधानवर्ग मात्र प्रायः कोरडे राहिले आहेत. लाल सैन्य मुख्यतः शेतकऱ्यांचें असतें. इतर मार्गांबरोबर या सैन्यांत असतां त्यास शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो. सैन्यांत शेतकरी दोन वर्षें असतो. या अवधींत त्याचा ठराविक शिक्षणक्रम असतो व तो सैन्यांतून मुक्त होण्यापूर्वीं एक विशेष व्यावहारिक अभ्यासक्रम ठरविला असतो, त्यायोगें शेतकरी खेडेगांवांत शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य करण्यास समर्थ होतो. अशा रीतीनें बरेच शेतकरी सैन्यांत समाविष्ट केले जातात व ते घरोघर परत आले म्हणजे ग्राम-सुधारणेच्या व निरक्षरता घालविण्याच्या कामीं मदत करतात.

विविध प्रकारच्या संस्था याशिवाय चालू आहेतच. संशोधक मंडळें, धंदेशिक्षणाच्या शाळा, कामकऱ्यांच्या संस्था, शेतकरी लोकांच्या शाळा, अंध-पंगु-विद्यालयें, गायन—वादनाचे वर्ग वगैरे वगैरे संस्था आपापलीं कार्यें करीत असतात. सर्वांत फार महत्त्वाची शिक्षणसंस्था म्हटली म्हणजे 'इन्स्टिटयूट ऑफ् सायकॉलॉजी व डिफेक्टॉलॉजी' ही होय. अत्यंत प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ, वैद्य व शिक्षण-शास्त्रज्ञ, बालकाचा व त्याच्या मनाचा वगैरे सर्वांगीण अभ्यास करणाऱ्या या संस्थेंत काम करतात.

वरिष्ठ अभ्यासासाठीं, मॉस्कोच्या दोन समाजसत्तावादी विद्यापीठांखेरीज, सुमारें वीस दुसरीं विश्वविद्यालयें आहेत. पहिल्या दोहोंचीं नांवें 'ओरिएंटल युनिव्हर्सिटी' व 'सन्यत्सेन युनिव्हर्सिटी' अशीं आहेत. समाजसत्तावादाच्या तत्त्वांचा प्रचार व शिक्षण वाढविणें हाच या दोहोंचा प्रधान हेतु आहे.

क्रांतीनंतरच्या काळांत जुनें तेवढें सर्व तुच्छ लेखण्याकडे प्रवृत्ति होती. नाणावलेल्या अधिकारी लेखकांचा तिरस्कारयुक्त रीतीनें अधिक्षेप करण्यांत येई व त्यांना कोणत्याही प्रकारचें उत्तेजन मिळूं

देण्यांत येत नसे. धर्माचें नांव काढलें कीं, तळपायाची आग मस्तकास जावयाची. ही प्रवृत्ति उत्तरोत्तर कमी कमी होत गेली आणि सहिष्णुतेची भावना दृढावत चालली. शिक्षणपद्धतीची सगळी पार्श्वभूमि धर्मनिष्ठाविरहित असली तरी, सांप्रत शाळांतून धर्माविरुद्ध प्रत्यक्ष चळवळ अशी करण्यांत येत नाहीं.

मॅक्सिम् गॉर्कीनें रोमेरोलॉंला पाठविलेल्या व वर्तमानपत्रांत नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पत्रावरून हेंच दिसतें कीं, झारशाहींतील रशियन ग्रंथकारांचें विवेचक दृष्टीनें अध्ययन करणारा वाचकवर्ग अजूनही बराच मोठा आहे. रशियन हा जरी कॉम्युनिस्ट असला तरी अभिजात वाङ्मय, कलाकौशल्य व गायन-वादन यांतील गुणांची योग्य पारख करण्याइतका तो मर्मज्ञ नसतो असें नाहीं. लेनिनची सुद्धां, गायन-वादन-कलेंत निष्णात म्हणून नांवाजलेल्या, रशियांतील कांहीं कसबी लोकांशीं दाट मैत्री होती. स्वरमाधुर्यानें तो मोहून जात असे.

हल्लींचे शिक्षणमंत्री लूनाकार्स्की यांच्याविषयीं एक आख्यायिका आहे; तीवरून लूनाकार्स्कीच्या स्वभावविशेषावर बराच प्रकाश पडतो. रशियन क्रांतीच्या पहिल्या भरांत, आपसांत यादवी सुरू असतां, एकाएकीं बातमी आली कीं, बंडखोरांनीं मॉस्कोमधील क्रेम्लिनचा कांहीं भाग उध्वस्त केला. नंतर ही बातमी खोटी ठरली हें निराळें. पण लूनाकार्स्कीवर तिचा तत्काळ परिणाम झाला, व त्याच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. तडक लेनिनकडे जाऊन त्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला; कारण काय, तर गतकालांत उभारलेल्या भव्य व सुंदर इमारतींचा नाश होत असलेला प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहाण्याचें त्याच्या जिवावर आलें. राजीनामा परत घेण्यास तो शेवटीं कबूल झाला; पण रशियन कलाविषयक बाबींवर देखरेख करण्याचें

त्याच्याकडे सोंपविलें तेव्हांच. हल्लीं तर शिक्षणखात्याचा मुख्य म्हणून' वाचनालयें, अजबखाने, कलाविषयक व शास्त्रीय संस्था, नाटकगृहें, संगीत-शाळा, सिनेमागृहें--थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे रशियांतील ज्ञानोन्नतिविषयक सर्व बाबी, शिक्षणखात्याचा मुख्य म्हणून लूनाकार्स्कीच्या ताब्यांत आहेत. तो कवि आहे, नाटककार आहे, ग्रीक-रोमन वाङ्मयाचा भोक्ता आहे; पण क्रांतिवादी आणि कॉम्युनिस्टही आहे. म्हणूनच रशियन शिक्षणपद्धतीमध्यें हल्लीं दिसत असलेला अनेकांगीपणा व व्यापकपणा आला आहे.

रशियांतील शिक्षणसुधारणेचें बरेंचसें श्रेय दुसऱ्या एका व्यक्तीलाही आहे. ती व्यक्ति म्हणजे लाभालाभ, जयाजय, संपत्तिविपत्ति ह्यांमध्यें लेनिनबरोबर एकरूपतेनें भाग घेणारी त्याची अर्धांगी क्रुपस्काया होय. हद्दपारीच्या दिवसांतसुद्धां तिनें शिक्षणपद्धतीचा विशेष अभ्यास करून 'सार्वत्रिक शिक्षण व लोकशाही' या नांवाचें पुस्तक लिहिलें. तिचा पोशाक साधा, तोंडवळाही निस्तेज व थोडासा विरूप. तरीसुद्धां थोड्याशा संभाषणांतच तिची खरी मोहकता प्रतीत होते. लेनिनच्या निधनानंतर सोव्हिएट कॉंग्रेसला उद्देशून उच्चारलेले खालील शब्द तिच्या स्वभावाचे पूर्ण निदर्शक आहेत. ती म्हणाली, 'बंधूंनो, कामगार बंधु-भगिनींनो, शेतकरी बंधु-भगिनींनो, तुमच्यापुढें पदर पसरून माझें निकडीचें मागणें आहे कीं, लेनिन या विभूतीला बाह्यात्कारी आदर दाखवूं नका, त्याच्या स्मरणार्थ दगडी पुतळे उभारूं नका. त्यानें आपल्या उभ्या आयुष्यांत असल्या गोष्टींची मुळींच फिकीर केली नाहीं. लक्षांत ठेवा कीं, आपला देश दारिद्र्यानें गांजला आहे. लेनिनचें स्मृतिचिन्ह करावयाचें असेल तर शिशुगृहें, आंधळ्या-पांगळ्यांच्या धर्मशाळा बांधा, किंडरगार्टनच्या पद्धतीवर शाळा स्थापा, वाचनालयें, फिरतीं इस्पितळें व रुग्णालयें उघडा'.

प्रकरण चौदावें

# शेतकी आणि शेतकरी

मॉस्को शहर सोव्हिएट-संघांत प्रमुख गणलें गेलें आहे. कारण रशिया-वर त्याचा पगडा बसून जगांतील दुसऱ्याही देशांवर त्याची छाया पडली आहे. मॉस्को, लेनिनग्राड व दुसरीं मोठीं शहरें हीं खेड्यांच्या अफाट समुद्रामधील तुरळक बेटेंच होत. हिंदुस्थानप्रमाणें रशिया प्राय: खेड्यापाड्यांनीं व्यापलेला व शेतकीप्रधान देश आहे. रशियां-तील शेंकडा ८० लोक खेड्यांत राहतात व कामगारवर्गांपैकीं शेंकडा ७५ लोक शेतांत राबतात.

रशियाला उद्योगधंद्यांनीं व्यापून टाकण्याचे जारीचे प्रयत्न झाले असूनसुद्धां रशिया बराच काळपर्यंत शेतकीप्रधान देशच राहणार हें निश्चित. तेव्हां तेथील परिस्थितीचें बरोबर आकलन होण्याकरितां खेड्यांत जाऊन राबणाऱ्या रशियन शेतकऱ्याचेंच निरीक्षण केलें पाहिजे; व सोव्हिएट सत्तेखालीं झालेले फायदे-तोटे अजमावयाचे असल्यास सोव्हिएट-सत्तेनें शेतकऱ्यांचे जीवितक्रमांत काय स्थित्यंतर घडवून आणलें ह्याचा विचार आधीं केला पाहिजे.

पण देशाच्या अफाट विस्तारामुळें अशी बारकाईची पाहणी करणें मोठें दुर्घट झालें आहे. स्थलभिन्नतेबरोबर स्थितिभिन्नता आलीच; व जें मॉस्कोजवळील खेडयांना लागू पडेल तें दूरवरच्या खेडयांना मुळींच लागू पडणार नाहीं. फार कशाला—एक-दोन वर्षांमागें अशी एक बातमी आली होती कीं, सैबेरियांतील जंगलांत शोध करणाऱ्या टोळीला पंधराशें माणसांची वसाहत एकाएकीं आढळली असून त्या माणसांना बाहेरील जगाची गंधवार्ताही नाहीं. त्यांना सन १९१४सालीं झालेलें महायुद्ध ठाऊक नाहीं, रशियांत झालेली राज्यक्रान्ति त्यांच्या

गांवींही नाहीं. झार आपल्यावर अजून राज्य करतोच आहे अशी त्यांची समजूत. बरोबरच आहे, दृष्टीआड सृष्टि. ही बातमी जरी लेनिनग्राडच्या वर्तमानपत्रांत आलेली असली तरी ती मुळींच विश्वसनीय नाहीं. ती कल्पनाविरचित असो नाहींतर केवळ अतिशयोक्तिपूर्ण असो. एवढी गोष्ट खरी, कीं त्या बातमीवरून सोव्हिएट-संघांतील स्थितिभिन्नतेची आपणांस कांहींशी कल्पना येते.

रशियामध्यें आतां आतांपर्यंत गुलामगिरी नांदत होती हें सुप्रसिद्धच आहे. दास्यमुक्तीचें शेवटचें आज्ञापत्र इ० सन १८६३मध्यें निघालें. त्या तारखेला सहा कोटि लोकसंख्येपैकीं जवळ जवळ पांच कोटि लोक राष्ट्रीय मालमत्तेवर अगर राजाच्या मालमत्तेवर अगर खाजगी जमीनदारांकडे राबणारे गुलाम म्हणून होते. ह्या गुलामगिरीच्या काळांत कायद्यानें मालकाला जवळ जवळ कर्तुमकर्तुं सत्ता दिली असल्यामुळें तो गुलामांना वाटेल तें काम सांगूं शके व आज्ञा पाळली न गेल्यास तो चाबकाच्या फटक्यांनीं आणि ठोशांनीं त्यांस शिक्षा करी. आज्ञा मोडणारांना सैबेरियामध्यें पाठविण्यास त्याला पूर्ण मुभा असे.

दास्यमुक्तीनें गुलामांची कांहीं पूर्ण सुटका झाली नाहीं. बहुधा त्यांच्या मालकीची अशी थोडीच जमीन असून तीही विशेष सुपीक नव्हती व जमीनदाराला द्यावयाच्या जमिनीच्या किंमतीचा अगर तीवरील भाडयाचा बोजा त्या त्या खेडयावर पडला. कर्ज देऊन हातोहात जमिनीचे सवदे करण्याला सरकारनें मदत केली तरीसुद्धां बोजा राहिलाच. नव्या व्यवस्थेखालीं जर कोणाचा जास्तींत जास्त फायदा झाला असेल तर तो खुद्द जमीनदारांचा. कारण त्यांना रोख पैसे मिळून शिवाय सगळ्या खटाटोपांतून त्यांची मुक्तता झाली.

लवकरच क्रांतीची चळवळ खेड्यांपर्यंत पोंचली; परंतु तिला खेडयांत मुळींच रुकार मिळाला नाहीं. हिंदुस्थानाप्रमाणें रशियांतील

शेतकऱ्याला स्वातंत्र्याची संदिग्ध कल्पना समजेना व उमजेना. त्याला जर कसली निकड असेल तर ती जमिनीची, हलक्या साऱ्याची व जुलमापासून संरक्षणाची. शेतकरी लोकांना तरुण क्रांतिकारकांचा कसा संशय येई व कधीं कधीं ते त्यांना पोलिसाच्या ताब्यांत देण्यासही कसे सोडीत नसत वगैरे क्रांतीच्या आरंभकाळांतील वर्णनें कांहीं प्रसिद्ध रशियन कादंबरीकारांच्या गोष्टींत आपणास वाचावयास सांपडतात.

रूसो-जपानी युद्धानंतर पुष्कळ ठिकाणचे शेतकरी बंडांत सामील झाले व दंग्याधोप्यांचा वणवा पेटला. त्यांचा पुरा मोड झाला नाहींच. उलट शेतकऱ्यांनीं 'अंग मोडून राबणारेच सर्व जमिनीचे मालक आहेत' या ब्रीदवाक्याचा पुरस्कार करून एक शेतकरी-संघ स्थापन केला.

खेडयांतून 'मीर' नांवाच्या पंचायती पुरातन काळापासून अस्तित्वांत होत्या. त्यामुळें शेतकऱ्यांची संघटना होण्यास बरीच मदत झाली. या पंचायती लोकशाहीच्या तत्त्वावर चालत असून मोकळ्या जागेंत बहुधा भरत व त्यांमध्यें स्थानिक बाबींविषयीं चर्चा चाले. कोठें कोठें पंचायतीच्या ताब्यांत समाईक जमीन असे व पंचायतच तिची विभागणी करी. दास्यमुक्ततेनंतर 'झेम्स्ट्व्होस' नांवाचीं जास्त कायदेशीर व सरकारी स्थानिकमंडळें अस्तित्वांत आलीं.

मताधिकार जमीनजुमल्यावर अवलंबून असल्यामुळें हीं मंडळें बहुधा जमीनदारांच्याच ताब्यांत असत. कार्यपद्धतीच्या व चळवळीच्या दृष्टीनें ह्या मंडळांची आपलेकडील जिल्हा लोकलबोर्डांशीं तुलना करतां येईल.

महायुद्ध शेतकऱ्यांना पकेंच भोंवलें. त्यांच्यापैकीं धट्टेकट्टे लोकांची सैन्यांत भरती झाली; व असें सांगतात कीं, सत्तर लक्ष लोक रणांगणावर मेले किंवा जखमी झाले. शेतें मशागतीविना ओसाड

राहिलीं. वर्षानुवर्षे झगडून शेतकऱ्यांनीं मागें सारीत नेलेलें रान पुन्हा माजलें व पिढ्यान् पिढ्या केलेली मेहनत फुकट गेली. अफाट शेतकरी जनतेंत विलक्षण वारें संचरलें. 'शांतता व मालकीची जमीन' पाहिजे म्हणून निकडीची ओरड सुरू झाली. शहरांतील लोकांनीं ह्या ओरडींत आपलाही सूर मिळविला कीं 'अन्नसुद्धां पाहिजे'.

क्रांतीच्या प्रारंभींच्या काळांत शेतकरी बोल्शेव्हिकांशीं फटकून वागले; पण शेतकऱ्यांच्या सहानुभूतीविना बोल्शेविझमचें तत्त्व मुळांतच खुरटलें असतें. सरतेशेवटीं लेनिननें शेतकरी सभेचें मन वळविलें; पण ह्यापूर्वींच शेतकऱ्यांनीं आपल्या हातांत कायदा घेऊन जमीनदारांचे मालकी हक्क पायाखालीं तुडवून जमिनीचा ताबा घेतला होता.

परदेशांतील पैशाच्या व दारूगोळ्याच्या मदतीनें धाडसी टोळ्यांनीं सोव्हिएटसरकारवर हल्ला करण्यास जेव्हां सुरुवात केली व यादवी सुरू झाली तेव्हां मात्र शेतकऱ्यांच्या खऱ्या परीक्षेची वेळ आली. एवढे कष्ट करून व क्लेश सोसून मिळविलेली जमीन हातची जाणार या भीतीनें शेतकरी लोक सोव्हिएटसरकारभोंवतीं गोळा झाले, व सोव्हिएटचें वर्चस्व प्रस्थापित करण्यास बव्हंशीं त्यांचीच मदत कारणीभूत झाली. यादवीनंतर पाठोपाठ दुष्काळ पडला, आजार सुरू झाला. अशा या भयाण ओसाडीवरच नवीन रचनेचें काम हातीं घेणें भाग होतें.

सर्व जमीन राष्ट्राच्या मालकीची करण्याकरितांच सोव्हिएट सरकारनें पहिले पहिले कायदे केले. ह्या कायद्याखालीं जमीन विकत घेणें, विकणें, खंडानें देणें, तारण म्हणून देणें, अगर कोणत्याही तऱ्हेनें स्वत:च्या ताब्यांत घेणें ह्या गोष्टी करणें अशक्य झालें.

ज्या लोकांत काम करण्याची कुवत आहे, व ज्यांना स्वकुटुंबानिशीं अगर दुसऱ्या कोणत्याही तऱ्हेच्या संघपद्धतीनें शेतांत राबण्याची इच्छा आहे, त्या सर्व लोकांना, काम करण्याची अंगांत ताकद

असेपर्यंत, लिंगभेदविरहित जमिनीचा उपभोग घेण्याची मुभा कायद्यानें दिली. मजुरीवर माणसें घेणें बेकायदेशीर ठरलें. अशा तऱ्हेनें शेतकऱ्याला जमीन मिळूनच्यामिळून जमिनीवरील कर्जांतून व जमीनदारांस द्यावयाच्या वार्षिक खंडांतून तो मुक्त झाला. कांहीं मोठालीं वतनें सरकारनें आपल्या ताब्यांत घेऊन त्यांत नमुनेदार शेतें पाडलीं. जमिनीची शेतकऱ्यांत विभागणी करण्याचें काम त्या त्या गांवसभेकडे सोंपविण्यांत आलें.

पूर्वापारपद्धतीप्रमाणें गांवसभेकडे कांहीं जमीन असेच. ह्यामुळेंच राष्ट्रांतील सर्व जमीन सरकारी मालकीची करणें हें काम सुलभ झालें. कांहीं वेळेस शेतकरी हा जमिनीपासून लांब रहात असल्यामुळें हंगामाचे दिवसांत त्याला स्वतःचे शेतावर स्थलांतर करावें लागे. बायका बहुधा उन्हाळ्यांत शेतीच्या कामाला हातभार लावतात व हिंवाळ्यांत कांतणें, विणणें आणि शिवणकाम करणें हींच त्यांचीं कामें.

सोव्हिएट अंमलाखालील पहिल्यापहिल्या कायद्यांनीं जमिनीचा उपभोग घेण्याचा हक्क दुसऱ्यास देतां येत नसे. तरीसुद्धां जमिनी बेकायदा खंडानें देणें सुरू झालें. इ० सन १९२२ सालीं मूळ कायदा बदलून नियमित कालमर्यादेनें जमिनी खंडानें देण्याची परवानगी दिली. मजुरीनें माणसें घेणें बेकायदेशीर होतेंच. ह्या निर्बंधानें सुद्धां लोकांचा विशेषसा फायदा झाला नाहीं. कारण असंख्य कुटुंबें अशीं होतीं कीं, त्यांच्या मालकीचे घोडे किंवा दुसरीं गुरेंढोरेंसुद्धां नव्हतीं. म्हणून इ० सन १९२६त कायद्यांत आणखी दुरुस्ती केली. खंडानें देण्याची कालमर्यादा वाढविली व अशा खंडानें घेतलेल्या जमिनीवर माणसें मजुरीनें घेण्याची कांहीं अटींवर परवानगी दिली. जमिनी खंडानें देण्याघेण्याचा व्यवहार स्थानिक अधिकाऱ्यांकडे नोंदविला पाहिजे व कुटुंबांतल्या धट्टयाकट्टया मंडळीनें मजूर

कामावर घेतले असले तरीसुद्धां शेतांत राबलें पाहिजे; राहण्या-जेवण्याचे बाबतींत मजुरांना कुटुंबीयांप्रमाणें वागविलें पाहिजे. जमीन खंडानें देण्यावर व माणसें मजुरीनें घेण्यावर नियंत्रण घालणाऱ्या ह्या आणि दुसऱ्या पुष्कळच अटी आहेत.

शेतकरी सरकारला कर म्हणून फक्त शेतसाराच देतो. शेतकरी जास्त श्रीमंत असला कीं, तो तितक्या प्रमाणांत जास्त सारा देतो. एवढेंच नव्हे तर त्याला वरचढ दराच्या हिशेबानेंच सारा भरावा लागतो. उलटपक्षीं बऱ्याचशा गरीब शेतकऱ्यांना सारा अजिबात माफ आहे. कारण एकतर त्यांचें उत्पन्न थोडें, शिवाय त्यांची राहणी आधींच इतकी हीन दर्जाची असते कीं, त्यांच्या डोक्यावर सारा बसविला तर ती जास्तच खालावेल. म्हणून अशा शेतकऱ्यांना सारा माफ. गेल्या वर्षापर्यंत ही साऱ्याची माफी शेंकडा २५ शेत-जमिनीवर होती. क्रांतीच्या दशसांवत्सरिक दिनानिमित्त सरकारनें असें जाहीर केलें कीं, ही सारामाफी आणखी शेंकडा १० शेतजमिनींना दिली जाईल. शिवाय अशीही योजना पुढें आली कीं, विशेष गरीब शेतकऱ्यांपैकीं वयातीत लोकांना सरकारनें बैठा पगार द्यावा.

रशिया फार कंगाल देश आहे व तेथें शिक्षण, शेतकीसुधारणा व उद्योगधंद्यांची वाढ ह्यांकरितां जितकी पैशाची जरूर आहे तितकी दुसऱ्या कशाचीही नाहीं. पैशाची जेथें इतकी टंचाई तेथें सारामाफी दिवसेंदिवस वाढत जावी हें जरा विचित्र दिसतें. इ० सन १९२६ सालच्या कॉम्युनिस्ट पक्षाच्या सभेनें स्वच्छ सांगितलें कीं, शेतकरी हा केवळ शेतसाऱ्याचा धनी नाहीं. कारण वाढते कर व किरकोळीचे वाढते भाव ह्यांमुळें जमिनीचा सुपीकपणा न वाढतां उलट कमीच होईल व साहजिकच धान्यही कमी येईल.

इ० सन १९२४–२५ सालीं प्रत्येक शेतकरी कुटुंबामागें

सरासरी कर १४·२ रूबल्स पडे. तोच इ० सन १९२५–२६सालीं ९·३ रूबल्स झाला व इ०सन १९२६–२७ सालीं तो ११·९ रूबल्स वाढला ( १ पौंड=१० रूबल्स ). शेतसारा जिराइती जमिनीच्या क्षेत्रफळावर अवलंबून असून कुटुंबांतील माणसांच्या संख्येप्रमाणें त्यांत फेरफार करण्यांत येतो. शेतसारा बसवितांना पाळीव जनावरें एकराचाच भाग समजलीं जातात. सारा चढत्या क्रमानें असतो. उदाहरणार्थ, १५० रूबल्सपर्यंत उत्पन्नावर तो शेंकडा ४·७५ असतो, २०० रूबल्सपर्यंत शेंकडा ५·२५ असतो, ३०० रूबल्सपर्यंत शेंकडा ५·७९ असतो, ४०० रूबल्सपर्यंत शेंकडा ८ असतो, ६०० रूबल्सपर्यंत शेंकडा १०·५ असतो व ६०० रूबल्सवरील उत्पन्नावर सारा शेंकडा १४ असतो.

शेतसाऱ्यापैकीं बरीचशी रक्कम स्थानिक बाबींवर खर्चिली जाते. इ० सन १९२५–२६मध्यें २३½ कोटी रूबल्स सारा आला. ह्यांपैकीं १० कोटी रूबल्स स्थानिक गरजा भागविण्याकडे गेले. अशा तऱ्हेनें शेतसाऱ्यांतूनच स्थानिक व राष्ट्रीय जमाखर्चाची तोंडमिळवणी होते. पण आश्चर्य वाटण्याजोगी गोष्ट ही कीं, पुष्कळशीं खेडीं आपापल्या गरजा भागविण्यासाठीं आपखुषीनें स्वतःवर कर लादून घेतात. हा आपखुषीचा सारा केव्हां केव्हां सर्व शेतसाऱ्यापैकीं शेंकडा ३९ इतका असतो व एकदां तर तो शेंकडा ७० झाला होता असें सांगतात.

राज्यक्रांतीनंतर बरेच संघ स्थापन झाले. कामगार लोकांनीं संघटना करून लहान लहान संघ स्थापन केले. अशासाठीं कीं, सर्वांनीं सामुदायिक तऱ्हेनें शेतांत राबावें व एकजुटीनें कालक्रमणा करावी. पुष्कळ धार्मिक पंथांनींसुद्धां कामगारांचेंच अनुकरण केलें. ह्या संघटनेच्या चळवळीनें पहिल्या पहिल्यांदां जरी बराच मार्ग

आक्रमण केला तरी पुढें ती मंदावली आणि ह्याचें कारण केवळ तपशिलांत मतभेद. ह्यानंतर 'आर्टेल' नांवाचे शेतकऱ्यांचे संघ अस्तित्वांत आले. ह्यांमध्यें शेतकरी लोक समाइकीनें सर्व जमीन एकत्र लावीत. पुढें 'कलेक्टिव्हूज्' नांवाच्या सहकारी तत्त्वानें जमिनीचा उपभोग घेण्याच्या दुसऱ्याही पद्धती अस्तित्वांत आल्या.

सहकारी तत्त्वावर जमिनी लावण्याचा मोठा फायदा असा कीं, त्यामुळें शेतकऱ्याच्या आवांक्याबाहेर असलेली यंत्रसामुग्री, लोखंडी नांगर वगैरे आणतां येतात. ट्रॅक्टरला रशियामध्यें जवळ जवळ देव मानतात, कारण त्यामुळेंच मोठ्या प्रमाणांत सहकारी पद्धति आचरली गेली आहे.

शेतकी बँका आणि पतपेढ्या पुष्कळच स्थापन झाल्या आहेत व पतीवर पैसे मिळण्याच्या पुष्कळ सोयी झाल्या आहेत. इ० सन १९२६ मध्यें ४२ लाख लोक ह्या सोसायट्यांचे सभासद होते. ह्या सोसायट्यांमधून सरकार भांडवल उभारण्याकरितां अगर बीं-बियाण्याकरितां कर्जाऊ रक्कम देऊन मदत करतें अथवा यंत्र-सामुग्रीवर हप्तेबंदीनें पैसे घेऊनही मदत करतें. गिऱ्हाइकांच्या, शेतकऱ्यांच्या अशा दुसऱ्या पुष्कळ तऱ्हेच्या सोसायट्यांचा जिकडे तिकडे प्रसार झाला आहे.

अतिशय दाट वस्तीच्या भागांतून दुसरीकडे स्थलांतर करण्या-विषयीं पुष्कळ कुटुंबांचें मन वळविण्याकडे सोव्हिएट सरकार कसून प्रयत्न करितें. जे स्थलांतर करावयास तयार असतील त्यांचा जमिनी-वरील व रेल्वेवरील प्रवास सरकार सुगम करितें, त्यांना कर्जाऊ रक्कम देतें व तात्पुरती शेतसाऱ्याची माफीही देतें.

पूर्वीं रशियामध्यें घरधंद्याची बरीच भरभराट झाली होती व कोट्यवधि स्त्रिया व पुरुष त्यांत गुंतले होते. महायुद्धांत व नंतर ती

संख्या बरीच खालावली; पण आतां पुन्हा वाढत आहे. अशा लोकांना सर्व तऱ्हेनें उत्तेजन दिलें जातें व त्यांना भारी होणारे करही उठविले गेले आहेत. हे बैठे धंदे विशेषतः हिंवाळ्यांत फारच उपयोगाचे आहेत कारण त्या वेळीं दुसरें कांहींच काम नसतें. बूट शिवणें, कल्हई करणें, लांकडी सामान तयार करणें वगैरे कामें हातानें अगर साध्या यंत्रसामुग्रीचे साहाय्यानें केलीं जातात.

मीं ह्या लेखमालेंत एके ठिकाणीं शेतकी-संस्था व शेतकऱ्यांच्या चळवळी ह्यांविषयीं लिहिलेंच आहे. त्यांचीं वर्तमानपत्रें आहेत, गांवयात्रा आहेत, पाठशाला आहेत व आरोग्यभुवनें आहेत. लायब्ररी, वाचनालयें व स्त्रियांचे क्लब्ही आहेत. साक्षरता-प्रसारक-मंडळें, परस्पर-सहाय्य-संघ जिकडे तिकडे स्थापन झाले आहेत. तसेंच 'पायोनियर' व 'कॉम्सोमोल' वगैरे युवक-संघही निर्माण झाले आहेत.

रशियामध्यें खेडेगांवांतून गृहव्यवस्थेंत फारच फेरबदल झाले आहेत व धर्मपीठें आपल्या उच्चासनावरून ढळलीं आहेत; तरी अद्यापि चर्च हेंच पुष्कळ चळवळींचें उगमस्थान आहे व धार्मिक सण मोठ्या थाटानें अजून साजरे करतात. रजिस्टर पद्धतीनें लग्न करणें सुलभ असून सुद्धां लग्नाचे मोसमांत पुष्कळ जोडपीं चर्चमध्यें गर्दी करून सोडतात.

पण एवढी गोष्ट खरी कीं, चर्चची वरचढ सत्ता जाऊन तो मान आतां 'नरोडनि डाम' अगर पंचायतगृहाकडे आला आहे. पुस्तकालय, वाचनालय, क्लब, शाळेचे वर्ग व थिएटर यांचा या पंचायतगृहांत समावेश होतो. शिवाय तेथें तांबड्या वस्त्रानें अवगुंठित असा 'लेनिन कॉर्नर' हा असावयाचाच.

प्रकरण पंधरावें

# स्त्रिया व कुटुंब-संस्था

रशियाविषयीं पहिला ठराविक प्रश्न जर कोणता विचारण्यांत येत असेल तर तो हा कीं, रशियांत खरोखरीच बायकांना राष्ट्रीय मालमत्ता समजण्यांत येतें किंवा काय? ह्या कुत्सित प्रश्नाचा अर्थ समजणें मोठें कठीण आहे. ही विशिष्ट महत्त्वाची 'बातमी' म्हणून पसरविण्याचें ज्यांनीं कसून प्रयत्न केले त्या वर्तमानपत्रांचे बातमीदारांना व संपादकांनाही बहुधा आपण काय लिहीत आहों याचें भान राहिलें नाहीं. सोव्हिएट अमलाखालील सर्व प्रदेशांत स्वैर संभोग प्रचारांत असला पाहिजे अशी एक कल्पना कदाचित् त्यांच्या मनांत डोकावत असेल. रशियांत स्त्रियांचा दर्जा अतिशय खालावलेला आहे व स्त्री निव्वळ पुरुषाच्या कामेच्छा तृप्त करण्याची साधन झाली आहे अशीही त्यांची कल्पना असेल किंवा असें दुसऱ्यांना वाटावें अशी त्यांची इच्छा असेल.

पण रशियाला जाऊन येणाऱ्याच्या अगर तेथील सद्यःस्थितीविषयीं वाचणाराच्या मनावर ह्यापेक्षां फारच निराळा ठसा उमटतो. आधुनिक रशियन स्त्रीमध्यें दुसरे कांहींही दोष असोत, पण ती पुरुषाची मालमत्ता अगर खेळणें नाहीं हें खास. तिला पूर्ण स्वातंत्र्य—चीड आणण्याइतकें म्हणाना—आहे व पुरुषांपेक्षां दुय्यम दर्जा तिला साफ नाकबूल आहे.

मॉस्कोमध्यें असतांना एका स्त्रियांच्या सभेला मी कांहीं वेळ हजर होतों. लेनिनची बायको क्रूप्स्काया, मादाम सन्यत्सेन, वृद्ध क्लारा झेट्किन् व परदेशांतून आलेल्या दुसऱ्याही पुष्कळ स्त्रिया तेथें हजर होत्या. युरोपच्या इतर राष्ट्रांतील ज्या ज्या स्त्रियांनीं भाषणें केलीं त्यांनीं त्यांनीं आपल्या रशियन भगिनींची, त्यांनीं सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य मिळविल्यामुळें, हेवा वाटण्याजोगी स्थिति आहे असें सांगितलें.

पूर्वी रशियामध्यें स्त्रीचा दर्जा पुरुषाच्या बरोबरीचा खरोखरीच नव्हता. कायदा पुरुषांचा पक्षपाती होता. जें नवरा सांगेल तें करणें बायकोला भाग होतें. त्याच्या पूर्वसंमतीशिवाय तिला काम-धंदा करतां येत नसे. काडीमोडीची परवानगी मिळणें तिला जवळ जवळ अशक्य होतें. वारसांपैकीं १/१४ भागावरच कन्येचा हक्क असे, बाकीच्या तेरा भागांवर पुत्रांचा हक्क असे. लग्नानंतर स्त्रीची मालमत्ता व संपत्ति पतीच्या ताब्यांत जात असे. खेड्यांतील लोक गाढ अज्ञानांधकारांत खितपत होते आणि असें सांगतात कीं, शेतकऱ्याच्या मुख्य मुख्य खेळांपैकीं आपल्या बायकोला झोडपणें हा एक करमणुकीचा खेळ होता. ह्या लोकप्रवादाला पुष्कळ रशियन वाक्प्रचारांनीं पुष्टीच मिळते.

रशियांतील पुष्कळ कुटुंबें महायुद्धामुळें व त्यानंतरच्या आपसांतील यादवीमुळें धुळीस मिळालीं. सोव्हिएट सरकारला सतत बदलणाऱ्या स्थितीला तोंड देणें भाग होतें. सोव्हिएट सरकारनें आपल्या अमलाच्या पहिल्या कालांत स्त्री-कामगार आणि लग्न-संस्था ह्यांविषयीं कायदे केले व तात्त्विक दृष्टीनें कां होईना, स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचा दर्जा दिला. हे कायदेकानू सामान्य जनतेची मनोवृत्ति बदलण्यांत जरी प्रभावशाली ठरले, तरी ते कागदोपत्रींच राहिले. राज्यक्रान्तीनंतर दोन वर्षांनीं केलेल्या भाषणांत लेनिन म्हणतो, "मजूरसरकारनें आपल्या अमदानींतील पूर्वकालांत स्त्रीविषयक कायद्यांत पूर्ण क्रान्ति घडवून आणली आहे. स्त्रियांना दास्यपंकांत लोटणाऱ्या कायद्यांची पुनर्रचना करण्याचा सोव्हिएट सरकारनें कसून प्रयत्न केलेला आहे........ यत्किंचित् अतिशयोक्ति न करतां आपणांस आतां मोठ्या अभिमानानें म्हणतां येईल कीं, जर कोठें स्त्रियांना पूर्ण समानहक्क दिले गेले असतील व सामान्य जीवनक्रमांत विशेष बोचणारी मानहानिकारक स्थिति स्त्रियांची जर कोठें नसेल तर ती फक्त सोव्हिएट रशियामध्येंच.

हें आपलें पहिलें व अतिशय महत्त्वाचें काम होतें.......नुसते कायदे करणें पुरेंसें नाहीं हें अगदीं खरें आहे; व आम्हीही नुसत्या हुकूम-नाम्यावरच संतुष्ट राहणार नाहीं.......पुढारलेल्या राष्ट्रांच्या दृष्टीनेंही सोव्हिएट रशियांतील स्त्रीविषयक कायदे नमुनेदार आहेत. पण ही केवळ प्रथमावस्था आहे असेंच आम्ही गृहीत धरून चालणार."

सर्वसामान्य मजूरविषयक कायदे स्त्री-कामगारांना विशेष फायद्याचे होते. शिवाय खास स्त्री-संरक्षक कायदे होते ते निराळेच. सामान्य ठरावांपैकीं निर्देश करण्याजोगे पुढील ठराव होत. दिवसाचे आठ तास काम—आतां तर तें सात तासांवर आणण्याचें ठरत आहे—वार्षिक सुट्या, आयुष्याचा विमा, दीर्घ कालाच्या नोकरीबद्दल बैठा पगार, विश्रांतिगृहें, आजारी पडलेल्या मजुरांकरितां आरोग्यभुवनांची सोय, चवदा वर्षांखालील मुलांना मजुरीची बंदी, चवदा वर्षांपासून सोळापर्यंत शिक्षण म्हणून कामगारांच्या मुलांना दररोज चार तास काम, व सोळा ते अठरापर्यंत सहा तास काम वगैरे. हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, कारखान्यांतील कामगारसमित्या व व्यापारीसंघ ह्यांच्या हातीं मजुरांची स्थिति सुधारण्याला बरीच सत्ता आहे. सामान्य स्त्रिया व मातृपदारूढ स्त्रिया ह्यांचें संरक्षण करणार खास कायदे खालील होत:—

[१] जेथें शिशाची भुकटी मजुरांच्या डोळ्यांत जाण्याचा संभव आहे अशा रासायनिक व इतर अवघड आणि धोक्याच्या कारखान्यांत स्त्रिया व अठरा वर्षांखालील मुलें ह्यांस मजुरीवर घेण्यास प्रतिबंध आहे.

[२] कारखान्यांत काम करणाऱ्या स्त्रियांना व इतर मजूर स्त्रियांपैकीं ज्यांच्यावर कामाचा विशेष ताण पडतो त्यांना मातृत्वाबाबत चार महिन्यांची रजा देण्यांत येईल. इतर मजूर स्त्रियांना तीन महिन्यांची रजा मिळेल.

[३] रात्रपाळी व जादा काम करण्याची गर्भवती स्त्रियांस बंदी आहे.

[४] गर्भवती स्त्रीला तिच्या संमतीवांचून नेहमींच्या कामाच्या जागेव्यतिरिक्त दुसरीकडे पाठविण्यास मनाई आहे.

[५] अंगावर मूल असलेल्या मातांच्या नेहमींच्या मधल्या सुट्टीखेरीज, निदान दर साडेतीन तासांनीं अर्धा तास किंवा जास्तच जादा सुट्टी मिळावी व तिचा मजुरीच्या तासांतच समावेश करून त्यांना मजुरी द्यावी.

गर्भवती स्त्रियांना जादा सवलती दिल्यामुळें कारखान्याचे मालक कारणाविना करार मोडावयास तयार होतील ह्या भीतीनें कायद्यांत अशी एक शर्त घातली आहे कीं, मजूर–निरीक्षकाच्या संमतीशिवाय गर्भवती स्त्रीला एकाएकीं कामावरून काढून टाकतां येणार नाहीं.

ज्या मजूरस्त्रिया काम सोडून जाण्याइतक्या आजारी नाहींत, पण ज्यांना निगेची व पथ्यकर आहारयोजनेची आवश्यकता आहे अशांकरितां 'नाइट सॅनेटोरिया' नांवाची रात्रीचीं आरोग्यभुवनें आहेत. काम संपल्यावर त्या तेथें जातात व रात्र आणि सुट्टीचा वेळ तेथेंच घालवतात.

उद्योगधंद्यांत पडलेल्या स्त्रियांची संख्या, पुरुषांच्या इतकी झपाट्यानें नसली तरी, सारखी वाढतच आहे; व बहुतेक सर्व प्रकारच्या कामावर त्यांना मजुरांवर घेण्याची प्रवृत्ति आहे; पण हल्लीं हल्लीं ह्याविरुद्ध प्रतिक्रिया सुरू असून मालकाच्या असेंही नजरेस आणलें गेलें आहे कीं, शारीरिकदृष्ट्या ज्या प्रकारच्या कामाला स्त्रिया अपात्र आहेत तीं कामेंसुद्धां त्यांस करावयास लावणें असा 'स्त्रियांकरितां समान हक्क' याचा मुळींच अर्थ होत नाहीं.

सोव्हिएट संघांत उच्च हुद्दयावर स्त्रियाच आहेत. सर्व जगांत पहिली स्त्री-प्रतिनिधि कोलोंटे नांवाची रशियन बाईच होय. सन १९२६ सालीं R. S. F. S. R. व यूक्रेनमधील खेडेगांवांचे संघांत एक लाख स्त्रिया

निवडल्या गेल्या व १६९ शेतकरी स्त्रिया लहान लहान सोव्हिएटच्या विराट् सभेमध्यें सभासद होत्या. मागासलेल्या सैबेरियामध्यें खेडे-गांवच्या सोव्हिएटमध्यें ८००० स्त्री-सभासद आहेत व त्यांपैकीं ४५ आपापल्या सोव्हिएटच्या अध्यक्ष आहेत. जमिनीवर स्त्रियांना समान हक्क आहे. कुटुंबाच्या मुख्य म्हणून शेतीवर राबणाऱ्या दहा लक्ष स्त्रिया आहेत.

'जेनोटडेल' नांवाचें कम्युनिस्टपक्षाचें खास स्त्रियांकरितां एक खातें आहे, त्यामार्फतच स्त्रियांचे शिक्षणाची व हक्क संपादनाची जोराची चळवळ चालू आहे. हें जेनोटडेलच कित्येक नियतकालिकें प्रसिद्ध करतें व आरोग्यशास्त्र, शिशु-संगोपन, सहकार्य, राजकारण व ह्या-सारख्याच इतर विषयांवर व्याख्यानांची व्यवस्था करितें. मार्च महिन्या-ची ८ वी तारीख 'आंतरराष्ट्रीय स्त्री-दिन' म्हणून सर्व रशियाभर साजरी करतात.

लग्न-विषयक व काडीमोडीचे सोव्हिएटचे कायदे पूर्व रूढीला मुळींच अनुसरून नसून अगदीं भिन्न आहेत. सोव्हिएट सरकारला ज्या प्रश्नांना तोंड द्यावें लागले ते प्रश्न कांहीं अंशीं यूरोप व अमेरिका या राष्ट्रांपुढें उद्भवलेल्या प्रश्नांसारखेच होते; पण कांहीं अंशीं ते यादवीनंतरच्या कुटुंबसंस्थेचा सर्वसामान्य विध्वंस व कम्युनिस्टांचे काल्पनिक विचार ह्यांमुळेंच उपस्थित झाले. डेन्मार्क, टर्की वगैरे देशांत रशियाप्रमाणेंच लग्न-विषयक कायदे आहेत. व अमेरिकेंत तर मुदती-च्या लग्नाविषयीं जोराची चळवळ सुरू आहे; तेव्हां ह्या बाबतींत सोव्हिएट रशिया इतर देशांहून भिन्न नाहीं.

पण एका महत्त्वाच्या बाबींत रशिया भिन्न आहे. रूढी व पूर्वापार प्रघात ह्यांची तेथें मुळींच किंमत नाहीं; उलट आधुनिक रशियन माणसाला दास्याचें चिन्ह वाटणाऱ्या समाजरचनेशीं ह्या दोन गोष्टी

निगडित असल्यामुळें त्यांविरुद्ध जाण्याचीच जनप्रवृत्ति आहे. कम्युनिस्ट अमलाखालीं नमुनेदार लग्नसंस्था कोणती असावी हें सांगणें कठीण आहे, कारण तत्त्वाच्या प्रचारकांमध्येंच मतभेद आहे. त्यांच्यापैकीं पुष्कळ कुटुंबसंस्थेला मानणारे आहेत पण त्यांची कुटुंबाची कल्पना हल्लींच्याहून फार भिन्न आहे.

पहिल्या सोव्हिएटच्या लग्नविषयक कायद्यानें लग्नाला मुलकी संस्कार ठरविले. धार्मिक विधीला आडकाठी नव्हती, व पुष्कळ लोक, विशेषतः खेड्यांतील लोक, धार्मिक विधी करीत. पण विलक्षण वाटण्याजोगी गोष्ट ही कीं, ह्या मुलकी खात्यामार्फत होणाऱ्या लग्नांतसुद्धां तांबडे पेहेराव, शपथविधि, भाषणें वगैरे विधींचें जाळें माजलें. बहुपत्नीकत्वाला बंदी होती व दुसऱ्या लग्नाचे वेळीं पहिल्या लग्नाची गोष्ट गुप्त ठेवणें हा फौजदारी गुन्हा होत असे. परस्परसंमतीनें काडीमोडीला पूर्ण मुभा असे. लग्नानंतर समाईक मालकीचा प्रश्न उद्भवत नसे व पतिपत्नी एकमेकांच्या पोषणाला परस्पर जबाबदार असत. अनौरस संततीला औरस संततीइतकेच हक्क असत.

पतिपत्नीला कोणाचें तरी एकाचें सामान्य नामाभिधान करण्याची अगर आपापलीं नांवेंच ठेवण्याची परवानगी असे. चौदा वर्षांवरील मुलांस आपण बापाचें नांव लावायचें, कीं आईचें हें ठरविण्याची व आपलें नागरिकत्व आणि धर्म ठरविण्याची मोकळीक असे. आपलीं मुलें बाळगणें व त्यांचा संभाळ करणें हें मातापितरांवर बंधनकारक होतें. दत्तक घेण्यास मुळींच परवानगी नव्हती.

फक्त कांहीं बाबतींतच व तीसुद्धां कायदेशीर वारसांच्या बाजूचीच, मालमत्तेची मृत्युपत्रद्वारें विल्हेवाट करण्यास परवानगी आहे. सामान्यपणें बायकोस व आश्रित नातलगांस सारखाच हिस्सा मिळतो. सर्व कायदेशीर हक्कदारांच्या पालनपोषणास पुरेशी रक्कम नसल्यास, जे

जास्त गरजू त्यांचा रकमेवर पहिला हक्क. कायद्यानें पूर्वी स्त्रीस दहा-हजार रूबल्स (एक हजार पौंड)पेक्षां जास्त रकमेचें वारसदार होतांच येत नसे. उरलेली रक्कम सरकार-खजिन्यांत जमा होत असे. दोन वर्षांपूर्वीच हा कायदा बदलला व आतां वारसा अमर्यादित असूं शकतो; पण त्यावरील कर चढत्या प्रमाणानें वाढत जातो. पांच लक्ष रूबल्सपेक्षां जास्त रकमेवर शेंकडा ९० कर आहे.

कांहीं वर्षांमागें कुटुंबव्यवस्थेच्या कायद्याच्या अशा तऱ्हेच्या अटी होत्या. इ० सन १९२५ सालीं तो कायदा बदलण्याचे प्रयत्न झाले; पण त्या प्रयत्नांत यश न येऊन तें काम लांबणीवर पडलें. पुढें पुष्कळ दिवस सर्व रशियाभर सुचविलेल्या फेरबदलाविषयीं चर्चा झाली. सर्व देशभर अगणित सभा झाल्या व वर्तमानपत्रांतून भरपूर वादविवाद झाले. मोठमोठ्या कॉम्युनिस्टांनीं एकमेकांविरुद्ध बाजू घेऊन हडसून खडसून व कडाक्याची चर्चा केली. बहुधा शेतकरी शहरांतील लोकांपेक्षां जास्त पुराणप्रिय होते.

लग्नविषयक कायद्यांत फेरबदल सुचविण्याचें मुख्य कारण अजमासें एक लक्ष जोडपीं एकत्र रहात असूनसुद्धां त्यांनीं लग्नें नोंदविलीं नसल्यानें हीं लग्नें कायदेशीर करण्याची सूचना आली हें होय; पण तिला कसून विरोध झाला. नवरा अतिशय गरिबीमुळें बायकोचा संभाळ करण्यास असमर्थ असला तर सर्व कुटुंब तिच्या पोटगीबद्दल जबाबदार आहे. अशीं कांहीं बंधनकारक लग्नेंही विरोधाच्या कचाट्यांतून सुटलीं नाहींत. उलट स्त्रियांचीं मंडळें न नोंदविलेल्या लग्नांस मान्यता देण्याच्या बाजूचीं होतीं.

दीर्घ चर्चेनंतर इ० सन १९२६ सालच्या नोव्हेंबरांत नवीन विवाहविषयक कायदा पास झाला. याची घोषणा अशी—"लग्नाच्या नोंदणीची पद्धत अशासाठीं स्थापना करण्यांत येत आहे कीं,

व्यक्तिगत व मालमत्तेवरील हक्कांचें व बायकामुलांच्या हिताचें संरक्षण करणें सुलभ व्हावें....नोंदणी हा लग्नाचा निर्विवाद दाखला होय." अशा रीतीनें नोंदणी नुसती साक्षीभूत होती, लग्न नव्हे; आणि नोंद केल्याशिवाय विवाह होऊं शके, पण ती सिद्ध करणें जास्त कठीण जाई. नोंदविलेल्या व न नोंदविलेल्या जोडप्यांना कायद्यानें सारखेंच संरक्षण दिलें; पण दुसऱ्या बाबतींत खरोखरीची वैवाहिक स्थिति कोर्टांत साक्षीपुराव्यानें सिद्ध करावी लागे. न नोंदविलेल्या जोडप्याला पुनर्विवाह करतां येत नसे.

कायद्यानें बायकोच्या चरितार्थाचा बोजा तिच्या नवऱ्याच्या कुटुंबावर पडला; पण तो त्याच्या वांट्याच्या प्रमाणांतच. काडीमोड जास्त सुलभ होऊन एका पक्षाला दुसऱ्या पक्षाच्या संमतीशिवाय काडीमोडीची मागणी करतां येऊं लागली. जरी काडीमोड स्त्रीची झाली तरी तिची वार्षिक सरासरी दर दहा हजार लोकसंख्येमागें अकरा इतकीच भरे, असें दाखविण्यांत आलें. काडीमोड इतकी सुकर नसलेल्या दुसऱ्या पुष्कळ देशांपेक्षां ही रशियांतील सरासरी कमी आहे असें सांगतात. असेंही सांगण्यांत आलें कीं, या नव्या कायद्यानें वरवर जरी लग्नसंबंधावरील नियंत्रण दूर केलें असलें, तरी वस्तुतः प्रत्येक संबंधावर महत्त्वाची जबाबदारी लादून एकपत्नीत्वाच्याच चालीचा भरभक्कम पाया घालण्यास या कायद्यानें मदत केली.

नव्या कायद्यानें दत्तक घेण्यास मोकळीक झाली. दत्तकाचा प्रतिबंध करणारा जुना कायदा यशस्वी झाला नाहीं. तरुण अनाथ मुलांची फार मोठी संख्या होती व त्यांचा कुणीच त्राता नव्हता. शेतकरी अशा अनाथ मुलांस आश्रय देऊन पोटच्या मुलांप्रमाणें त्यांस वागवूं लागले.

कायदेशीर विवाहकाल मुलींच्या बाबतींत प्रथम सोळा वर्षें होता व

मुलांच्या बाबतींत अठरा वर्षें होता; पण पुष्कळ अंशीं स्त्रियांच्याच अत्याग्रहानें, स्त्रियांचा विवाहकाळहि अठरा वर्षें करण्यांत आला.

हा विवाहविषयक कायदा R. S. F. S. R. ला लागू आहे. सोव्हिएट संघाच्या बाकीच्या रिपब्लिकांत थोडया फेरफारानें हा कायदा लागू आहे. उदाहरणार्थ, श्वेत-रशियांत ( White Russia ) फक्त नोंदविलेलीं लग्नेंच कायदेशीर समजलीं जातात.

एकाद्या गोष्टीमधून नीतितात्पर्य काढणें मोठें बिकट आहे; कारण रूढ नीतिशास्त्राच्या कल्पना पिढीगणिक व देशागणिक बदलत जातात. रशियामध्यें तर संकेतीभूत नीतिकल्पनांना चांगलीच कलाटणी मिळाली आहे. गृहस्थाश्रमांतील एकपत्नीव्रताला क्षुल्लक बाब म्हणून गणणारे पुष्कळ लोक तेथें आहेत; पण त्याबरोबरच असेही पुष्कळ लोक तेथें आहेत कीं, जे कर्मठ म्हणून प्रसिद्ध आहेत व ज्यांनीं सर्व तऱ्हेच्या व्यभिचाराविरुद्ध सतत लढा चालू ठेवला आहे. ह्या चळवळीचा नेता एक विद्वान् प्रोफेसर आहे. त्यानें असा निर्बंधच घातला आहे कीं, ब्रह्मचर्य हेंच विधिरूप असावें व प्रजोत्पादनाकरितांच संभोगक्रिया आचरिली जावी. तो संततिनियमनाच्या फार विरुद्ध आहे; एवढेंच नव्हे तर सरकारसुद्धां विरुद्धच आहे; एवढ्याचकरितां कीं, रशियामध्यें प्रजासमृद्धि व्हावी, संततिनियमनांत कांहीं आक्षेपार्ह आहे म्हणून नव्हे.

एका बाजूला शिथिल नैतिक बंधनांचें प्रतिपादन व दुसऱ्या बाजूला बेहद्द कर्मठपणा, कीं ज्याला नुसतें हस्तांदोलन किंवा कोणत्याही प्रकारचा हास्यविनोद सहन होत नाहीं. अशा ह्या दोन अतिरिक्त प्रवृत्तींबद्दल लेनिन, बुखारिन, लुनकार्स्की व इतर कॉम्युनिस्ट पक्षाचे सुप्रसिद्ध पुढारी ह्यांनीं मोठी चिंता प्रदर्शित केली आहे; कारण 'अति सर्वत्र वर्जयेत्' या पंथाचे ते आहेत. संयमनावर त्यांचा

विशेष कटाक्ष आहे व यथेच्छ संभोग, मनमुराद मदिरापान आणि धूम्रपान यांचा त्यांनीं तीव्र निषेध केला आहे.

इ० सन १९२० सालीं क्लारा झेट्किनबरोबर झालेल्या मुलाखतींत लेनिननें ह्या बाबीविषयीं चर्चा केली. तो म्हणाला कीं, 'धास्तीमुळें मला उघड बोलल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. आपल्या पुढील पिढीविषयीं मला फार काळजी वाटत आहे. ती पिढी क्रान्तीचा एक भाग असून क्रान्तीशीं समरस झालेली आहे. आणि कांहीं निरुपयोगी वनस्पतींच्या झपाट्यानें वाढणाऱ्या मुळांप्रमाणें जर समाजांतील मध्यम-वर्गाच्या हलक्या वणिग्वृत्तीचा क्रान्तिकारक समाजांत प्रादुर्भाव झाला, तर वेळींच तिचा प्रतिकार करणें रास्त आहे.' पुढें लेनिन म्हणतो, 'वैवाहिक जीवनाच्या प्रश्नांविषयीं तरुणांचा बदललेला दृष्टिकोण अर्थात् तत्त्वाच्या पायावर उभारलेला व तर्काधिष्ठितच आहे. पुष्कळजण आपणांस क्रान्तिकारक आणि कॉम्युनिस्ट पक्षाचे म्हणवतात व तसें त्यांना मनापासून वाटतेंही; पण मला त्याचें विशेष महत्त्व वाटत नाहीं. जरी मी इतरांपेक्षां कमी उदासीन आणि कमी विरक्त असलों तरी मला तरुणांचें व पुष्कळ वेळां वृद्धांचेंही 'नूतन वैवाहिक जीवन' अगदीं हलक्या प्रतीचें वाटतें, नीच वेश्यावृत्तीचाच एक प्रकार म्हणाना" कामविकारतृप्ति जलपानक्रियेइतकी अकृत्रिम व साहजिक असावी ह्या विचारसरणीला उद्देशून लेनिन म्हणतो, "अलबत् तहान भागविलीच पाहिजे; पण असा विचार करा कीं, सामान्य मनुष्य स्वाभाविक स्थितीमध्यें भर रस्त्यावर पडून गटारघाण पिईल का? किंवा दुसरे कित्येक लोक ज्यांतून प्यायले आहेत अशा भांड्यांतून तरी पिईल का? पण ह्याहून जास्त महत्त्वाचें ह्या प्रश्नाचें सामाजिक स्वरूप होय. पाणी पिण्यांत एकाच व्यक्तीचा संबंध येतो; पण संभोगांत दोन माणसांचा संबंध येतो व त्यापासून तिसरा नवीन

जीव निर्माण होतो. आणि येथेंच सामाजिक हिताचा प्रश्न येत असल्यामुळें समुदायाविषयींच्या कर्तव्याचा विचार करणें भाग पडतें.

“सर्वांनीं संन्यास घेऊन जंगलांत जावें असा मला क्षणभरही उपदेश करावयाचा नाहीं. संपूर्ण प्रेममय जीवनानें येणारा उत्साह व जीवितसौख्य कॉम्युनिझम्च्या प्रसारानें मिळतील अशी माझी खात्री आहे. हल्लीं कित्येकदां दिसून येणाऱ्या संभोगसुखाच्या अतिरेकानें, जीवितानंद आणि उत्साह ह्या गोष्टी न मिळतां, उलट त्या दूरच पळतील असें माझें मत आहे. क्रान्तीच्या काळांत ही गोष्ट तर फारच वाईट आहे.

तरण्याताठ्या माणसाला जर करमणुकीची गरज असेल तर ती आरोग्य-प्रद खेळ, पोहणें, सफरी, सर्व तऱ्हेचा व्यायाम व अध्ययन, सत्यान्वेषण, शास्त्रीय शोध वगैरेच्या द्वारे मनोविनोद या गोष्टींची. शरीर सुखी तर मन सुखी. आम्हांला नुसते संन्याशी नकोत, नुसते धर्मलंड बदफैली लोक नकोत, व ऐहिक सुखोपभोगापलीकडे न पहाणारे अडाणी लोक तर त्याहून नकोत. आम्हांला फक्त या सर्वांचा सुवर्णमध्य गांठणारे लोक हवेत.”

लेनिनच्या मनांत डांचणाऱ्या या विकृत प्रवृत्तींचा प्रतिकार करण्याकरितां संभोगातिरेकाचे दुष्परिणाम व उपदंशविकार ह्याविषयीं माहिती देऊन जारीचा प्रसार केला जात आहे. उघडया हवेंतील खेळ आणि शारीरिक शिक्षण ह्याविषयींच्या चळवळीला प्रोत्साहन दिलें जात आहे व ती जोरानें पसरतही आहे. वेश्याव्यवसायाचा सुद्धां जोरानें प्रतिकार केला जात आहे. कॉम्युनिस्ट पक्षाचा असा एक नियम आहे कीं, वेश्यासंबंध असलेल्या या पक्षाच्या कोणाही सभा-सदाला पक्षांतून काढलें जाईल.

पण व्याख्यानें व मतप्रसार या योजनांपेक्षां सुद्धां जीवनक्रमांत निर्माण

झालेल्या नव्या स्थित्यंतरानेंच लोकांचे मनांत संयमनाचें महत्त्व बाणेल व तें जीवनांतील दुसऱ्या हितकर गोष्टींकडे वेधेल अशी आशा वाटत आहे. व्यभिचार आणि संभोगेच्छा बैठ्या धनिक वर्गांतच जास्ती फैलावतात, कारण त्या वर्गाला करावयाला असें कांहींच नसतें व कंटाळा आणि ग्लानि यांच्या शमनार्थ तो कामतृप्तीकडे धांव घेतो. आणि हा रिकामटेकडा वर्गच नांवाजण्याइतका व मान देण्याइतका आदर्शभूत मानला गेल्यामुळें, खालचे इतर वर्ग ह्याचेंच हुबेहुब अनुकरण करतात. रशियामध्यें हा वर्ग नामशेष झालेला आहे आणि स्वतःचें कामधाम व इतर उद्योगधंदे ह्यांव्यतिरिक्त दुसरीकडे लक्ष देण्यास फारच थोडया लोकांना वेळ सांपडतो.

मॉस्कोमध्यें नदीतीरावर भव्य 'मातामंदिर' (Palace of Mother-hood) वसलें आहे. त्यांत माता व मुलें यांच्या आरोग्य-विषयक सर्व बाबींचें प्रदर्शन भरवलें आहे. तेथें निरनिराळ्या रोगांचा व मृत्युसंख्येचा प्रतिकार करण्याकरितां शोध सुरू आहेत व तेथूनच डॉक्टर, सुइणी व दाया शिकून बाहेर पाठविल्या जातात. सुंदर सुंदर रंगीत चित्रें व जाहिराती या मातृ-मंदिराचा संदेश दूरवरच्या खेड्यांना पोंचवून मातांना योग्य रीतीनें कसें वागवावें हें पुरुषांना शिकवितात. शिशुसंगोपन कसें करावें हें मातांना शिकवितात व घर आनंदी आणि स्वच्छ कसें ठेवावें व सुदृढ प्रजा कशी निर्माण करावी हें आईबापांना शिकवितात. आईनें स्वतःचे मुलाला स्वतःचेच अंगावर पाजावें ह्या-वर त्यांचा विशेष कटाक्ष आहे. एका जाहिरातींत असें दाखविलें आहे कीं, एक वासरू बाटलींतून दूध पिणाऱ्या एका बालकाकडे निंदाव्यंजक दृष्टीनें पाहून त्याला म्हणतें 'कां रे तूं माझ्या आईचें दूध पितोस ?'

मातृखातें व शिशुखातें (Department of Mother-hood and

Infancy) मातांच्या व बालकांच्या सर्व बाबींविषयीं जबाबदार आहे. त्या खात्यामार्फतच खेड्यापाड्यांतून हजारों दिवसपाळीचीं बालगृहें चालविलीं जात आहेत. १९२६ सालीं शेतकऱ्यांनीं आपापल्या संघांतून ह्या बालगृहांकरितां ६९००० रूबल्स् मदतीदाखल दिले. शेतकऱ्यांना जसजशी बालगृहांची माहिती होत जाते आणि त्यांचे फायदे कळूं लागतात तसतशी त्यांची संख्या झपाट्यानें वाढतच जाते.

पण सोव्हिएटसंघाचें क्षेत्र इतकें अफाट आहे कीं, ह्या सर्व स्थित्यंतराचा व सुधारणेचा नुसत्या कडेकडेलाच पुसट स्पर्श झालेला आहे. कुठेंहि गेलें 'तरी पळसाला पानें तीनच'. ह्या न्यायानें पुष्कळ स्त्री-पुरुष पुराणप्रिय असून आधुनिक अपूर्व कल्पनांविषयीं साशंक आहेत. अशी जरी स्थिति आहे तरी आधुनिक व्यवस्थेच्या रोपट्यानें जुन्या जमिनींत चांगलेंच मूळ धरलें आहे व जेथें आतांपर्यंत स्त्रियांच्या कपाळीं गोषांतील बंदिवास होता अशा तुर्कस्तान्, याकुटस्क् व अझेरबेजान या देशांतून लोकसत्ताक राज्यसभांतून स्त्रिया पुरुषांशीं खांदेघस करूं लागल्या आहेत.

प्रकरण सोळावें

# रशिया व हिंदुस्थान

ह्या लेखांतून आधुनिक रशियाच्या कांहीं अंगांचेंच प्रतिपादन करण्याचा मीं प्रयत्न केला आहे व तोही अगदीं वरवरचाच आहे; कारण मी रशियाविषयीं खास माहितगार आहें असें मी मुळींच म्हणत नाहीं. अतिशय हृदयंगम असे अनेक विषय मीं अजीबात विचारांत घेतले नाहींत. सोव्हिएट संघांत कम्युनिझम्‌चें तीव्र स्वरूप तसेंच अक्षय टिकेल कां लगतच्या देशांशीं विशेष सुसंगत अशी राज्यपद्धति हळुहळू अंमलांत येईल, वगैरे तऱ्हेचें सोव्हिएट संघाचें भविष्य वर्तविण्याचा मीं मुळींच बहाणा केला नाहीं.

"रशियन राज्यक्रान्तीची जर कोणती ठळक कामगिरी असेल तर ती ही कीं, रशियानें नूतन राज्यपद्धति अंमलांत आणून थोड्याच दिवसांत प्रागतिक राष्ट्रांनाही मागें टाकलें आहे. पण ह्यावरच निभावलें नाहीं. ह्या झगड्यांत दुसरी तोडच नाहीं. एक तर हा लढा निष्फळ ठरेल किंवा आर्थिकदृष्ट्याही प्रागतिक राष्ट्रांना मागें टाकील........ एक तर रशियाला इतर राष्ट्रांसमोर दातीं तृण धरून गेलें पाहिजे किंवा भरवेगानें सर्व राष्ट्रांच्या पुढें सरकलें पाहिजे. इतिहासानें हें असें कोडें टाकलें आहे." हे शब्द लेनिननें राज्यक्रान्तीनंतर लगेच लिहिले आहेत. लढा निःसंशय चालूच आहे; पण कम्युनिझम्‌च्या तीव्र स्वरूपाचे दिवस संपले आहेत व राजनीतीच्या सौम्य उपायांचा अधिकाधिक अवलंब केला जात आहे. समाज उच्च-नीच वर्गरहित करण्याची कॉम्युनिस्टांची इच्छा असूनसुद्धां सोव्हिएट संघांत पहावें तों नवीन वर्गवारी केली जात आहे, असा कांहीं लोकांचा आक्षेप आहे. भविष्यकाळांत काय होणार आहे, हा प्रश्न आपण बाजूला ठेवूं.

पण आज असें म्हणतां येईल कीं, कांहीं क्षुल्लक फेरबदल वगळल्यास ह्या रशियांत चाललेल्या झगड्याला मध्यें तोडच नाहीं. लेनिन म्हणतो त्याप्रमाणें एक तर रशिया नामशेष होईल किंवा भरवेगानें सर्व राष्ट्रांच्या पुढें जाईल, ह्याशिवाय तिसरा मार्गच नाहीं. आज दहा वर्षांनीं हेंच दिसतें कीं, रशिया नामशेष व्हावयास नाकबूल आहे.

जगांतील घडामोडी, राजकारण, अर्थशास्त्र व इतिहास, यांच्या अभ्यासकाला मोहून टाकणारे हे व असे अनेक प्रश्न आहेत. १९१७ च्या क्रांतीनें जी लाट उसळली तिचा भर अजून कमी झालेला नाहीं; उलट तिनें ऐतिहासिक स्थित्यंतर घडवून आणलें व पुढेंहि आणील आणि त्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. आपणां हिंदवासीयांना तर त्यांविषयीं उदासीन राहणें मुळींच शक्य नाहीं. आशिया व यूरोपच्या अर्ध्या भागावर अस्ताव्यस्त पसरलेला हा राक्षसी रशिया आपला शेजारी आहे, व अशा दोन शेजाऱ्यांत एकतर सख्य असूं शकेल किंवा वैर तरी असूं शकेल. उदासीनवृत्ति असण्याचें तर नांवच नको.

रशियाविषयीं द्वेषभावाची परंपरा इंग्लंडनें मोठ्या दक्षतेनें जोपासलेली आहे व त्या परंपरेंत वाढलेले आपण हिंदवासी लोक आहोंत. आज कित्येक वर्षें रशियाच्या स्वारीचा बागुलबोवा दाखवून आपल्या लष्करखात्यावरील अफाट खर्चाचें तें एक निमित्त म्हणून पुढें करण्यांत येत आहे. झारच्या अमदानींत आपणांस असें सांगण्यांत येत असे कीं, 'पहा ! रशियाची साम्राज्यतृष्णा कशी सारखी दक्षिणेकडे फोंफावत आहे. एकतर ती समुद्रावर वाव शोधीत असेल किंवा कदाचित् हिंदुस्थानवरच खिळली असेल, कोणीं सांगावें ?' झारशाही तर पार नष्ट झाली आहे; पण रशिया व इंग्लंडमधील चुरस सुरू आहे आणि आपणांस आतां असें सांगण्यांत येतें कीं, हिंदुस्थानाला जर कशापासून धोका असेल तर तो सोव्हिएट सरकारपासूनच.

प्रकरण सोळावें

# रशिया व हिंदुस्थान

ह्या लेखांतून आधुनिक रशियाच्या कांहीं अंगांचेंच प्रतिपादन करण्याचा मीं प्रयत्न केला आहे व तोही अगदीं वरवरचाच आहे; कारण मी रशियाविषयीं खास माहितगार आहें असें मी मुळींच म्हणत नाहीं. अतिशय हृदयंगम असे अनेक विषय मीं अजीबात विचारांत घेतले नाहींत. सोव्हिएट संघांत कम्युनिझमूचें तीव्र स्वरूप तसेंच अक्षय टिकेल कां लगतच्या देशांशीं विशेष सुसंगत अशी राज्यपद्धति हळुहळू अंमलांत येईल, वगैरे तऱ्हेचें सोव्हिएट संघाचें भविष्य वर्तविण्याचा मीं मुळींच बहाणा केला नाहीं.

" रशियन राज्यक्रान्तीची जर कोणती ठळक कामगिरी असेल तर ती ही कीं, रशियानें नूतन राज्यपद्धति अंमलांत आणून थोडयाच दिवसांत प्रागतिक राष्ट्रांनाही मागें टाकलें आहे. पण ह्यावरच निभावलें नाहीं. ह्या झगडयांत दुसरी तोडच नाहीं. एक तर हा लढा निष्फळ ठरेल किंवा आर्थिकदृष्टयाही प्रागतिक राष्ट्रांना मागें टाकील........ एक तर रशियाला इतर राष्ट्रांसमोर दातीं तृण धरून गेलें पाहिजे किंवा भरवेगानें सर्व राष्ट्रांच्या पुढें सरकलें पाहिजे. इतिहासानें हें असें कोडें टाकलें आहे." हे शब्द लेनिननें राज्यक्रान्तीनंतर लगेच लिहिले आहेत. लढा निःसंशय चालूच आहे; पण कम्युनिझमूच्या तीव्र स्वरूपाचे दिवस संपले आहेत व राजनीतीच्या सौम्य उपायांचा अधिकाधिक अवलंब केला जात आहे. समाज उच्च-नीच वर्गरहित करण्याची कॉम्युनिस्टांची इच्छा असूनसुद्धां सोव्हिएट संघांत पहावें तों नवीन वर्गवारी केली जात आहे, असा कांहीं लोकांचा आक्षेप आहे. भविष्यकाळांत काय होणार आहे, हा प्रश्न आपण बाजूला ठेवूं.

आपला संताप गिळून यशस्वी रीतीनें युद्ध टाळलें आहे. आधुनिक इतिहासानंतर अभ्यासकाला अगदीं उघड दिसतें आहे कीं, रशिया लढाईला मुळींच उत्सुक नाहीं.

उलट इंग्लंडकडे पहावें तों युद्धाची तयारी मोठ्या गाजावाजानें चालली आहे व आरमारनियंत्रणाच्या परिणामकारक योजनेला किंवा सत्तींच्या मध्यस्थीला इंग्लंडनें पाठ फिरविली आहे. राष्ट्रसंघांत इंग्लंडनें आपली वृत्ति अशी ठेवली आहे कीं, असल्या सर्व योजनांना कोणाचीही भीड न ठेवतां पूर्ण विरोध करून फेंटाळून लावावयाचें. असल्या योजनेमध्यें आपलें साम्राज्य अंतर्भूत व्हावें अगर आपलें साम्राज्यविषयक धोरण कोणत्याही तऱ्हेनें बाधित व्हावें हें इंग्लंडला मुळींच खपणार नाहीं. साम्राज्यावरील आपली मगरमिठी थोडीसुद्धां ढिली न सोडण्याचा व जगांत शांतता प्रस्थापित करण्याकरितां सुद्धां आपलें साम्राज्यतृष्णेचें धोरण न बदलण्याचा आपला निश्चय इंग्लंडनें थोड्याच दिवसांपूर्वीं दुसऱ्या एका उदाहरणानें जाहीर केला आहे. अमेरिकन संयुक्त संघाच्या युद्धबहिष्काराच्या योजनेला इंग्लंडनें दिलेलें उत्तर कितीही शर्करावगुंठित असलें तरी तें कटुतम आहे इतकेंच नव्हे तर दुराग्रही आहे, हटवादीपणाचें आहे. त्या उत्तराचा इत्यर्थ हा कीं, शांतता प्रस्थापित करण्याच्या कोणत्याही योजनेला मान्यता देण्यास इंग्लंड तयार आहे पण आपलें साम्राज्यविषयक धोरण आणि तत्प्रीत्यर्थ साहसी कृत्यें यांकरितां लढाई करण्याचा आपला हक्क अबाधित ठेवूनच इंग्लंड संमति देईल! किती विचित्र मान्यता ही! अमेरिकेला पाठविलेल्या ब्रिटिश खलित्यांत पुढीलप्रमाणें शब्द आहेत:

'जगांत असे कांहीं प्रदेश आहेत कीं, ज्यांच्या सुबत्तेवर व संपूर्णतेवरच आमची शांतता व सुरक्षितता अवलंबून आहे. ब्रिटिश सरकारनें पूर्वींपासूनच हें अगदीं स्पष्ट केलें आहे कीं, ह्या प्रदेशांत

कोणीं ढवळाढवळ केल्यास ती ब्रिटिशसरकारला खपणार नाहीं. त्या प्रदेशांचें परचक्रापासून संरक्षण हें ब्रिटिश साम्राज्याच्या स्वसंरक्षणाचें एक साधन आहे. हें अगदीं निःशंकपणें समजावें कीं, ब्रिटिशसरकारनें नंवा तह अशा उघड अटीवर मान्य केला आहे कीं, या बाबतींत स्वतंत्रतेनें कार्यदिशा ठरविण्यांत कोणत्याही तऱ्हेचा अडथळा येऊं नये.

ह्याचा सरळ अर्थ असा कीं, जेव्हां व जेथें त्यांची इच्छा असेल तेथें लढाई करण्याची ब्रिटिशसरकारनें पूर्ण स्वतंत्रता राखून ठेवली आहे. पण एवढ्यानेंच तृप्ति न होतां कीं काय, त्या खलित्यांत दुसरी एक अट आहे. त्यांतील सूचना अशी कीं, नवा तह सर्वत्र लागू नसावा, 'कारण असे कांहीं देश आहेत कीं, ज्यांच्या मंत्रि-मंडळाला अजून सार्वत्रिक मान्यता मिळाली नाहीं.' ज्या सरकारला सार्वत्रिक मान्यता मिळाली नाहीं असें सोव्हिएट सरकारच होय, हें लहान पोरही सांगू शकेल. अशा तऱ्हेनें इंग्लंडनें निरनिराळ्या अटी व मर्यादा घालून, अमेरिकन खलित्यांत म्हटल्याप्रमाणें 'बिनशर्त युद्ध-संन्यासा'च्या नव्या तहाची सार्थकता नष्ट करून प्रत्यक्ष रशियाविरुद्ध लढाईचा मार्ग मोकळा ठेविला. ह्या अटींचा व ह्या अपवादाचा स्पष्टपणा थोडासा आश्चर्य-कारक असला तरी त्या अटी ब्रिटिशांच्या नेहमींच्या धोरणाला अनु-सरूनच आहेत. ह्या धोरणाचें मूलतत्त्व असें आहे कीं, या करारांनीं व तहांनीं रशियाला पक्कें घेरून मग शेवटीं त्याला चिरडून टाकावयाचें. हा हेतु सफल व्हावा म्हणून इंग्लंडनें अविरत प्रयत्न केले आहेत; व राष्ट्र-संघाला तर आपल्या हातांतलें बाहुलें करून त्याच्या साह्यानें आपलें धोरण पुढें चेपणार. लोकार्नोचा तह तरी याच धोरणाचें फल होय; व इंग्लंड आणि जर्मनी ह्यांच्यांतील प्रासंगिक पण नांवाचेच तह रशियाला वाळींत टाकण्याच्या हेतूनेंच करण्यांत येतात. ब्रिटिश पर-राष्ट्रीय खात्याचा पुढारी जो 'ऑगर' त्यानें नुकत्याच लिहिलेल्या

पुस्तकांत स्पष्टपणें सांगितलें आहे कीं, राष्ट्र-संघाची वाढ व लोकार्नो-च्या तहाचा आशय हीं बोल्शेविझम्‌चा प्रतिरोध करण्याचीच इच्छा दर्शवितात. पुढें तो म्हणतो, 'हल्लींच्या ब्रिटिशसरकारच्या करडेपणानें-च सोव्हिएट संघाविरुद्ध संयुक्त यूरोपीय राष्ट्रांची भिंत उभारली गेली आहे.'

तेव्हां ब्रिटिश मुत्सद्यांच्या सरकारी खलित्यांनीं व धोरणानें हें स्पष्टच झालें आहे कीं, त्यांना रशियाविरुद्ध लढाई करण्याची तीव्र इच्छा असून, त्याची ते तयारीही करीत असून युद्धाला आव्हान देण्याची संधीच ते पहात आहेत. दुसरीं पुष्कळ भांडवलवालीं राष्ट्रें सोव्हिएट रशियाच्या सामाजिक तत्त्वविचाराच्या व आचाराच्या विरुद्ध आहेत; पण त्यांचें रशियाशीं विशेष राजकीय वैर नाहीं. हल्लींचें ब्रिटिश सरकार मात्र ताठरपणानें व मदांधतेनें रशियाला वेढून जमिनदोस्त करूं पहात आहे. हेंहि तितकेंच खरें कीं, जरी रशियाला मनापासून लढाईसारखा कुप्रसंग टाळावयाचा असला तरी भावी संकटांना भिऊन युद्धाची तयारी करणें प्राप्त आहे. कारण जें स्वातंत्र्य महत्प्रयासानें व अपूर्व स्वार्थत्यागानें रशियानें मिळविलें तें तो सहजासहजीं हातचें कां गमावील ?


हल्लींच्या परिस्थितीमध्यें तरी निदान बरेच दिवसपर्यंत रशिया हिंदु-स्थानावर स्वारी करील हें अगदीं असंभवनीय होय. रशियाला साम्राज्य-तृष्णा नाहीं व जरी असली तरी ह्या परिस्थितींत साम्राज्याचा विस्तार करणें म्हणजे रशियानें गळ्यांत धोंड बांधून घेण्यासारखेंच आहे. अजूनपर्यंत रशिया मुख्यत्वेंकरून शेतकीप्रधान देश असून आपल्या उद्योगधंद्यांची वाढ कशी होईल ह्या प्रयत्नांत तो आहे; व ह्याकरितां रशियाला भांडवलवाले व तज्ज्ञ लोक यांची गरज विशेष. पण ह्यांपैकीं एकही गोष्ट हिंदुस्थानांत मिळणें कठीण. रशियांत कच्चा मालच

विपुल तयार होतो व तोच परदेशांत पाठवून हलक्या किंमतीला विकला जातो. पक्का माल मुळींच पाठविला जात नाहीं. तीच स्थिति हिंदुस्थानाची. दोन्ही देशांत इतकें निकट सादृश्य आहे कीं, त्यांना एकमेकांवर मात करणेंच शक्य नाहीं. म्हणून हिंदुस्थानाकडे लोभी दृष्टीनें पाहावयास रशियाला आर्थिक हेतूच नाहीं.

सामान्यत: दोन्ही देशांनीं शेजारधर्मानें वागावें व भांडणतंटयाचे प्रसंग शक्य तोंवर टाळावे. अव्याहत लढा जो चालू आहे तो इंग्लंड व रशियामध्यें; हिंदुस्थान आणि रशियामध्यें नव्हे. मग आम्ही हिंदुस्थानवासीयांनीं इंग्लंडच्या रशियाविरुद्ध परंपरागत स्पर्धेचें कोणच्या कारणास्तव वारसदार व्हावयाचें? याला कारण म्हणजे एकच. ब्रिटिशांची साम्राज्याची हांव. पण आमचें खरें हित ह्या साम्राज्यतृष्णेला बळी न पडतां, पाठिंबा न देतां तिला नष्ट करून टाकण्यांतच आहे.

रशियाची दहशत हिंदवासीयांना पिढयान्‌पिढया घातली जात आहे. व ही भीति समूळ नष्ट करणें आज तरी मोठें बिकट आहे. पण वस्तुस्थितीचा जर विचार केला तर हेंच अनुमान निघतें कीं, हिंदुस्थानाला रशियापासून भिण्याचें कांहीं कारण नाहीं. हें मत प्रस्थापित झाल्यानंतर आम्हीं इंग्लंडला स्वच्छ सांगितलें पाहिजे कीं, तुमच्या साम्राज्यविषयक डावांत आम्हांस प्यादें करून दुसऱ्या देशांवर मात करण्याकरतां आम्हांस इकडे तिकडे हालवावयाचें हें आम्हांस मुळींच रुचणार नाहीं. मद्रास कांग्रेसच्या ठरावाच्या शब्दांत आम्हीं सतत ओरड चालू ठेविली पाहिजे कीं, ब्रिटिशसरकार जर लढाऊ धोरण स्वीकारील व स्वत:ची साम्राज्यविषयक हांव तृप्त करण्याकरितां हिंदुस्थानचा अयोग्य फायदा घेण्याचा प्रयत्न करील तर असल्या लढाईंत कोणत्या तऱ्हेनें भाग घेण्याचें अगर ब्रिटिशांशीं कसल्याही प्रकारचें सहकार्य

करण्याचें नाकारणें हिंदवासीयांना प्राप्त होईल. ही घोषणा जर सतत जोरानें चालू ठेवली तर कदाचित् इंग्लंड लढाऊ धोरण स्वीकारण्यापूर्वी दहादां विचार करील व हिंदुस्थान आणि सर्व जग दुसऱ्या महायुद्धाच्या अनर्थापासून तरी वांचेल.



समाप्त

REFBK-0004603

मराठी ग्रंथ संग्र[redacted]
दा. क्र. ४६०३

# वाङ्मयाचीं भूषणें

*१ टेरेन्स मॅक्स्विनी (सचित्र चरित्र) [प्रो० फडके] १-०-०
*२ डी व्हॅलेरा (सचित्र चरित्र) [प्रो० फडके] १-४-०
३ कुलाब्याची दांडी (सचित्र सामाजिक कादंबरी) [प्रो० फडके] १-१२-०
४ संतति-नियमन (शास्त्र व पद्धति) [प्रो० फडके] १-०-०
५ पहाटेपूर्वीचा काळोख ! (कादंबरी) [आपटे] २-०-०
६ हिंदुपदपादशाही (ऐतिहासिक ग्रंथ) [बॅरि० सावरकर] २-०-०
*७ संगीत तुलसीदास (नाटक) [गो. स. टेंवे] १-०-०
८ गांवसासू (कादंबरी) [डॉ० श्री. व्यं. केतकर] १-८-०
*९ काव्यालोचन [द. के. केळकर, बी. ए.] १-०-०
१० भावचित्रें (लघुकथा) [वि. बा. आंबेकर, बी. ए] १-०-०
११ शकुनी मोहर (कादंबरी) [कु० कुमुदिनी प्रभावळकर] १-४-०

[१२ आणे प्रवेश फी भरून कायम ग्राहक होणारांस वरीलपैकीं कोणतेंही एक अगर सर्व पुस्तकें पाऊण किंमतींत मिळतात. टपाल खर्च निराळा पडेल.]

१ गेलीं पांच वर्षें [न. चिं. केळकर] २-०-०
२ निरंजन (कादंबरी) [प्रो० ना. सी. फडके, एम्. ए.] २-०-०
३ जादूगार [प्रो० ना. सी. फडके, एम्. ए.] २-०-०
४ दौलत (कादंबरी) [प्रो० ना. सी. फडके, एम्. ए.] (छा. आहे) २-०-०
५ सुखाचे संसार [प्रो० ना. सी. फडके] १-४-०
*६ नेपोलियन बोनापार्ट चरित्र [कै० वि. ल. भावे] २-०-०
७ दोष कोणाचा ? (कादंबरी) [कृ. म. चिपळुणकर] १-८-०
८ संगीत हास्य-तरंग नाटक [विनोदकर्ते जोशी] ०-१२-०
९ संगीत सुंदरमठ नाटक [कृ. ह. दीक्षित] १-०-०
१० बेबंदशाही नाटक [वि. ह. औंधकर] (द्वि. आवृत्ति) १-०-०
+११ महाराष्ट्राच्या इतिहासाचे सोपे पाठ [कृ. गो. किनरे] ० ४-०
12 Birth Control [N. S. Phadke] 0-8-0
१३ स्वातंत्र्यदीप (राजकीय) ०-६-०
*१४ कांहींतरी (विद्यार्थी आवृत्ति) [ह. स. गोखले] ०-५-०
१५ संगीत वरवंचना नाटक [गो. स. टेंवे] ०-१२-०

* बक्षिसें व लायब्ररींसाठीं मंजूर. + टेक्स्ट-बुक म्हणून मंजूर.

सर्वत्र मिळतात.] 'विजय' साहित्य, ११ बुधवार, पुणें नं. २